

सप्टेंबर – १९८७

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

–: कार्यकारी संपादक :–

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए., पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

---

**वर्ष ६६ वे]** **किंमत २ रुपये** **[अंक ६**

**दूरध्वनी : ४१२ २५ ६१**

---

– कार्यालय –

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

२६

धन्य धन्य तें नगर ।
जेथें नामाचा गजर ॥
साधुसंत राहताती ।
तेथे देवाची वसती ॥
चला जाऊं हो दर्शना ।
भेटूं जीवींच्या जीवना ॥
दास म्हणे वाट पहाती ।
बाबा सांई ही विभूती ॥

२७

सांईनाम गोड प्रेमें मी गाईन।
वाचेनें वर्णीन यशोगीत ॥
यशोगीत बाबा वर्णाया रसना ।
कैशी जोरावेना ठावें तूज ॥
तुजला पूजिती नाना भक्तजन ।
प्रत्येकीं लक्षण भिन्नभिन्न ॥
असे एकाचीया मनीं शुद्ध भक्ती ।
संकटाची उक्ती आयकेना ॥
कोणी भक्त करी कामनिक भक्ति।
ऐहिक संपत्ति इच्छीतसे ॥
सुखाची वासना धरुनि मी आलों ।
कनिष्ठ ठरलों भक्तां माजी ॥

२८

चला शिरडी गांवी जाऊं ।
डोळे भरुन सांई पाहूं ॥
सांईनाम मनोहर ।
दिव्य स्वरुप सुंदर ॥
पूजा करुं मनोभावें।
सांई आम्हालागिं पावे ॥
सांई गुरुंत सद्‌गुरु ।
तो या जगिं आम्हा तारुं ॥
नाम जपा हो सत्वर ।
सांई पावेल लौकर ॥

२९

सांईनामाचा झेंडा रोंवुनि
मेळ मिळवुंया सभोवतां ।
बहु टाळ्यांचा गजर करुनी
सांईनाम हो घेऊं आतां ॥
सांईनामाचा घोष करुनी
विघ्नें पळवूं दाहि दिशा ।
असे नाम हें प्रेमळ घेउनि
सुखवूं आपुल्या जिवितेशा ॥


या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# श्री साईलीला – सप्टेंबर १९८७

## अनुक्रमणिका


| क्रमांक | लेख/कविता शिर्षक | लेखक–कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | – | ४ |
| २ | श्री साईबाबांच्या सिद्धी | – श्री. मु.ब. निंबाळकर | ६ |
| ३ | गोकुळात साई | – सौ. वसुंधरा चोरे | २० |
| ४ | श्री साईनाथांचा शरणार्थी – (२७) | – श्री. वि.बा. खेर | २१ |
| ५ | मनोरथ पूर्ण करी साईनाथ | – श्री. वि.म. हटवार | २७ |
| ६ | सौदागराचे घोडे | – श्रीमती शालिनी देसाई | २९ |
| ७ | श्रद्धा – सबुरी | – सौ. संगीता शिवेश्वरकर | ३६ |
| ८ | श्री साईबाबांची अगाध लीला | – सौ. सीता घाटपांडे | ३७ |
| ९ | साईदरबारातील माणिक आणि मोती – २ | – साईनंद | ३८ |
| १० | श्रीपाद वल्लभ दिगंबर व साईनाथ यांचे अवतार कार्य | – श्री. नंदू पाटील | ४४ |
| ११ | ही पहा साईलीला | – सौ. पौर्णिमा शेंडे | ४५ |
| १२ | साईकृपा | – प्रा. श्रीकांत भट | ४६ |
| १३ | श्रीकृष्णाची सोन्याची द्वारका | – श्री. रमाकांत पंडित | ४७ |
| १४ | साईबाबा आता तुम्ही पाणी प्या | – श्री. बाबुराव गडकरी | ४९ |
| १५ | द्वारकामाई | – सौ. शामा कर्णिक | ४९ |
| १६ | बाबांची अंकित मुलं | – श्री. अनिल रसाळ | ५० |
| १७ | रक्षण करी – साई हरी | – श्री. विलास पडवळ | ५३ |
| १८ | साईभक्त – आज आणि काल | – श्री. अ.ग. सुर्वे | ५४ |
| १९ | माझे दैवत श्री साईबाबा | – ताराबाई मांजेकर | ५६ |
| २० | सुखाचा शोध | – श्री. चकोर आजगांवकर | ५७ |
| २१ | चला आपण शिरडी जाऊ | – कु. प्रशान्त राणे | ५८ |
| २२ | शिरडी वृत्त – जून १९८७ | – | ५९ |
| २३ | शिर्डीच्या साईबाबांची कथा | – श्री. महेंद गुरव | ६० |
| २४ | (सही) सई, साई, सहाय्यी | – श्री. मधुसूदन करंबळेकर | ६१ |
| २५ | श्री साईबाबांचे महत्त्व | – श्री. शिवानंद हिरेमठ | ६३ |
| २४ | साई – एक कल्पवृक्ष | – श्री. मनोहर गायकवाड | ६४ |

## संपादकीय



# आप भला तो जग भला

या जगात अनेक लोकांना दुसऱ्यांची सुधारणा करण्याचा ध्यास सतत लागून राहिलेला असतो. त्यामधेच आपले जीवन साफल्य आहे असे त्यांना वाटत असते. परंतु स्वतःकडे मात्र त्यांचे दुर्लक्ष असते. स्वतःमधे जे दुर्गुण आहेत त्याबद्दल त्यांना त्याचे काहीच वाटत नाही, चिंता नाही अगदी बेफिकीर ते असतात. काळजी करायची ती फक्त दुसऱ्यांची हेच जणू काय त्यांचे ध्येय.

पण भक्तांनो, या विसाव्या-एकविसाव्या शतकात प्रत्येकाने प्रथम स्वतःच्या सुधारणेकडे जास्तीत जास्त लक्ष पुरविले पाहिजे. ''आप भला तो जग भला!' अशी एक हिंदी म्हण आहे. ती मधून पण हेच सूचित केलेले आहे. प्रथम आपली सुधारणा आणि मग जगाची. प्रथम आपली स्वतःची चिंता आणि मग इतरेतरांची विवंचना.

तुमच्या प्रत्येकाच्या मनात राग, द्वेष, मत्सर, वासना इ. षड्रिपु आहेत. दुर्गुणच म्हणायचे ते. मी कायतो मोठा, मी शहाणा, मी इतरांची सुधारणा करणार, मला लोकांनी मान द्यावा. मीच काय ते केलं. असा मी पणाचा विचार तुमच्या मनात नेहमी वावरत असतो, डोकावत असतो. हा असा मीपणाचा विचार तुमच्यापाशी जोवर आहे तोवर तुमच्या हातून इतरांची सुधारणा होणारच नाही आणि खरे सांगायचे तर तुमची स्वतःची पण नाहीच नाही.

प्रथम तुमचे चारित्र्य निर्मळ पाहिजे, स्वच्छ पाहिजे. या जगात धुतल्या तांदळासारखा कुणीच नाही. चंद्रावरसुद्धा डाग असलेला दिसतोच. तसे प्रत्येकाजवळ काहीना काहीतरी दोषास्पद हे आहेच आहे. तेव्हा हा दोष समजण्या इतकी पात्रता व तो घालविण्यासाठी सातत्याने यत्न करण्यात लक्ष पुरविले पाहिजे. स्वतः संपूर्ण चारित्र्य संपन्न असलेली व्यक्तीच इतरेजनांची सुधारणा करु शकेल, शकते.

साईभक्त मित्रांनो, जोपर्यंत तुमच्यापाशी, तुमच्याठायी राग, द्वेष, मत्सर, वासना इ. दुर्गुण वास करीत आहेत, तोपर्यंत तुम्ही स्वतःसाठी किंवा दुसऱ्यांसाठी काही करुच शकणार नाही असे निश्चित समजा. जोपर्यंत तुमच्या अंतःकरणात वरील दुर्गुणांचे वास्तव्य आहे तोपर्यंत सभोवतालच्या एकंदर परिस्थितीचे योग्य ते आकलन तुम्हाला करता येणार नाही. आणि योग्य आकलन न झाल्यामुळे नेमके काय केले पाहिजे, काय करावयास हवे याची तुम्हाला जाणीव होणार नाही. तुमच्या मनात सुधारणा विषयक वाटेल तेवढे विचार येईनात का, ते तुम्ही अंमलात आणूच शकणार नाही.

प्रथम स्वतःची सुधारणा केल्याशिवाय अर्थात् स्वतःमधील दुर्गुणांचे निर्मूलन,

समूळ उच्चाटन केल्याशिवाय जगाच्या, दुनियेच्या सुधारणेसाठी बाहेर पडाल तर काय होईल आहे माहित? तुमच्यातील दांभिकपणात, ढोंगीपणात दिवसेंदिवस अधिकाधिक भर पडत जाईल. तुमच्यातील मोठेपणाचा खोटा अभिमान निर्माण होईल. हा असा ढोंगीपणा, तुमचा शेवटी दाह करुन टाकील. तुमची अक्षरशः होळी करील. खोट्या अभिमानामुळे तुमचे एक दिवस पूर्णपणे पतन झालेले तुम्हीच पहाल. त्यामुळे स्वतः सभोवताली तुम्ही अकारण वैरी निर्माण करुन घ्याल, तुम्ही अस्वस्थ व्हाल. आणि शेवटी पस्तवाल. आजकाल हृदयरोगाचे प्रमाण वाढलेले आहे. आणि चिंता काळजी हेच हृदयरोगाचे मूळ कारण आहे.

तेव्हा मुख्य मुद्दा लक्षात नेहमी बाळगण्याचा हा की तुम्ही प्रत्येकाने प्रथम स्वतःचे भले करण्यासाठी झटले पाहिजे. तुम्ही भले बनल्याशिवाय जग भले करण्याची तुमची आकांक्षा, मनीची व्यथा, आंतरिक तळमळ अगदी अगदी व्यर्थ आहे याची पक्की खूणगाठ मनाशी बांधाच, बांधून ठेवा.

तुमच्यात स्वच्छपणा आला, पावित्र्य आले, भलेपणा आला, तुमचे स्वतःचे कल्याण साधले म्हणजे दुसऱ्याचे भले करण्याची, दुसऱ्याचे कल्याण साधण्याची भाषाच तुमच्या तोंडून येणार नाही. आणि ती येण्याची जरुरीपण नाही.

मग काय होईल? तुम्ही न बोलता चालाल तुमचे वागणे सवरणे हेच दुनियेची सुधारणा करण्यास समर्थ होईल मग तुमचे प्रत्येक कर्तव्य, प्रत्येक कृत्य प्रत्येक हालचाल व तुमचा प्रत्येक व्यवहार जगाचे भले करण्यासाठी कारणीभूत होईल.

तेव्हा भक्त मंडळीनो, श्रीसद्गुरु साईनाथांपाशी आपण अहर्निश, रात्रंदिवस हीच प्रार्थना करायची की बाबा महाराजा, "माझे भले करण्यासाठी अहोरात्र झटण्याची मला बुद्धी दे, माझ्या ठायी जे दुर्गुण आहेत ते शोधून काढून त्यांचे निर्मूलन, समूळ निर्मूलन करण्यासाठी मला सुयोग्य बुद्धी दे.

## श्री साईलीला

श्री साईलीला पुढील अंक श्री साईबाबा पुण्यतिथी विशेषांक म्हणून १ ऑक्टोबर १९८७ रोजी प्रकाशित होईल.

श्री साईलीला भक्तस्वानुभव विशेषांक म्हणून २० ऑक्टोबर १९८७ रोजी प्रकाशित होईल. १२८ पानांचा हा भरगच्च अनुभव अंक दिवाळी अंक म्हणून प्रकाशित होईल, व हा नोव्हेंबर-डिसेंबर जोड अंक म्हणून असेल.

श्री साईलीलाचे १० रु. भरुन वार्षिक वर्गणीदार होण्याऐवजी भक्तमंडळी आता अवघे ३०० रु. भरुन तहहयात वर्गणीदार होण्याचेच अधिक पसंत करतात. आपली तहहयात वर्गणी ताबडतोब कार्यालयाकडेच पाठवा व अंक मराठी की इंग्रजी ते म.ऑ. कूपनमधे स्पष्ट लिहा.

# श्रीसाईबाबांच्या सिद्धी

**ले. कर्नल मु.ब. निंबाळकर**
**(निवृत्त)**
१/१४, फाईव्ह स्टार अपार्टमेंटस्,
बंड गार्डन रोड, पुणे-४११ ००१.

मोजूं येतील पर्जन्यधारा । बांधू येईल मोटे वारा ।
परी या साईच्या चमत्कारा । कवण मापारा मोजील ॥३६॥– अध्याय २२.

**सिद्धी कोणत्या व किती ?**

श्रीमद्‌भागवताच्या स्कंद ११ अध्याय १५ मध्ये, पातञ्जल योगसूत्राच्या 'विभूति पाद' या तिसऱ्या भागामध्ये व इतर अनेक ग्रंथांतून सिद्धींचे वर्णन आलेले आहे. ते थोड्याफार फरकाने एक सारखेच आहे. या लेखातील चर्चेसाठी आपण श्रीमद्‌भागवतात सांगितलेल्या सिद्धी घेऊ या.

एकंदर सिद्धी २३ आहेत व त्यांचे तीन प्रकार आहेत. पहिल्या महासिद्धी. या ८ असून अत्यंत श्रेष्ठ असल्याने प्राप्त करण्यास फार कठीण आहेत. त्या फक्त ईश्वराच्या स्वरुपात स्थिर झालेल्यांनाच प्राप्त होतात, इतरांना नाही. दुसऱ्या सौम्यसिद्धी. या १० असून सत्त्वगुणसंपन्न असल्याने साधक सत्त्वगुणसंपन्न झाला की त्याला प्राप्त होतात. तिसऱ्या क्षुद्रसिद्धी. या ५ असून ईश्वराचे भजन करुन किंवा योगयुक्त होऊन अंतःकरण शुद्ध झाले, म्हणजे सहज प्राप्त होतात. आता प्रत्येक प्रकारातील वेगवेगळ्या सिद्धी कोणत्या ते पाहू या.

**महासिद्धी (८)**

(१) अणिमा (देह अति सूक्ष्म करणे.)
(२) महिमा (देह अति जड करणे.)
(३) लघिमा (देह अति हलका करणे.)
(४) प्राप्ति (इंद्रियांसह त्या त्या विषयांची प्राप्ती.)
(५) प्राकाश्य (परलोकातील अदृश्य विषयांचेही ज्ञान होणे.)
(६) ईशिता (शरीरांना व जीवांना आपल्या इच्छेप्रमाणे प्रेरित करण्याची शक्ती.)
(७) वशिता (सर्व विषयांत राहून त्यांना वश न होणे.)
(८) यत्कामस्तदवस्यति (सर्व कामनांचा लोप होऊन परमानंद प्राप्ती.)

**सौम्यसिद्धी (१०)**

(१) अनूर्मिमत्त्वं (क्षुधा, तृष्णा, शोक, मोह, जरा, मृत्यू या सहा उर्मींची देहाला मुळीच पीडा न होणे.)
(२) दूरश्रवण (कितीही दूर अंतरावर बोललेले भाषण एकाच ठिकाणी बसून ऐकणे.)
(३) दूरदर्शन (त्रैलोक्यातील हालचाल बसल्या ठिकाणाहून डोळ्यांनी पाहणे.)

(४) मनोजव (कल्पना करील तेथे शरीर मनोवेगाने घेऊन जाणे.)
(५) कामरुप (देव, मनुष्य व पशुपक्षी यांचे पैकी कल्पना करील त्याचे रुप धारण करणे.)
(६) परकायाप्रवेश (स्वतःचा देह न सोडता दुसऱ्या देहात प्रवेश करणे.)
(७) स्वच्छंदमरण (काळाशी वश न होता आपल्या इच्छेने मरणे.)
(८) स्वर्गीय देवांचे क्रीडन पाहणे व भोगणे.
(९) यथासंकल्पसंसिद्धि (मन ज्या ज्या इच्छा करील त्या त्या प्राप्त होणे.)
(१०) आज्ञाऽप्रतिहतागतिः (ज्याच्या आज्ञेला व गतीला कोठेही प्रतिबंध नसणे.)

**क्षुद्रसिद्धी**

(१) त्रिकालज्ञान (भूत, भविष्य आणि वर्तमान या तिन्ही काळांचे ज्ञान)
(२) अद्वन्द्वं (सुख, दुःख, शीत, उष्ण, मृदु आणि अत्यंत कठीण द्वंद्वांना मुळीच वश न होणे.)
(३) परचित्ताद्यभिज्ञता (दुसऱ्याचे स्वप्न सांगणे किंवा त्याच्या मनातील हेतू जाणणे.)
(४) प्रतिस्तंभन (अग्नी, वायू, उदक, शस्त्र, विष आणि सूर्य यांचा परिणाम न होऊ देणे.)
(५) अपराजय (कोणालाही हार जावयाचे नाही. कोठे केव्हाही विजयीच व्हावयाचे.)

**साईबाबांकडे कोणत्या सिद्धी होत्या ?**

आता वरील सिद्धींपैकी साईबाबांकडून कोणकोणत्या सिद्धी प्रकट केल्या गेल्या त्या आपण पाहू या.

**आणिमा व लघिमा**

या देहाच्या सिद्धी आहेत. यांमुळे शरीर अति सूक्ष्म व हलके करता येते. बाबांजवळ या सिद्धी होत्या याचे एक उदाहरण म्हणजे अध्याय १० मध्ये नुसत्या चिंध्यांनी टांगलेल्या वीतभर फळीवर बाबा झोपत असत व कधी इतक्या उंच चढत किंवा उतरत हे कोणालाही कळत नसे :—

**ऐसी चिंध्यांनी बांधिली फळी । वजन बाबांचे कैसे सांभाळी ।**
**महासिद्धी असतां जवळी । नांवाला फळी केवळ ती ॥१८॥**
**अतिसूक्ष्म कण डोळां खुपे । तेथे अणिमावंत सुखे लपे ।**
**माशी कीड मुंगी या रुपे । संचार सोपे बाबांचे ॥१९॥**
**अणिमा जयाचे घरची दासी । वेळ कां तयातें होतां माशी ।**
**बसेल तो अधांतरी आकाशीं । मात त्या कायसी फळीची ॥२०॥**

— अध्याय १०

दुसरे उदाहरण म्हणजे अध्याय ९ मध्ये बाबा सौ. तर्खडांना शिरडीत म्हणाले होते की, ते वांद्याला त्यांचे घरी गेले होते परंतु श्री. तर्खड नैवेद्य दाखवायला विसरल्याने त्यांना उपाशीपोटी परत यावे लागले होते :—

कैसा पहा ऋणानुबंध । कवाड होते जरी बंद ।
तरी मी प्रवेशलो स्वच्छंद । कोण प्रतिबंध मज करी ॥१०८॥

— अध्याय ९

**महिमा**

हीपण देहाची सिद्धी आहे. यामुळे शरीर वाटेल तेवढे जड करता येते. पर्वतासारखे देखील. बयाजी कोते पाटील (ज्यांचे मांडीवर टेकून बाबांनी देहत्याग केला होता.) फार सशक्त होते. कधीकधी मालीश केल्यावर ते बाबांना उचलून धुनीपुढे नेऊन ठेवत. एकदा त्यांनी बाबांना तसे उचलण्याचा प्रयत्न केला परंतु बाबांना ते जराही हलवू शकले नाहीत. बाबा मात्र त्यांचेकडे पाहून खदखदा हसत होते. बयाजी मनात समजून गेले व त्यांचा अहंकार साफ उतरला.

**प्राप्ति**

इंद्रियांसह त्या त्या विषयांची प्राप्ती. बाबांना तर इंद्रियसुखांची मुळीच इच्छा नव्हती

ऐसी बाबांची देहस्थिती । इंद्रिये जरी कर्मी प्रवर्तती ।
तरी तयांस विषयस्फूर्ति । लव संवित्ती असेना ॥१०२॥

— अध्याय १०

परंतु बाबा दुसऱ्यांच्या तसल्या इच्छा पुरविण्यास समर्थ होते. म्हणजे त्यांचे स्वतःजवळ ती सिद्धी असल्याशिवाय का?

जो जें मागे त्या तें देई । हें ब्रीद जयानें बांधिलें पायीं ।
म्हणून म्हणतो करीं गा घाई । दर्शन घेई साईचें ॥६०॥

— अध्याय १३

**प्राकाश्य**

ब्रह्मांडातील अदृश्य विषयांचेही ज्ञान होणे. या बद्दल बाबा स्वतःच म्हणाले होते :—

माझा देह जरी इकडे । तुम्ही सातां समुद्रा पलीकडे ।
तुम्ही कांहींही करा तिकडे । जाणीव मज तात्काळ ॥६८॥

— अध्याय १५

एखाद्याचा मृत्यू झाल्यावर त्याच्या जीवाने पुढे कोठे व कोणत्या परिस्थितीत जन्म घेतला आहे, हेही बाबांना कळत असे. एकदा एका बाईच्या मुलाला सर्पदंश होऊन ते मेले. त्याची आई बाबांकडे आली व सारखी रडून आपल्या मुलाला जिवंत करण्यासाठी विनवू लागली. जवळ कै. काकासाहेब दीक्षित उभे होते, त्यांना तिची दया येऊन तेही त्याबद्दल बाबांना विनंती करु लागले. तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, "अरे काका ! या मोहात तू पडू नकोस. झाले आहे ते चांगले झाले आहे. ह्या मुलाचा आत्मा नव्या शरीरात शिरला आहे. त्या देहात तो फार चांगले काम करेल, जे तो या देहात करु शकला नाही. जर मी त्या आत्म्याला या शरीरात परत आणला तर त्याचा नवीन देह मरेल आणि हा देह पुनः जिवंत होईल. मी तुझ्या करीता हे करु शकतो. पण तू त्याच्या परिणामाचा सांगोपांग विचार केला आहेस का? त्याची जबाबदारी घेण्यास तू तयार आहेस का?" हे ऐकून काकासाहेब दीक्षितांनी आपला आग्रह सोडला.

**ईशिता (ईश्वरत्त्व)**

शरीरांना व जीवांना आपल्या इच्छेप्रमाणे प्रेरित करण्याची साक्षात ईश्वरासारखी शक्ती. या सिद्धीचे एकनाथ महाराज वर्णन करताना म्हणतात :—

तो आपुले नि प्रतापस्वभावी । मशकाहातीं मेरु विभांडवी ।
नीच हस्तें सृष्टि विध्वंसूनि मांडवी । का इंद्राते मारवी उंदिराहाती ॥९१॥
यापरी एकातें मारवी । जीवें गेलिया जीववी ।
अचेतनाते पालेजवी । ये सिद्धीची पदवी ईशत्त्व ॥९२॥

एकनाथी भागवत, अध्याय १५

या सिद्धीचे बाबांच्या बाबतीत ज्वलंत उदाहरण वर प्राकाश्य सिद्धीत वर्णन केलेल्या उदाहरणात सापडेल. त्यात बाबा स्वतःच दीक्षितांना म्हणाले होते की, त्या मुलाच्या जीवाने दुसरीकडे जन्म घेतला असला तरी त्या जीवाला परत या देहात आणून त्या मुलाला मी जिवंत करु शकतो. याच सिद्धीचे दुसरे उदाहरण म्हणजे, कै. अण्णासाहेब दाभोलकरांसारख्या विद्वान परंतु काव्य रचनेचा गंधही नसलेल्या गृहस्थाकडून श्रीसाईसच्चरितासारखा ५२ अध्यायाचा व ९१०७ ओव्यांचा अलंकारिक व काव्यमय ग्रंथराज लिहवून घेणे हे होय. कै. दाभोलकर स्वतःच म्हणतात:—

नसताः अधिकार — ज्ञानव्युत्पत्ति। मज पामरा स्फुरविली स्फूर्ति ।
ग्रंथ लिहविला माझिये हाती। द्यावया जागृति निजभक्तां ॥७॥

— अध्याय २५

काव्यपदबंधव्युप्तत्ती। नेणें मी पामर मंदगती ।
करधृत लेखणी धरोनि हाती। साईच लिहविती तें लिहितों॥१११॥

— अध्याय ३७

**वशिता**

विषयात राहून त्यांना वश न होणे. सर्व भोग भोगून अभोक्ता राहणे. श्रीसाईबाबा शिरडीत गावात सर्व लोकवस्तीत रहात होते. स्त्री, पुरुष, मुलेबाळे या सर्वांना ते भेटत असत. राधाकृष्णामाई सारखी तरुण व सुंदर स्त्री त्यांच्या सेवेला सदा तत्पर होती. तिला तर बाबांनी सदा दूर ठेवलेच परंतु कोणत्याही स्त्रीच्या मोहात ते कधी पडले नाहीत. तसेच त्यांच्या हयातीच्या उत्तरार्धात त्यांचेवर पैशाचा पाऊस पडत होता. उंची वस्त्रे व हिऱ्यामोत्यांची आभरणे चढविली जात होती, बसावयास गाद्या गिरद्या गोळा झाल्या होत्या. परंतु त्या गोष्टींच्या लोभात ते कधीच सापडले नाहीत. उलट बाबा हे सर्व कधी फेकून देतील याचीच भक्तांना भिती वाटत होती.

दिसे जरी परिवारिला भक्तीं । परी न कोठेही आसक्ती ।
स्वस्वरुपीं चित्तवृत्ति । दृश्यनिवृत्ति सर्वदा ॥६०॥

— अध्याय १४

**यत्कामस्तदवस्यति**

सर्व कामनांचा लोप होऊन परमानंद प्राप्ती, ज्याच्या सर्व ईच्छा तृप्त झाल्या आहेत तोच परमानंदात रमू शकतो. बाबा स्वतः तर तसे रमलेले असतचः–

साई आनंदवृत्तीची खाण । असलिया भक्त भाग्याचा जाण ।
परमानंदाची नाही वाण । सदैव परिपूर्ण सागरसा ॥६६॥

— अध्याय १

परंतु आपल्या सान्निध्यात बसलेल्या भक्तांनाही परमानंदाची गोडी चाखविण्याची त्यांचेत शक्ती होती. कै. खापर्डे, सौ. तर्खड, कै. नानासाहेब चांदोरकर वगैरे भक्तांना तसा अनुभव आलेला होता. तसेच अध्याय १२ मध्ये एका मामलेदाराबरोबर आलेल्या रामभक्त डॉक्टरालादेखील बाबांनी तसा अनुभव दिला होता.

परी ते दिवशी मध्यरात्री । कृपा झाली तयांवरी ।
परमानंदस्थितीची माधुरी । निद्रेमाझारी चाखिली ॥१७२॥
पुढे डॉक्टर स्वग्रामा परतती । तरी ती संपूर्ण स्वानंदस्थिति ।
संपूर्ण पंधरा दिन अनुभविती । वाढली भक्ति साईपदीं ॥१७३॥

— अध्याय १२

**अनूर्मिमत्त्वं**

क्षुधा, तृष्णा, शोक, मोह, जरा व मृत्यू या उर्मींचा बाबांना मुळीच बाध नव्हता हे सांगायलाच नको. अगदी लहानपणापासूनच बाबांनी यांवर विजय मिळविला होता. म्हणूनच तात्या कोते पाटील यांची आई बायजाबाई हिला टोपलीत भाकऱ्या घेऊन त्यांना खाऊ घालण्याकरिता त्यांच्यामागे भर दुपारी उन्हातान्हात, रानावनात पळावे लागत होते:–

कोस कोस रान धुंडावे । दाट झाड झुडुप तुडवावें ।
वेड्या फकीरास या हुडकावें । पाया पडावें तयाच्या ॥१०७॥
काय तिच्या त्या सत्त्वाची थोरी । ओली कोरडी भाजी भाकरी ।
रानीं वनीं दुपारी तिपारीं । भरवीं न्याहारी बाबांतें ॥१०८॥

— अध्याय ८

शोकमोहाबद्दल तर बोलावयासच नको. बाबांचे वैराग्य ते पोरसवदा असतानाच सर्वांना आश्चर्यचकित करण्यासारखे होते. शिरडीची एक वृद्ध बाई नाना चोपदाराची आई म्हणाली होती:–

सोडूनि माता पितर आप्त । गणगोत आणि जात पात ।
त्यागूनि सकल संसारजात । प्रकटला जनहितार्थ शिरडींत ॥११५॥
जो तो करी आश्चर्य थोर । ऐसें कैसें तरी हें पोर ।
वय कोंवळें रूप मनोहर । राही उघड्यावर रात्रंदिन ॥१२२॥
बाह्यात्कारीं दिसे पोर । परी कृतीनें थोरांहूनि थोर ।
वैराग्याचा पूर्ण अवतार । आश्चर्य फार सकळिंका ॥१२३॥

— अध्याय ४

जरामृत्यूबद्दल बोलायचे झाले तर सर्वांचाच हा देह नश्वर आहे. श्रीराम व श्रीकृष्ण यांसारख्या अवतार पुरुषांनाही मृत्यू (देहत्याग) सुटला नाही. बाबा वृद्धापकाळी आजारी व अशक्त होते. तरी वेळ प्रसंगी अचाट शक्ती उत्पन्न करण्याची त्यांना सिद्धी होती. उदा. अध्याय १९ मध्ये वामन गोंदकराचे घराला शिडी लाववून बाबा छपरावर झरझरा चढले व राधाकृष्णामाईचे छप्परही सत्वर वळंघून गेले, याचे वर्णन करताना हेमाडपंत म्हणतात :—

दोघें दो बाजू धरूं लागत । तेव्हांच बाबा चालू शकत ।
स्वयें एवढे असतां अशक्त । कोठून सामर्थ्य आले हें ॥२४१॥

अध्याय १९

तसेच देहत्यागाचे वेळी देखील आजारी असून बाबा अगदी सावध होते व उठून बसलेलेही होते :—

दिवसां अष्ट घटकां भरतां । निर्याणकाळ निकट येतां ।
उठूनि बैसले ते निजसत्तां । अविकळ चित्तामाझारी ॥८४॥
नाहीं पडून वा निजून । स्वस्थपणें गादीसी बैसून ।
ऐसा स्वहस्तें धर्म करुन । केलें विसर्जन देहाचें ॥१४१॥

— अध्याय ४२

**दूरश्रवण व दूरदर्शन**

याची श्रीसाईसच्चरितात शेकडो उदाहरणे सापडतील. उदा. अ. २ मध्ये कै. दाभोलकरांचा कै. भाटे यांचेशी वाड्यांत वाद झाला पण बाबांना तो मशिदीत ऐकू गेला :—

वाड्यापासूनि मशिदीपर्यंत । मध्यंतरीं अंतर बहुत ।
बाबांसी कळलें कैसें हें वृत्त । आश्चर्य चकित मी मनीं ॥१६७॥

तसेच अध्याय ३८ मध्ये कै. नानासाहेब चांदोरकर शिरडीस येताना कोपरगाव येथे दत्ताचे दर्शन घेण्याचे टाळून आल्याचे बाबांना शिरडीत बसल्या बसल्याच कळले होते.

आणिक एक झाला निवाड । असोत मध्ये पर्वत पहाड ।
कांहीं ग साईंच्या दृष्टीआड । गुप्तही उघड त्यां सर्व ॥११९॥

— अध्याय २१

तथापि या दोन सिद्धी बाबांच्या वर वर्णन केलेल्या 'प्राकाश्य' नावाच्या महासिद्धीपुढे काहीच नाहीत. त्यात तर बाबांना समस्त ब्रह्मांडात घडणाऱ्या कोणत्याही गोष्टींची शिरडीत बसून जाणीव होत असे. असो.

**मनोजव/कामरुप**

कल्पना करेल तेथे शरीर मनोवेगाने घेऊन जाणे आणि देव, मनुष्य किंवा प्राणी यांपैकी कल्पना करील त्याचे रुप धारण करणे. याची बाबांच्या चरित्रात दोन ठळक उदाहरणे आहेत. अध्याय ४० मध्ये बाळासाहेब देवांकडे उद्यापनाच्या जेवणाकरिता डहाणू येथे संन्याशाच्या रुपाने जाणे :—

मज न लागे गाडीघोडी । विमान आणि आगिनगाडी ।
हांक मारी जो मज आवडी । प्रकटे मी ते घडी अविलंब ॥३२॥

— अध्याय ४०

तसेच अध्याय ३३ मध्ये कै. नानासाहेब चांदोरकरांच्या मुलीकरिता उदी व आरती वेळेवर पोहोचविण्यासाठी जळगाव ते जामनेर टांगेवाल्याचे रुप घेऊन तांगा हाकलणे.

कुठला तांगा कुठला शिपाई । महानाटकी ही माऊली साई ।
संकट समयीं धावत येई । भावापायीं भक्तांच्या ॥११९॥

— अध्याय ३३

**परकायाप्रवेश**

स्वत:चा देह न सोडता दुसऱ्या देहात प्रवेश करणे. अध्याय ९ मध्ये सौ. तर्खडांनी स्वत: जेवत असताना एका भुकेलेल्या कुत्र्याला भाकरतुकडा खाऊ घातला होता याची त्यांना आठवण देऊन बाबांनी सांगितले होते :

"तूं जेवूं बैसतां द्वारी येतां । पोटी क्षुधेची जया व्याकुलता ।
त्यां देखिले ज्या श्वाना अवचिता । मज एकात्मता तयासवें ॥१२६॥

— अध्याय ९

हंसराज नावाच्या गृहस्थाला दम्याचा विकार होता. तो बरा होण्यासाठी बाबांनी त्याला दही न खाण्यास सांगितले होते. परंतु तो दही खाण्याचे सोडी ना. शेवटी बाबांनी मांजराचे रुप घेऊन ते दही त्याचे आधी चोरुन खाणे सुरु केले. एकदा हंसराजने त्या मांजराला चोरुन दही खाताना पकडले व रागाने त्याचे पाठीवर जोराने काठी मारली. दुसरे दिवशी बाबांनी हंसराजला इतर भक्तांसमोर आपल्या पाठीवर उठलेले काठीचे वळ दाखविले व त्याला लज्जित करुन सोडले.

**स्वच्छंदमरण**

श्रीएकनाथ महाराज म्हणतात :—

काळासी वश्य नाही होणे । आपुलिये इच्छेनें मरणें ॥५५॥
देहत्यागाचे प्राणधारण । तेंच स्वच्छंद मृत्यूचे लक्षण ॥१३०॥

एकनाथी भागवत, अध्याय १५

बाबांजवळ ही सिद्धी होतीच. सन १८८६ मध्ये त्यांनी नाही का प्राण ब्रह्मांडी चढविला व तीन दिवसानंतर ते पुन्हः शुद्धीवर आले? (अध्याय ४३) तसेच सन १९१८ साली विजयादशमीच्या दिवशी बाबांनी खरोखरीच देहत्याग केला, तोही स्वत:च्या इच्छेने. हेमाडपंत म्हणतात :—

लोकसंग्रहार्थ जो अवतरला । कार्य संपतां अवतार संपविला ।
तो काय जन्म-मरणाचा अंकिला । विग्रह स्वलीला धरितो जो ॥१४५॥

— अध्याय ४२

आणि आपल्या देहत्यागाचा हा दिवस ठरविल्याबद्दल बाबांनी दोन वर्षांआधी

सीमोल्लंघनाच्या वेळी आपली वस्त्रे अग्नीत टाकून व रामचंद पाटलाला स्वप्नात तात्या पाटलाच्या मरणाबद्दल सांगून आपल्या भक्तांना सूचना दिली होती ना?

एणेपरी करुनिया मीस । बाबांनी सुचविले सर्वत्रांस ।
भवसागर सीमोल्लंघनास । दसराच एक सुमुहूर्त ॥४०॥

— अध्याय ४२

**यथासंकल्पसंसिद्धि व आज्ञा ऽप्रतिहतागतिः**

मन ज्या ज्या इच्छा करील त्या त्या पुरविल्या जाणे आणि ज्याच्या आज्ञेला व गतीला कोठेही प्रतिबंध नसणे. यांत तर सर्व सिद्धींचे सार आहे. इतर सिद्धीत अंतर्भूत न करता येणाऱ्या बाबांच्या कोठलाही चमत्कार वा शक्ती या सदराखाली धरता येईल. यथासंकल्पसिद्धि समजावून सांगताना श्री एकनाथ महाराज म्हणतात :—

तो जे जे कालीं जे जे देशीं । जे जे कर्मी जे जे अवस्थेसी ।
जे जे काही वांछी मानसीं । ते संकल्प त्यापाशी सदा सफळ ॥१४५॥

आणि **आज्ञाऽप्रतिहतगातीबद्दल** तर **श्रीकृष्ण** भगवानच म्हणतात :

जैशी माझी आज्ञा सर्वांतरी । तैशी त्याची आज्ञा चराचरीं ।
कोणी नुल्लंघिती तिळभरी । ते आज्ञासिद्धि खरी तो लाहे ॥१४९॥

एकनाथी भागवत अध्याय १५.

श्रीसाईबाबांना आपली कोणतीही इच्छा पूर्ण करणे शक्य होते. तसेच त्यांची आज्ञा कलिकाळालाही अमान्य करणे शक्य नव्हते, व नाही. आपणा सर्वांना त्यांच्या चरित्रांतील चमत्कारावरुन व भक्तांना आलेल्या वारंवार अनुभवांवरुन पटलेले आहेच. बाबांचे तेलाशिवाय नुसत्या पाण्याने दीप पेटविणे, सबीज द्राक्षांना धरमसी ठक्करांकरिता निर्बीज करणे, सपटणेकर व सौ. औरंगाबादकर वगैरांना पुत्रप्राप्ती करुन देणे, खापर्डेंच्या मुलाच्या ग्रंथिज्वर गांठी स्वतःच्या अंगावर उठवून घेणे वगैरे सारखे चमत्कार संकल्पसिद्धी खाली मोडू शकतात.

आज्ञा ऽप्रतिहतागती बद्दल बोलायचे झाले तर बाबांनी बुट्टींचे जुलाब व उलट्या नुसती तर्जनी हालवून "खबरदार मलविसर्जनी जाता नये व वांतीही राहिली पाहिजे ठिकाणी" असे म्हणताच "दोन्ही व्याधींनी भेदरा घेतला." (अध्याय २२). तसेच शामाच्या करांगुळीला सर्पदंश झाला तेव्हा बाबा ओरडले, "चढू नको भटुरड्या वर. चढशील तर खबरदार. चल नीघ जा खाली उतर" आणि विषाचे स्तंभन तर झालेच पण ते हळूहळू पार उतरुनही गेले. असा होता बाबांच्या शब्दांचा दरारा.

उगाच नाही बाबा कधी कधी आपल्या भक्तांना मृत्यूपासूनही वाचविण्याचे आश्वासन देत असत. उदा. एकदा बुट्टींना ज्योतिषाने आजचा दिवस अशुभ असून त्यांना आज गंडांतर आहे असे सांगितले होते. तेव्हा—

बाबा बुट्टीस पुसती । काय हे नाना काय वदती ।
ते काय तुज माराया बघती । नलगे ती भीती आपणा ॥९७॥
कैसा मारतोस पाहू मार । खुशाल त्यांना देई उत्तर ॥९८॥

अध्याय २२

### त्रिकालज्ञान

– याचा अर्थ भूत भविष्य आणि वर्तमान या तिन्ही काळांचे ज्ञान :

जो जो जाई करोया दर्शन । तयाचे भूत भविष्य वर्तमान ।
साई न पुसतां करिती निवेदन । ऊण-खूण संपूर्ण ॥७१॥

– अध्याय १०

बाबांच्या त्रिकालज्ञानाबद्दल श्रीसाईसच्चरितात कितीतरी उदाहरणे सांपडतील. उदा. मिरीकरांवर येणारे सर्पदंशाचे गंडांतर बाबांना आधीच कळले होते. म्हणूनच त्यांनी गिरीकरांना त्याबद्दल पूर्व सूचना देऊन बरोबर संरक्षणासाठी शामाला धाडले होते. (अ. २२)) तसेच विजयानंद नावाच्या मद्रासी संन्यासाचा मृत्यू जवळ आल्याचे जाणून बाबांनी त्याला भागवताचे पारायण करण्यास सांगितले होते. (अ. ३१) एवढेच काय, बाबांचे शालेय शिक्षण झाले नसतानाही त्यांना संस्कृत भाषेचे व्याकरणासह ज्ञान होते. अ. ३९ व अ..५० मध्ये कै. नानासाहेब चांदोरकरांना अ. ४ मधील ३४व्या श्लोकावर बाबांनी किती अभ्यासपूर्ण व अलौकिक भाष्य ऐकविले होते? पण यात काय आश्चर्य? हेमाडपंत म्हणतात:–

जैसा करतल स्थित आमलक । तैसे आमूल विश्व ज्या देख ।
तया संता काय ना ठाऊक । सवितांही प्रकाशक त्यांचे नी ॥५६॥

– अध्याय ५०

बाबांना भक्तांच्या पूर्वजन्मांचीही माहिती असे व ते तसे बोलूनही दाखवीत. उदा. अं. २७ मध्ये सौ. तर्खडांच्या, अ. ४६ मध्ये दोन शेळ्यांच्या व अ. ४७ मध्ये क्रूर सर्प व बेडूक यांच्या तीन जन्मांच्या गोष्टी बाबांनी वर्णन केल्या होत्या.

### अद्वंद

सुख-दुःख, शीत-उष्ण, मृदु-कठीण या द्वंदाना वश न होणे. बाबांच्या या सिद्धीबद्दल हेमाडपंत म्हणतात:–

कोवळ्या वयांत खडतर तप । शीत आतप समसाम्य ॥११८॥

– अध्याय ४

पायी जोडा ना वहाण । एक आसन गोणाचें ॥८८॥
तेचि आसन वा आस्तरण । कांसे एक कौपीन परिधान ।
नाहीं दुजें वस्त्र प्रावरण । शीतनिवारण धुनी ॥९१॥

– अध्याय ५

सौख्यें जयासी नाहीं हरिख । दुःखें जयासी नाहीं शोक ।
सरिखे जया रावरंक । हे काय कौतुक सामान्य ॥९०॥

–अध्याय ८

### परिचित्ताद्यभिज्ञता

दुसऱ्या व्यक्तीचे स्वप्न किंवा मनातील हेतू सांगणे. बाबांना तर ही सिद्धी पूर्णपणे अवगत होती. अ. २९ मध्ये हाटे ग्वाल्हेरास असताना त्यांना 'साईहस्तस्पर्शपूत'

रुपया गृहात असावा अशी इच्छा झाली ती, बाबांना शिरडीत लगेच कळली व त्यांचा दक्षिणेसाठी पाठवलेला रुपया तसाच परत करुन ती पुरविली देखील. हाटे म्हणतात:

म्हणे मनी जैसा हेत । केला होता जैसा संकेत ।
जाणोनि माझें मनोगत । पुरविला मनोरथ बाबांनी ॥१७५॥

— अध्याय २९

याचप्रमाणे अ. ३५ मध्ये धरमसी ठक्करांची निर्बीज द्राक्षे खाण्याची इच्छा. अ. २८ मध्ये लखमीचंदाची सांजा खाण्याची इच्छा एवढेच काय अ १५ मध्ये तर एका पालीच्या मनातील बहीण भेटायला येणार याबद्दलचा अत्यानंदही बाबांना कळला होता.

**प्रतिस्तंभन**

अग्नी, वायू, उदक, शस्त्र, विष आणि सूर्य यांचा परिणाम न होणे. यातील बाबांच्या अग्नी, वायू व उदक यांच्या सिद्धीची उदाहरणे प्रसिद्ध अशा ११ व्या अध्यायातच सांपडतात. एकदा शिरडी येथे सोसाट्याचा वारा सुटून मेघांच्या गडगडाटांनी व विद्युलतांच्या कडकडाटांनी घनदाट पाऊस पडायला सुरुवात झाली होती व सर्व गावकरी गुरांढोरांसकट बाबांकडे धावले होते. बाबांनी लगेच मशिदीच्या धारेवर येऊन आरोळीवर आरोळी मारुन पाऊस थांबविला. तसेच एकदा मशिदीतील धुनीच्या ज्वाळांनी भडका घेतला व ज्वाळा तक्तपोशीला जाऊन भिडू लागल्या. सर्वजण घाबरले परंतु बाबांनी शांतपणे सटका हातात घेतला व तो जमिनीवर आपटून ज्वाळांना 'हट की माघारा' 'सबूर सबूर' असा हुकूम दिला आणि खरोखरीच अग्नी हळूहळू शांत झाला. अग्नीबद्दल आणखी उदाहरण म्हणजे बाबांचे चुलीवरील हंडीतून वाफा वर उसळत असताना व तपेले खतखतत असताना त्यात ढवळण्याकरिता आपला हात घालणे होय:—

कोठें रक्तमांसाचा हात । कोठें तपेलें प्रखर रखरखीत ।
परी न भाजल्याची खूण यत्किंचित । न भयभीत मुखचर्या ॥८३॥

— अध्याय ३८

अग्नीवर प्रतिस्थंभन सिद्धी असल्याशिवायच का हे शक्य होते?

शस्त्राच्या स्तंभनाविषयी कै. पू. नरसिंह स्वामी एक गोष्ट सांगतात ( Vol IV P. 170) अध्याय ३ मध्ये रोहिल्याच्या मोठ्याने कलमे पढण्याची हकीकत आहे. हा 'शरीरे पुष्ट जैसा हेला (रेडा) तर होताच परंतु धर्मवेडाही होता. त्याला बाबांनी मशिदीमध्ये हिंदु भक्तांकडून तालवृंदांच्या वाद्यात व मंत्रस्तोत्रांच्या गजरात आपली विठ्ठल, दत्त यांसारख्या हिंदु देवतांप्रमाणे पूजा आरती करुन घेणे पसंत नव्हते व त्याला हे इस्लाम धर्माच्या विरुद्ध वाटत होते. तेव्हा असल्या इस्लामच्या शत्रूचा नाश करणे हे आपले कर्तव्य तो मानीत असल्याने त्याने बाबांना ठार मारण्याचे ठरविले. त्यासाठी एकदा तो बाबांच्या मागे हातात मोठा सोटा उभारुन उभा राहिला. बाबा अंतर्ज्ञानी असल्याने त्यांना हे कळले होते. आता तो घाव करणारच इतक्यात बाबा

एकदम मागे फिरले आणि रोहिल्याकडे रोखून पहात त्यांनी त्याचे डाव्या हाताचे मनगट पकडले. बस एवढेच। रोहिल्याच्या हातातील सोटा तर गळून पडलाच पण रोहिला स्वतःही धाडकन् जमिनीवर कोसळला. बाबा मात्र पुढे काहीही न बोलता शांतपणे दुसरीकडे निघून गेले. नंतर लोकांनी रोहिल्याला विचारल्यावर तो म्हणाला, "बाबांनी माझी सर्व शक्तीच नाहीसी करुन टाकली होती" असो.

**अपराजय**

कोणालाही हार जावयाचे नाही. कोठे केव्हाही विजयीच व्हावयाचे. ही सिद्धी असल्याशिवायच का अ. ४७ मध्ये त्या वाटसरुला विशाल जबड्याचा सर्प विक्राळ बेडकाला खाऊन टाकण्याची भिती वाटत असताना बाबा आत्मविश्वासाने म्हणाले :

तो काय करितो निश्चिंतीते ।
त्याचा मी बाप आहे ना येथें । मग मी कशाते पाहिजे ॥५८॥

तसेच उपासनी महाराज जेव्हा १९११ साली पहिल्यांदा बाबांना भेटायला आले तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, "आता जाऊ नकोस." परंतु उपासनी महाराजांनी तेथे राहण्याची आपली असमर्थता दाखविली तेव्हा बाबा म्हणाले, "जातोस तर जा, पण आठ दिवसांत परत येशील." आणि खरोखरीच उपासनी महाराजांची इच्छा नसतानाही बाबांनी त्यांचे बरोबर आठ दिवसात शिरडीत परत येणे घडविले. बाबा कधीच कोणाला हार जात नसत. तशी त्यांच्यात शक्तीच होती. **(Vol. II P. 225).**

**साईबाबांना सिद्धी कशा प्राप्त झाल्या?**

सिद्धी खालील कारणांमुळे प्राप्त होतात. असे भागवतात सांगितले आहे:–

१ जन्म २ औषधी ३ मंत्र ४ तप व ५ योगधारणा. पक्ष्यांना आकाशांत उडता येणे, माशांना पाण्यात पोहता येणे या स्वाभाविक जन्म सिद्धी होत. काही श्रेष्ठ पुण्यवान, व्यक्तींतही पूर्वजन्माच्या साधनेमुळे जन्मतःच किंवा लहानपणीच सिद्धीचा प्रादुर्भाव झालेला दिसून येतो. कडू लिंब नित्य सेवन केले असता माणसाला विष बाधत नाही. अशा प्रकारच्या अनेक दिव्यौषधींच्या साधनसिद्धी आयुर्वेदात सांगितलेल्या आहेत. प्रेतावर बसून मंत्राचे अनुष्ठान सत्रभर केल्याने प्रेतदेवता प्रसन्न होते व भूतभविष्यवर्तमान अशा सर्व ज्ञानाची प्राप्ती होते. अशा प्रकारच्या अनेक सिद्धी मंत्र व तंत्र शास्त्रांत सांगितलेल्या आहेत. कृच्छ्र, पराक, चांद्रायण अशी व्रते, पर्जन्य धारांत बसणे, पाण्यात उभे राहणे, धूम्रपानादि साधन करणे इत्यादि जी तपे आहेत ती मनामध्ये जी जी भावना धारण करुन आचरण करावीत ती ती सिद्धी प्राप्त होते. परंतु या सर्वच्या सर्व सिद्धी दृढ आसन घालून प्राणापानाचे ऐक्य करुन योगधारणा करणाऱ्या एकट्या योग्याला प्राप्त होतात.

**खरे म्हणजे साईबाबांनी सिद्धी प्राप्त करुन घेण्यासाठी मुद्दाम प्रयत्न कधीच केला नाही. ज्या काही सिद्धी त्यांना तपामुळे किंवा योगामुळे प्राप्त झाल्या होत्या, त्या**

साहजिकच प्राप्त झाल्या होत्या. तथापि या सिद्धींचे परम टोक बाबांनी गाठले ते दुसऱ्याच कारणामुळे. भागवतात श्रीकृष्ण भगवान म्हणतात :–

सांडूनि सकळ उपाये । मी एक ध्यानीं धरिल्या पाहे ।
साधकासी काय उणें आहे । दुर्लभ काये सिद्धीचें ॥१८४॥

एकनाथी भागवत अ. १५

आपणास माहितच आहे की श्रीसाईबाबा अगदी लहानपणापासून आपल्या गुरुंच्या ध्यानात मग्न असत. अ. १९ मध्ये संगमनेरच्या राधाबाई देशमुखीणला बाबांनी नाही का सांगितले?

गुरुमुखावलोकन । करावें म्यां रात्रंदिन ।
नाहीं मज भूक ना तहान । गुरुवीण मन अस्वस्थ ॥६४॥
तयावीण नाहीं ध्यान । तयांवीण न लक्ष्य आन ।
तोच एक नित्य अनुसंधान । नवलविंदान गुरुचे ॥६५॥

– अध्याय १९

आणि असे सतत ध्यानाने आपल्या गुरुशी एकरुप झाले असल्याने बाबांना आपल्या ईश्वरस्वरुप गुरुंच्या सर्व सिद्धी आपोआप प्राप्त झाल्या होत्या.

**साईबाबांनी सिद्धी कशा वापरल्या ?**

भागवतात व पातञ्जल योगशास्त्रात खऱ्या साधकाला सिद्धींपासून दूर राहण्यास सांगितले आहे :–

ते समाधावुपसर्गाः व्युत्थाने सिद्धयः ॥३७॥

– विभूति पाद

(या सिद्धी समाधी साधण्यास विघ्नकारक आहेत. संसारी माणसाला मात्र त्या ऐश्वर्ययुक्त वाटतात)

अन्तरायान्वदन्त्येता युञ्जतो योगमुत्तमम् ।
मया संपद्यमानस्य कालक्षपणहेतवः ॥३३॥

– श्रीमद् भागवत स्कंध ११ अ. १५

(उत्तम योगाचा अभ्यास करणारे व मला प्राप्त करण्याचा प्रयत्न करणारे भक्त या सिद्धींना विघ्ने मानतात कारण यांच्यामुळे त्यांच्या वेळेचा अपव्यय होतो.)

एकनाथ महाराजांनी तर साधकाने असल्या सिद्धींच्या नादी लागणे म्हणजे काशी यात्रेला गेलेल्या माणसाने तेथे वेश्येच्या नादी लागून स्वतःचा सत्यानाश करुन घेण्यासारखे आहे असे सांगून त्याचा धिक्कार केला आहे :–

पावनपावता वाराणशी । जो वस्तीसी गेला वेश्यागृहासी ।
नेत्रें भुलोनि तिच्या भोगासी । सर्वस्व तियेसी समर्पी ॥८९॥

– एकनाथी भागवत अ. १५.

हा सर्व उपदेश जाणूनच की काय बाबांनी आपल्या साधनेच्या सुरवातीला लहानपणी असल्या सिद्धींकडे ढुंकूनही पाहिले नाही. ते सदा आपल्या गुरुच्या

ध्यानात मग्न असत. ज्या काही थोड्याथोडक्या सिद्धी त्यांचेकडून प्रकट झाल्या गेल्या त्या साहजिक रितीने किंवा नाइलाजाने, उदा. अ. ५ मध्ये तेल नसताना नुसत्या पाण्याने बाबांनी जे दिवे पेटवून दाखविले ते वाण्यांच्या हट्टीपणामुळे व चुकलेल्या वाण्यांना लज्जित करुन त्यांना सन्मार्गावर आणण्यासाठी त्यांचे हातून हा चमत्कार घडला. तसेच औरंगाबादेच्या रस्त्यावर चांदपाटलाला खांद्यावर जड खोगीर घेऊन जाताना पाहून बाबांना त्याची घोडी हरवली असल्याचे व दोन महिन्यांपासून ती शोधण्याचा प्रयत्न करीत असल्याचे अन्तर्ज्ञानाने कळले असावे. म्हणूनच की काय त्याची दया येऊन त्याचेवर कृपा करण्याच्या इच्छेने बाबांकडून त्याची घोडी शेजारच्या नाल्यातून सांपडून देण्याचा चमत्कार घडला असावा. नंतरही चिलीम पेटविण्याकरिता चिमटा जमिनीत खुपसून अग्नीची ज्वाळा उत्पन्न करणे व छापी भिजविण्याकरिता सटका जमिनीवर आपटून पाण्याची धार काढणे हाही चमत्कार जो चांद पाटलासमोर दाखविला गेला तोही अजाणताच. नेहमी जंगलात बाबा एकटेच असल्याने व जवळपास अग्नी व पाणी नसल्याने ते आपली सिद्धी वापरुन चिलीम ओढण्याकरिता अग्नी व पाणी उत्पन्न करीत असावे व तेच चांदपाटलासमोर सहज अजाणता घडले गेले असावे. असो.

आयुष्याच्या उत्तरार्धात मात्र बाबांनी आपले सिद्धिसामर्थ्य वारंवार प्रकट केले. मात्र ते एकाद्या जादूगाराप्रमाणे लोकरंजनासाठी किंवा मानमान्यता मिळविण्यासाठी नव्हे तर फक्त भक्तांच्या कल्याणासाठी – याचे सविस्तर विवेचन खालील पुढच्या परिच्छेदात येईलच. असो.

**सिद्ध साईबाबांचे उत्तुंग श्रेष्ठत्व** .

लहानमोठ्या सिद्धी प्राप्त झालेले व त्यांचे चमत्कार जगाला दाखविणारे अनेक साधू, मांत्रिक व जादूगार आपणाला माहीत आहेत व आपण पाहिलेलेही आहेत. परंतु श्रीसाईबाबांच्या सिद्धींचे सामर्थ्य या सर्वांपेक्षा अत्यंत श्रेष्ठ तर होतेच शिवाय त्या सिद्धींचा योग्य व निःस्वार्थीपणाने त्यांनी वापर केल्यामुळे त्यांच्या या श्रेष्ठत्त्वाला जणू काय सोन्याचा मुलामाच चढलेला होता.

साधकांच्या सिद्धींचे सामर्थ्य त्यांच्या साधनेच्या योग्यतेप्रमाणे कमीजास्त असते. उदा. एकाद्याला क्षुद्रसिद्धीतील त्रिकालज्ञान सिद्धी असणाऱ्याला कदाचित एकाद्या व्यक्तीचे या जन्मातील भूत, वर्तमान व भविष्य सांगता येईल पण त्याला त्याच्या पूर्वजन्माबद्दल काही सांगता येणार नाही. तसेच एकाद्याला साधकाजवळ 'प्रतिस्तंभन' सिद्धी असेल तर तो स्वतः विस्तवावरुन चालत जाऊ शकेल परंतु एकाद्या घराला लागलेली आग विझवू शकणार नाही. त्यासाठी बाबांसारखा पूर्णावस्थेस पोहोचलेला सिद्धच पाहिजे. भक्तांच्या अनेक जन्माच्या कहाण्या सांगणे (अ. ४६ व ४७), एकाद्याचा मेलेला मुलगा दुसरीकडे जन्माला आलेला असला तरी त्याला परत मूळ स्त्रीच्या पोटी जन्मास आणणे (अ. ४८), दुसऱ्याच्या मनावर व बुद्धीवर ताबा ठेवून त्याला आपल्या इच्छेप्रमाणे वागण्यास भाग पाडणे (उपासनी महाराज), भक्ताला

अनायास मृत्यूचे आश्वासन देऊन त्याप्रमाणेच त्याचा मृत्यू घडवून आणणे (काकासाहेब दीक्षित) वगैरे सारख्या बाबांच्या सिद्धी ऐकल्या म्हणजे ते पूर्णांश सिद्धी प्राप्त झालेले **श्रेष्ठ सिद्ध पुरुष** होते याबद्दल शंकाच उरत नाही. परंतु यापेक्षा बाबांनी काही भक्तांना साक्षात श्रीरामप्रभू विठ्ठल वगैरे देवांच्या रुपाने दर्शन दिली होती हे ऐकून तर ते साक्षात **ईश्वरच** होते असे वाटायला लागते. अशा प्रकारची सिद्धी प्रकट केलेले संत पुरुष माझ्या तरी ऐकण्यात नाही. उगाच नाही उपासनी महाराजांनी त्यांच्या **श्रीसाईनाथमहिम्नस्तोत्रांत** त्यांना खालील विशेषणांनी संबोधले :–

अनेकाश्रुतातर्क्य लीलाविलासै :।
समाविष्कृतेशानभास्वतप्रभावम् ॥

(न ऐकलेल्या व तर्क न करता येणाऱ्या अनेक लीला करुन साक्षात शंकराचा तेजस्वी प्रभाव प्रकट करणारा)

खरे म्हणजे बाबांच्या सिद्धींचे वर्णन करावयाचे म्हणजे आकाशाला गवसणी घालण्यासारखे आहे. ह.भ.प. दासगणू महाराज म्हणतात :–

**बाबा तुमच्या लीलेचा । कोणा नलगे पाड साचा ।**
**तेथे माझी आर्ष वाचा । टिकेल सांगा कोठून ॥९८॥**

— श्रीसाईनाथ स्तवनमंजरी

तरीपण मी वर जो बाबांच्या सिद्धी-चमत्कारांचे वर्णन करुन त्यांना तर्काच्या चौकटीत बसविण्याचा प्रयत्न केला आहे तो फक्त साईभक्तांना सावध करण्यासाठी. हल्ली जगात पुष्कळसे साधू, संत व गुरु थोड्याफार सिद्धींचे चमत्कार दाखवून आपल्या मागे भोळे भक्तगण जमा करतात. अशा अर्धवट सिद्धी प्राप्त झालेल्या गुरुंचा मानपान व द्रव्य यांच्या मोहात पडून कदाचित पुढे अधःपात होण्याचा संभव असतो व त्यामुळे त्यांच्या शिष्यांचेही कल्याण होणे थांबते. म्हणून वाचकांनी अशा गुरुंच्या नादी न लागता बाबांसारख्या अगदी पूर्णत्वास पावलेल्या सद्‌गुरुचीच कास धरावी मग ते सध्या देहधारी नसले तरी हरकत नाही. देहत्यागानंतरही आपल्या भक्तांवर अनुग्रह करण्याची व त्यांना मार्गदर्शन करण्याची त्यांचेत सामर्थ्य असते.

बाबांच्या सिद्धी अति उच्च व संपूर्ण असल्याने त्यांचे श्रेष्ठत्व सिद्ध तर होतेच परंतु त्यांच्या सिद्धी त्यांनी का व कशाकरिता वापरल्या हे महत्त्वाचे आहे. वर सांगितल्याप्रमाणे बाबांनी सिद्धी मिळविण्याचा खास प्रयत्न केला नाही व त्या प्राप्त झाल्यावर त्यांचे मुद्दाम प्रदर्शनही केले नाही. वरील सर्व उदाहरणे बारकाईनी पाहिली तर आपणाला कळून येईल की बाबांनी आपल्या प्रत्येक सिद्धीचा उपयोग केवळ भक्तांच्या कल्याणाकरिताच केला आहे. कधी त्यांचा अहंकार घालविण्यासाठी, कधी त्यांना जागवून किंवा ओढून आणून पुन्हः ईश्वरभक्तीला लावण्यासाठी, कधी त्यांना संकटातून वाचविण्यासाठी, कधी त्यांच्या इच्छा किंवा मनोरथ पुरविण्यासाठी, तर कधी त्यांना सद्‌गती देण्यासाठी. अशा भक्तांच्या अनेक कार्यासाठी बाबांनी सिद्धी वापरल्या आणि त्यामुळे त्या लोकांना दिसल्या. त्यामागे मानमान्यता किंवा

द्रव्यप्राप्तीचा हेतू मुळीच नव्हता.

बाबा सदैव निष्काम । अवाप्तकाम पूर्णत्वें ॥१०४॥
इहलोकीं न प्राप्तव्य कांहीं । साध्य परलोकींही उरलें नाहीं ।
ऐसा हा केवळ लोकानुग्रही । संत ये महीं अवतरला ॥१०७॥

— अध्याय १०

तेव्हा बाबांच्या सिद्धींचे व त्यांच्या कार्याचे असे उत्तुंग व अलौकिक श्रेष्ठत्व पाहून आपली मति गुंग होते आणि त्यांना प्रत्यक्ष ईश्वराचा अवतार मानून हेमाडपंताप्रमाणे खालील ओवी आदराने व शरणागतीने म्हणाविसी वाटते :—

तो हा साई संतवर । ईश्वराचा दुजा अवतार ।
डोई तयाच्या पायांवर । ठेवितां कृपाकर ठेवील ॥१४९॥

— अध्याय ११

# गोकुळात साई

शिर्डी असे माझे साई माय
जसी गाईच्या दुधावरची साय
साई भक्तांना देती मदतीचा हात
जसा मऊ दुधभात ॥१॥
साईंच्या ठायी अहंपणा नाही
जसे दुधाचे जमते दही
साई भक्तांस मारती हाक
जसे दह्याचे बनते ताक ॥२॥
साईंची असे गोड वाणी
जसे ताकावरचे लोणी
साईंची किर्ती असे खूप
जसे लोणकडे साजूक तुप ॥३॥
साईंच्या वाणीत भरले आहे अमृत
जसे दह्या दुधाचे पंचामृत
साईंच्या नामाचा चाले जप अखंड
जसे चक्याचे बनते श्रीखंड ॥४॥
साईंच्या नामात आहे आगळी धुंदी
जसी दुधाची केशर मिश्रीत बासुंदी
साईंचे मन असे स्थिर
जशी गोड शेवयांची खीर ॥५॥
साईंचा होतो मला क्षणोक्षणी भास
जसा निरसर चीकाचा खरवस
साईंनी दिला सन्मार्गाचा सल्ला
जसा पनीरचा रसगुल्ला ॥६॥
साईंच्या भक्तित झाले मी धुंद
जसा माव्याचा कलाकंद
असे सर्व गुण संपन्न माझे साई
जशी स्वादिष्ट रसमलाई ॥७॥

**— सौ. वसुंधरा रा. चोरे**
८०३ सी, लक्ष्मी-भुवन
डॉ आंबेडकर रोड, दादर,
मुंबई-४०० ०१४.

# श्री साईनाथांचा शरणार्थी – (२७)

**लेखक : ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद**

अनुवादक : वि. बा. खेर

सस्तु साहित्य या संस्थेत ता. ११ डिसेंबर, १९५० पासून ३१ मार्च, १९५३ पर्यंत मी होतो त्या दरम्यान संस्थेने माझी खालील पुस्तके छापली व मला प्रत्येकाच्या २५ प्रति भेट देण्यात आल्या. त्यातील पुष्कळशा मी अहमदाबादच्या भक्तांना भेट म्हणून दिल्या.– (१) श्री साईबाबा (दुसरी आवृत्ति) (२) शंकराचार्य (३) मनुष्यधर्म (४) नित्यपाठ (५) सती सावित्री (६) श्री प्रल्हाद (७) जडभरत (८) अंबरीष (९) शुकदेवजी (१०) गजेन्द्र मोक्ष (११) मस्तराम (१२) ज्ञानदेव व चांगदेव पासष्टी (१३) धर्मकथा (१४) जप व नामस्मरण.

१९५१च्या चैत्र मासात सप्तमी, अष्टमी व नवमीला श्रीसाईबाबांच्या नाटकाचा प्रयोग व सतार महाराजांचे भजन श्री. हर्षदभाई महेता यांनी बडोद्याला ठेवले होते. तसेच श्रीसाईबाबांच्या मंदिराचे उद्घाटन व्हावयाचे होते. त्यासाठी मला खूप आग्रहपूर्वक प्रमुख पाहुणे म्हणून नेले होते. त्या मंदिराच्या उद्घाटनानंतर श्रीसाईमहाराजांवर मी प्रवचन केले, ते काहीना खूपच आवडले. प्रवचनानंतर प्रश्न विचारण्यात आले, त्यांना समर्पक उत्तरे देण्यात आली. कोणी बटुभाई गोपालजी देसाई यांनी प्रवचनावर काही टीका केली, तिला पण योग्य उत्तर दिले. असे म्हणतात की, बटुभाईंनी टीका केल्यानंतर त्यांचा चेहरा सुजला व तोंडाल फोड उठले, जे दोन-तीन दिवसांनी बरे झाले. त्यांना हे दुःख झाले हे ऐकून मला ठीक वाटले नाही. नंतर मी त्याच रात्री अहमदाबादला परतलो, बटुभाईसुद्धा अहमदाबादला परतले.

उद्घाटनाच्या प्रसंगी हर्षदभाईंच्या पत्नींची ओळख झाली. त्या मे महिन्यात त्यांचा मुलगा व त्यांची नणंद कुमुदबहेन भीखुभाई रावल यांच्यासह मला भेटण्यास आल्या. कुमुदबहेनचा प्रथम परिचय उमरेठमधे जणू काय स्वप्नात केव्हा तरी झाला होता,असे त्यावेळी वाटले. थोडेसे गेंगाणे बोलणाऱ्या व हिरवीसाडी परिधान केलेल्या देवीचे स्वप्नात दर्शन झाले व नंतर लक्ष्मीदेवीचे दर्शन झाले, तेव्हा चेहऱ्यावर जी चिन्हे पाहिली, ती चिन्हे कुमुदबहेनच्या चेहऱ्यावर असल्याचा भास झाला म्हणून त्यांच्याविषयी मला आपुलकी वाटली. लीनुभाईंचे त्यांचेकडे येणेजाणे होते. त्यांचे बरोबर कुमुदबहेनचा निरोप आला,म्हणून १९५१च्या जुलै-ऑगस्टमधे एका रविवारी मी त्यांच्याकडे गेलो होतो. त्यावेळी मी त्यांना विचारले,

"देवी (माताजी) हे फार उग्र दैवत समजले जाते. तिच्या पूजा-अर्चनात थोडीशी जरी चूक झाली तरी तिला ती सहन होत नाही, म्हणून तिची पूजा-अर्चा व पाठ आदि मी करत नाही. या बाबतीत तुमचे काय मत आहे?"

त्या म्हणाल्या, "देवीला (माताजीला) भिण्याचे कारण नाही. विधिविधान व सर्व नियमांचे कडक पालन इत्यादि फक्त सकाम भक्तासाठीच आहे. निष्काम भक्ताला

भिण्याची जरुरी नाही. ज्याला मालकाकडून वेतनाची अपेक्षा असते, त्याला नियमानुसार चोख नोकरी करणे प्राप्त आहे. त्यात कसूर झाल्यास पगार कसा मिळणार? पण जो निष्काम सेवा करतो, जो सेवेच्या बदल्यात काही घेत नाही, त्याला मालक म्हणणार तरी कांय?''

यावेळी संसार त्याग करुन संन्यास घेण्याची माझी इच्छा, तसेच आवश्यकता त्यांना सांगितली व त्यावर चर्चा केली. १९१६ सालापासूनच माझी संन्यास घेण्याची इच्छा होती व आता संन्यास घेण्यास समय पक्व झाला होता.

• बापूसाहेब जोगांची इच्छा नसतानासुद्धा उपासनी महाराजांनी त्यांना शेवटी संन्यास घ्यावयास लावला. शिवाय कुमुदबहेन पण एकदा बोलता बोलता म्हणून गेल्या 'श्रीसाईमहाराजांचा बाबू तो कसा असणार? फकीरांतील फकीरच असणार.'' माझ्या मातोश्रीच्या निधनानंतर तिची सर्व क्रिया उरकून वर्षश्राद्ध केल्यानंतर माझा संन्यास घेण्याचा विचार होता. परंतु श्रीसाईमहाराजांच्या पुस्तकाची प्रवृत्ति तसेच श्वेतवस्त्रातील स्थितीत होणारी गुरुसेवा व जनसेवेची अनुकूलता ही संन्यास घेतल्यावर शक्य होणार नाही, या विचाराने संन्यास घेणे लांबणीवर पडले. उर्वरित आयुष्यातील शेवटच्या टप्प्यात संन्यास घेण्याचा निश्चय तर होताच. कुमुदबहेनच्या वरील उद्‌गारांनी राधाकृष्णआई वारंवार ज्या वचनांचा उच्चार करी, त्यांची आठवण झाली. अकरा महिने शिरडीत राहून घरी परतलो त्यावेळी ती खूप रडली व एकदा जेव्हा मी शिरडीत राहण्याऐवजी मुंबईला परत जाण्याचा विचार केला, तेव्हा स्वगत पण मोठ्याने म्हणाली, ''आम्ही एवढे अश्रू ढाळले, ते सर्व फुकटच ना? तुला बाबा बाबू म्हणून संबोधतात ते व्यर्थच ना? वगैरे'' यावरुन राधाकृष्ण आईचे म्हणणे काय होते, ते स्पष्ट होते. अनुकूल वेळ येताच लवकर संन्यास घेण्याचे मनात नक्की केले व नंतरच हा विचार कुमुदबहेनसमोर मांडला.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी मनु सुभेदार मुंबईहून आले होते, ते संध्याकाळी प्रकाशनंदजींचे दर्शन घेण्यास निघाले. तेव्हा मला आपल्या बरोबर घेऊन गेले. सुभेदारांसाठी खुर्ची ठेवली होती त्यावर ते बसले व मी खाली बसलो. सुभेदारांनी काही प्रश्न विचारला, त्याचे उत्तर प्रकाशनंदजींनी दिले. त्या संबंधी काही युक्ति मला स्फुरताच, मी सुभेदारांना ती सांगितली. सुभेदारांनी प्रकाशनंदजीना त्यासंबंधी विचारता, प्रकाशनंदजीनी सहमति व्यक्त केली. परंतु हा सर्व प्रसंग माझ्या स्मृतीतून सरकला आहे, असे वाटते. कदाचित अर्जुनाप्रमाणे.

चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद् दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥

भगवद्‌गीता, ६–३४

हा श्लोक म्हणून सुभेदारांनी प्रश्न केला असावा व प्रकाशनंदजीनी रीतसर उत्तर दिले असेल व मी असे म्हणालो असावा की, मन भगवंताला अर्पण झाले पाहिजे व जर ते खरोखर अर्पण झाले असेल तर ते आपले रहात नाही व ते आपले नसले, भगवंताचे

खरोखर झाले असले, त्याच्या संपूर्ण स्वाधीन झाले असले, तर आपल्या स्थिरतेचा-अस्थिरतेचा विचार करण्याचा प्रश्नच उरत नाही, आपण तर प्रेक्षकाप्रमाणे राहिले पाहिजे. याचा अर्थ असा नव्हे की, मन कुमार्गाने जाण्यास प्रेरित झाले तर कुमार्गाने जावे. 'मन गया तो जाने दे, मत जाने दे शरीर' * या सुप्रसिद्ध उक्तिला अनुसरुन त्याचे अक्षरशः पालन करुन साक्षीवत् राहण्यात आनंद असावा.

१९५२ मधे मनुसुभेदारांनी डाह्याभाई रामचंद्र + यांची दोन-तीन पुस्तके माझ्याकडे पाठविली व त्यांनी लिहिलेल्या विषयावर एक पुस्तक तयार करण्यास सांगितले. डाह्याभाईंची सर्व पुस्तके मी वाचून काढली परंतु त्यात सुभेदारांनी सांगितलेल्या विषयावर पुस्तक तयार करण्यास जरुर ती माहिती सापडली नाही. म्हणून त्या विषयावर संतोषकारक लिखाण करण्यास काय करावे या चिंतेत असता एका सकाळी कुमुदबहेनकडे गेलो. त्या काही लिहित होत्या. ते पुरे करुन त्यांनी माझ्या हातात ठेवले. त्यात असे होते की, परमात्मा प्राप्ति किंवा आत्मदर्शनासाठी नचिकेत सारखा दृढ निश्चय व सर्व कामनांचा संपूर्ण नाश झाला पाहिजे. आत्मदर्शनाचे मुख्य साधन जप आहे. मन एकाग्र करावे. जीवनात एकाच मंत्राला घट्ट धरुन रहावे. आत्मदर्शनाचे पथ्य आहे संयम व मनोनिग्रह दुसरा मार्ग– प्रत्येक मानवास तसेच सचराचर जगतास ईश्वराचे संपूर्ण स्वरुप मानल्यास आत्मदर्शन होऊ शकेल.

या सुमारास बडोदे येथे श्री साईसच्चरिताचे पारायण केलेल्या एका भाविक भक्ताची भेट झाली. त्याने मला भिक्षेसाठी बोलाविले त्यावेळी मी त्याला सांगितले की, जप व नामस्मरण या विषयावर पुस्तक लिहित आहे. त्या भक्ताकडे 'गुरुगीता' होती व त्या पुस्तकाच्या शेवटी रामचंद्र कृष्ण कामत चंदगडकर यांचे 'नामजप' या पुस्तकाची जाहिरात होती. तिच्याकडे माझे लक्ष वेधून तो म्हणाला, "या पुस्तकाचे दोन भाग तयार आहेत व ते मिळाल्यास तुम्हाला फार उपयोगी होतील." म्हणून या पुस्तकाचे दोन्ही भाग मागविले व वाचले. त्यातील माहिती 'जप व नामस्मरण' हे पुस्तक तयार करण्यास उपयुक्त ठरली.

कुमुदबहेनची व दक्षिणी बुबांची मदत अनपेक्षित व अकल्पित होती. म्हणून ती अदृश्य ईश्वराने केली, असे मी समजलो. प्रभूला या कार्यासाठी तसदी घ्यावी लागली, हे मला खटकले. पोटासाठी प्रभूस अशी तसदी प्राचीन संत देत नसत. आणि जर प्रभूस अशी तसदी घ्यावी लागली किंवा प्रभूने घेतली असल्यास, पुनः असा प्रसंग येऊ

---

*मन गया तो जाने दे, मत जाने दे शरीर ।
ना खेचे कमान फिर कहाँ लगेगा तीर ॥ (कबीर)

+ डाह्याभाई रामचंद्र महेता यांची 'गायत्री उपासना'– ३ खंड 'सरळ योगशिक्षा' – ३ खंड, 'ॐकार उपासना' व 'सोहम् उपासना' ही पुस्तके अहमदाबादच्या महादेव रामचंद्र जागुष्टे यांनी प्रकाशित केली आहेत.

नये म्हणून असे लिखाण करण्याची जबाबदारी शिरावर घेऊ नये,असे वाटले. शिवाय त्यातील १०-११-१२ प्रकरणात आद्य बीज ॐ कार, प्रणव मंत्र ॐ कार, स्वयंभू ॐकार, सोहम् व अजपाजपाविषयी जे लिहावे लागले,ते अधिकाराशिवाय प्रतिबंध असूनही छापावे लागले – जरी मी त्यात सर्वांना न सांगण्यासारख्या गोष्टी अंतर्भूत केल्या नाहीत– ते मला रुचले नाही. जणू काय असे करण्यात गुरु-आज्ञा-भंग किंवा चूक मी करत आहे,असे वाटल्यामुळेही सस्तु साहित्य सोडण्याचा विचार दृढ झाला. शिवाय हे पुस्तक तयार करण्यात पाच एक महिने झाले,तेव्हा मनु सुभेदारांचा धीर संपत आल्यासारखे वाटले. दोन-तीन वेळा पुस्तकासाठी तगादा लावल्यामुळे माझे मन उडाले, कारण माझ्या सिद्धांताप्रमाणे जेव्हा लिहिण्यास दैवी स्फुरण होई,तेव्हाच लिहिण्यास मी उद्युक्त होई. नुसते कसे तरी लिहून काढणे,मला पसंत नव्हते. अशा लिखाणाची माझ्या नजरेत काहीच किंमत नव्हती.

शिवाय सस्तु साहित्यकडून मला दर तीन महिन्यांनी रक्कम मिळे. त्यातून काहीच बचत होत नसे. एवढेच नव्हे तर,काही वेळा तर माझ्या पुंजीतून खर्च करावा लागे. यामुळे विचार आला की,आपल्याला कधी लाख रुपये मिळणार नाहीत किंवा आपण लाखोपती होणार नाही. निवृत्तिसाठी पुरेसा पुंजीसंचय करण्याच्या आशेत आयुष्य संपून जाईल. म्हणून अनुकूल संधि साधून निवृत्त व्हावे व संन्यास घ्यावा हे श्रेयस्कर.

१८ तारखेस * सकाळी मी माताज़ी (देवी)कडे द्राक्षाचा प्रसाद घेऊन गेलो. त्यातील थोडा भाग २४ वेळा माताजीच्या (देवीच्या) मुखात देऊन मी म्हणालो, 'संन्यास घेण्यापूर्वी गायत्री-विसर्जन करावे लागते,ते मी या रीतीने करत आहे,हे जाणावे.' गाणगापुर स्टेशनवर शेठ (रतिलाल चीमनलाल) यांनी (२२ मे, १९४८ रोजी) ज्या खांबाला रझाकारांनी स्टेशन मास्तरला बांधून ठेवले,तो खांब दाखविला. रझाकार स्टेशनबाहेर शस्त्रास्त्रांनी सज्ज होऊन उभे होते. गाडी (मद्रास मेल) फलाटावर येताच तिच्यावर ते तुटून पडले व प्रत्येक डब्यामधे जाऊन लूटमार सुरु केली. भय, गोंगाट, कोलाहल, मारफाड यांनी सर्व वातावरण व्यापून गेले. रतिलाल शेठ व त्यांचे साथी सेकंड क्लासच्या डब्यात दारखिडक्या बंद करुन, साई भगवंताचे स्मरण करीत, आपले काय होईल,या चिंतेत गर्क होऊन बसले होते. पण असे नवल झाले की,रझाकारांना त्यांचा डबा दिसला नाही. खिडकीच्या फटीतून पाठीमागील सर्व डब्यात जुलूम चाललेला होता, ते शेठ रतिलालना समजले. हा साईस्मरणाचा अगाध प्रभाव होता,असे ते व त्यांचे बरोबरचे साथी व उतारु समजले व असेच ते सर्वांना सांगत.

शिरडीहून परतल्यावर मुंबईत केशवरामकडे मुक्काम केला.तेथे पहाटे उठून बसलो असता आवाज ऐकू आला, 'आता तू आपले नाव बदलून साईशरण हे नाव धारण कर.' म्हणून चर्नीरोडला गव्हर्मेंट प्रिंटिंग प्रेसमधे गेलो व तेथे नाव बदलून साईशरण नाव घेतल्याची खबर दिली व त्याच्यासाठी रु. ६ भरुन पावती घेतली. ती

* १९५२ साली १८ ऑक्टोबर-नोव्हेंबरला किंवा त्या सुमारास लेखक यात्रेला गेले.

खबर ६ डिसेंबर, १९५२च्या बॉम्बे गव्हर्मेंट गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाली व त्याची प्रत माझ्याकडे आली. त्या गॅझेटच्या आणखी ६ प्रति मी मागवून घेतल्या.

यात्रेहून परत आल्यावर मनु सुभेदारांस मुंबईत भेटून मला निवृत्त करण्याची विनंती केली. त्यावेळी संन्याशाला आधुनिक काळात तोंड द्याव्या लागणाऱ्या अडचणींची चर्चा झाली. माझा निश्चय पाहून त्यांनी मला सेवेतून मुक्त करण्यास संमति दिली व ३१ मार्च, १९५३ला मी सस्तु साहित्य कार्यालयातून निवृत्त झालो.

त्याच दिवशी सौ. कुमुदबहेन मला भेटल्या व 'तुमचा संन्यास सफल होवो' अशा त्यांनी शुभेच्छा दिल्या व २५ जून, १९५३च्या पत्रात अशी सूचना केली की 'आषाढ महिना जवळ येत आहे तेव्हा एका जागी स्थिर होऊन रहावे. बाबा प्रत्येक गोष्ट सांभाळून घेतील. त्यांचा आधार घ्यावा. जो ईश्वरास शरण जातो त्याचा संभाळ ईश्वर करतो. म्हणून आत्म्याच्या आवाजाविरुद्ध काही करु नये. प्रसन्न चित्ताने योग करा. आत्म्याला खूप मुक्त विहार करु द्या. एकांतवास कराल तर सर्व काही ठीक होईल.'

१५ एप्रिल १९५३ला भजनाच्या खोलीशिवायचा सर्व घराचा कब्जा व्रजलालभाईंना दिला. त्यांनी रविवारचे भजन चालू ठेवण्यास संमति दिली. नंतर रामबाग डाकोर येथे गं. स्व. गौरीबेन भट यांचेकडे १३ मे १९५३ पर्यंत राहिलो. २० मे, १९५३ला गौरीबेन व घनश्यामभाईसह शामळाजी, खेडब्रह्मा, मोटा अंबाजी येथे गेलो. अंबाजी येथे श्री भिखुभाई व सौ. कुमुदबहेनच्या सांगण्यावरुन भक्तजी नावाच्या माताजीच्या अनन्य भक्ताशी समागम केला. कुमुदबेनची दम्याची व्याधि दूर करण्यास त्यांना विनंती केली असता त्यांनी असमर्थता दर्शविली. कर्म भोगून संपवून टाकावे म्हणजे काही बाकी उरणार नाही असे ते म्हणाले. ८ जून, १९५३ ते २८ जून १९५३ पर्यंत तलोद येथे घनश्यामभाई पंड्यांकडे मुक्काम केला. दरम्यान एक दिवस सकाळी मी स्नान करत असता घनश्यामभाईंचे सद्गत पिता भगवतप्रसाद दिसले व मला म्हणाले, 'मी माझ्या चिरंजिवाची खबर काढण्यास आलो आहे.' ही गोष्ट मी घनश्यामभाईना सांगितली व आपल्या पित्याचा फोटो पूजेत दुसऱ्या फोटोंसह ठेवण्यास सांगितले व त्यांनी तो सल्ला अनुसरला.

नंतर २९ जून, १९५३ रोजी गौरीबेनसह रामबाग डाकोरला गेलो व तेथे पूर्वाश्रम-परिचित श्री. गंगाशंकर शुक्ल भेटले. त्यांना मी संन्यासासाठी विरजा-होम करु शकेल अशा कोणी जाणत्या ब्राह्मणाची चौकशी करुन माझी त्याच्याशी गाठ घालून देण्याची विनंती केली. त्यांनी [illegible] संन्याशी [illegible] ब्राह्मण हे कार्य करी त्याचा तपास केला असता तो [illegible] असून थोड्याच दिवसात [illegible] येणार असल्याची खबर समजली. हा [illegible] ज्येष्ठ वद्य १४च्या संध्याकाळी शुक्रवारी रणछोडरायच्या मंदिरात [illegible]. त्याने संन्यासासाठी मुहूर्त आषाढ शुद्ध १ला रविवार ता. १२ जुलै, १९५३ रोजी आहे, व तो दिवस अनुकूल नसल्यास, चातुर्मासानंतर कार्तिक, मार्गशीर्ष [illegible] वाट पहावी लागेल असे सांगितले. यावेळी मला बाबांचे शब्द तसेच रणछोडजींची वाणी ऐकू आली: तुरंत संन्यास घे

आता दिरंगाई करु नकोस.' म्हणून केशवलालला सांगितले की संन्यास घेण्याचे तर नक्कीच आहे, परंतु मला दुसरा गुरु करायचा नाही. कारण आचार्यांकडून महावाक्यांचा जो उपदेश घ्यावयाचा असतो तो मला माझ्या गुरुने अगोदरच दिला आहे, आणि त्याने हे ज्ञान अनुभवासहित दिले असल्याने आता दुसरा गुरु करणे नाही. तेव्हा याप्रमाणे जर होत असेल तरच विधि करायचा आहे. केशवलालजी बरोबर शुक्ल नावाचा एक दुसरा गृहस्थ होता. त्याच्या सूचनेवरुन केशवलाल या अटीवर संन्यासविधि करण्यास कबूल झाला.

दक्षिणा वगैरे नक्की केली व त्याच्या सांगण्यानुसार विधिची सुरुवात रविवार ता. १२ जुलै, १९५३ रोजी दुपारी तीन वाजता झाली. त्या दिवशी विष्णुपूजन, सभ्यप्रार्थना, त्याची संमति, ग्रंथपूजन, अनुवादक-पूजन, हेमाद्रि संकल्प, सत्यांशपूजन, पूर्वांग विष्णु श्राद्ध, गोदान, पूर्वांग ब्रह्मा, पूर्णपात्र, प्रायश्चित्तद्रव्य, उत्तरांग विष्णु श्राद्ध, उत्तरांग गोदान, अग्नि, ब्रह्मा पूर्णपात्र, भूयसि दक्षिणाविधि, क्षौरकर्म, आचार्यपूजन वगैरे विधि त्या दिवशी झाले. दुसऱ्या दिवशी, सोमवारी, विष्णूपूजन, अष्टश्राद्ध, ब्राह्मणपूजन, गोदान, आचार्यपूजन, ब्राह्मणांना वस्त्रदान व ब्राह्मणांना भोजन वगैरे विधि पार पडले. त्याच दिवशी संध्याकाळी पुनः गणपति पूजन, स्वस्तिपूण्याहवाचन, मातृका, वैश्वदेव, वासोधीश, नान्दीश्राद्ध, अग्निपूजन, भूयसी, सावित्रीप्रवेश हे विधि तसेच दक्षिणा आदि झाल्यानंतर अग्निची स्थापना करुन तयार केलेला साथवो * खाण्यास, अग्नि प्रज्वलित ठेवण्यास तसेच जागरण करण्यास मला सांगण्यात आले. त्याप्रमाणे साथवो खाऊन रात्री अग्निजवळ मी पडून राहिलो. तिसऱ्या दिवशी, मंगळवारी आषाढ शुद्ध तृतिया, जुलै १४, १९५३ या दिवशी जे विधि झाले ते असेः गणपतिपूजन, मातृकापूजन, अग्निपूजा, ब्रह्मापूजा, विरजा-होम; ब्राह्मणपूजन, पूर्णपात्र आचार्यपूजन विधि, सर्वस्व त्याग विधि.त्यानंतर गोमतीवर जाऊन तेथे एकांतात घाटावर विधिपुरस्सर स्नान, प्रेषोच्चार, महामंत्रोच्चार आणि काषाय-भगवी वस्त्रपरिधान वगैरे करण्यात आले. कोण्या अज्ञात व्यक्तिने मोघीबहेनला अश्विनीकुमारवर ध्यानस्थ बसलेले पाहून मृगचर्म भेट म्हणून दिले होते ते नरेन्द्रने मला दिले होते व बरोबर डाकोरला आणले होते ते आता उपयोगी पडले.

प्रथम दिवसाचा विधि संपल्यावर केशवलालने असा प्रश्न उपस्थित केला की, दुसऱ्या कुणी संन्यासी गुरुकडून दिक्षा घ्यावयाची नसल्यास वस्त्र परिधानाचा विधि कोण करणार? त्याला स्वतःला तो अधिकार आहे? म्हणून घरी जाऊन रात्री उशिरापर्यंत धर्मसिंधु, निर्णयसिंधु पालथे घातल्यावर त्याला स्वतःला तो अधिकार असल्याची आधारवचने सापडली. त्याप्रमाणे त्याने तो विधि पार पाडला.

एकाच दिवसात संन्यास सामुग्री तयार करायची होती म्हणून अहमदाबादला जाऊन पैसे आणणे शक्य नव्हते. शिवाय रथयात्रेचा समय असल्यामुळे यात्रेकरुंवर

* गव्हाच्या व डाळ्याच्या पीठाचं मिश्रण – तूप आणि साखर मिश्रित.

इन्जेक्शन घेण्याची सक्ती होती. म्हणून आयत्या वेळी गौरीबहेनला उमरेठला जाऊन पैशाची सोय करणे शक्य नव्हते. अशा अडचणीच्या प्रसंगी बाबांनी अनेकांना प्रेरणा करुन प्रश्न सोडविला. या कामासाठी गौरीबहेननी रु. ९, रुक्ष्मणीबहेनने रु. ५९, गुणीबहेनने रु. १०, मणिबहेनने रु. ३० उसंने दिले म्हणून सर्व विधिविधान पार पडले व मी आषाढ शुद्ध तृतियेला, १४ जुलै, १९५३ रोजी संन्यासी झालो. सांगणे न लगे की सर्वांचे पैसे लगेच दशमीपर्यंत चुकते केले.

# मनोरथ पूर्ण करी साईनाथ

– **श्री. वि. म. हटवार**
१४९, रेशीमबाग, नागपूर-९.

साईभक्तांनी सतत जागृती आणि उत्साह ठेवून कुशल कर्म् करीत गेले पाहिजे. या विश्वांत गीला, भागवत, पोथी आदि ग्रंथ सर्वमान्य आहेत. या श्रेष्ठ ग्रंथांना सर्व साधुसंत नमतात व योग्यतेनुसार शिष्यांना उपदेश करतात, भारतभूमीत दत्तात्रयासारखे, गोरक्षनाथासारखे नवनाथ व ती परम्परा चालविणारे श्रीज्ञानदेव, मुक्ताबाई, मीराबाई यासारखे जीवनमुक्ती दान देणारे झालेत. तसेच शिर्डीचे साईनाथ व शेगांवी गजानन महाराज यांनी भक्त उद्धाराचे अमोल कार्य केले.

स्वानंदाच्या प्राप्तीकरिता सत्संग म्हणजेच संतचरित्राचे ध्यान करीत त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करीत सुखासमाधानाने जगावे. दयाळू साईराम जातपात, सत्ता, भेटलेल्या भक्ताची गरिबीची अथवा वैभवाची स्थिती न जाणता फक्त भावाचा भुकेला आहे. त्याचे चरणी नम्र होऊन प्रार्थना करावी. मनुष्य जन्मात सर्वकाही मनासारखे होण्याकरिता सदासर्वकाळ ईश्वरनामाचे स्मरण व चिंतन श्रेष्ठ भक्ती आहे. संकटसमयी साईराम कोणत्याही रुपात येऊन सुटका करील. जेव्हा पाण्यात तरंगत असलेले फूल सोंडेने उचलून भगवंताचे स्मरण केले तेव्हा मगरीने तलावात ओढलेला गजेंद्राचा पाय सुटला. गजेंद्रमोक्षाकरिता क्षणाचा विलंब न करता भगवान प्रगट झाले. तेच भगवंत द्रौपदीच्या साहयार्थ आले. वस्त्रे पुरवून दु:शासनाचा द्रौपदीवस्त्रहरण करण्याचा दुराग्रह नष्ट करुन, त्यास हताश होऊन बसावे लागले. वस्त्रांचा ढीग पडला आणि द्रौपदीची लाज राखली. अर्जुनाचा सारथी बनून दुष्टांचा संहार केला.

या वैज्ञानिक युगात निरक्षराच्या रुपात अवतरून स्वामी रामकृष्ण परमहंसांनी धर्म जीवनात उतरविला. शुभ कर्मांनी आपले चित्त शुद्ध करुन घेणे यातच धर्माचरणाचे सार सामावले आहे. जे सज्जन धर्मनिष्ठा अंगी बाणवतात, तेच अध्यात्मविद्येच्या अधिकारी असतात. भक्तीरसाची गोडी असलेला भक्त जेथे जाईल तेथील वातावरण

सुमंगल होते. त्याच्या सहज बोलण्यातून, दृष्टीतून व निरागस हास्यातून अमृताचे निष्पन्द बाहेर पडतात. त्याचे आचरण अनेकांना मार्गदर्शक व स्फूर्तिप्रद ठरते.

श्रीसाईबाबा स्वतःचा कोणताही अधिकार सांगत नसत. ते बोलताना आपल्याला परमेश्वराचा बंदा म्हणजे त्याचे आज्ञेनुसार कर्म करणारा सेवक म्हणून घेत. तसेच आपल्या गुरुचा आशीर्वाद आपल्यास पूर्ण आहे. त्यांचेचे कृपेने भक्तसंकटे दूर होऊन सर्वांचे कल्याण होते, असे ते म्हणत. जीवनमुक्त अवस्था असल्यामुळे ते कधी ओढ्यावर जाऊन बसत, कधी लिंबाजवळ तर कधी कोणाच्या मळ्यांत जाऊन बसत. कधी निरागस हास्यवदन तर कधी उग्ररुप धारण करीत. मशिदीत व देवळात दिवे लावून चैतन्य निर्माण करुन लोकांचे हित करण्याचा हेतू होता. संकटाची ते आगाऊ सूचना देत असत. आपल्या श्रद्धास्थानी दर गुरुवारी व शुक्रवारी ऊद जाळावा, त्यात आपले कल्याण आहे असे ते सांगत.

शिर्डीला संस्थानचे रूप आल्यावर रोज महाराजांची आरती होऊ लागली. महाराजांचा नित्यक्रम पहाटेस उठून धुनीपाशी बसणे, शौचविधी नंतर काही वेळ स्वस्थ बसणे. चिलीम ओढून झाल्यावर तोंड धुताना हातावर, पायावर, तोंडावर व कानांवर यथेच्छ पाणी घ्यावयाचे. स्वच्छता कार्य आटोपून गावांत भिक्षेला जात. नेमक्या पाच ठिकाणी जाऊन उभे राहत. भिक्षेतील भाकरी व जे काहीं मिळे ते मशिदीत आल्यावर थोडेसे खावयाचे. खाणे झाल्यावर काही वेळ बैठक होत असे. त्यावेळी बरीच भक्तमंडळी जमत असे. महाराज बोधप्रद गोष्टी सांगून सर्वांना आलेली फळे खाऊ घालीत. बैठकीनंतर महाराज लेंडीवर जात. तेथे तासभर राहत. तेथून परत आल्यावर दुपारी दोन वाजेपर्यंत मशिदीत असत. तेथे बाहेरगांवाहून आलेली मंडळी महाराजांची पूजा आरती करीत असत. ते आटोपल्यावर महाराज पुन्हा लेंडीवर जात. तेथून परत आल्यावर संध्याकाळपर्यंत पुन्हा मशिदीत बसत. संध्याकाळी थोडे बाहेर पडत व लगेच मशिदीत येत असत. महाराज आपल्या बोलण्यांतून बैठकीस हजर असलेल्या मंडळींच्या मनात घोळत असलेल्या बाबींसंबंधी खुलासा करीत असत. त्यांचा मुख्य उपदेश नैतिकतेवर म्हणजे आपली नितिमत्ता सर्वांनी चांगली ठेवून नामस्मरण करण्यावर असे. अनुभवरुपाने बोध महाराजांकडून मिळत असे. श्रीसाईबाबा प्रत्यक्ष परमेश्वराचे अवतार असून स्वतः मनोभावे केलेली प्रार्थना त्यांना पोहोचते, याचे प्रत्यंतर साईभक्तांना श्रद्धेने आलेले आहे. त्यांच्या समाधीचे दर्शन, त्यांचे नामस्मरण, मनन, वाचन, लेखन वगैरे करीत असल्यास हा अनुभव खात्रीने येतो.

परमार्थ हा विषयच असा आहे की, त्यामध्ये थोड्याफार श्रद्धेवाचून पाऊल पुढे पडत नाही. श्रीसाई जन्मसिद्ध सत्पुरुष होते. परमार्थ साधकांस यशप्राप्तीकरिता गुरुकृपा पाहिजे. श्रद्धा व सबुरी हाच त्यांच्या भक्तांना उसंत देणारा गुरुमंत्र आहे. श्रीचरणी मागणे असेल ते भक्तीभावाने आणि दृढ विश्वास ठेवून मागावे. मनोरथ पूर्ण होतील. हाच त्यांचा सर्वांना आशीर्वाद आहे.

# सौदागराचे घोडे

– श्रीमती शालिनी देसाई
एम.एस्सी., एम.फिल.
२१ राजस, अंधेरी (पूर्व),
मुंबई-४०० ०६९.

श्री सन्तचूडामणी साईंचे मुखातून स्त्रवलेली जी वाणी श्री साईसत् चरित्रात उद्धृत केली आहे, त्याची मेख वाचकांना कधी सुटते तर कधी सुटतच नाही. 'सौदागराचे घोडे' असेच एक श्रीसाईसत् चरित्रातील (अध्याय २१, ओवी ८८) मजेशीर कोडे आहे. प्रगाड पंडित प्रति हेमाडपंत असे श्रीसाईचरित्राचे लेखक श्री. दाभोळकर यांनी बऱ्याच ठिकाणी अगदी आवर्जून, खुलासा करुन, वाचक भक्तांना तत्त्वज्ञानाचा मधूर मेवा खाऊ घातला आहे. पण तरीसुद्धा वाटत राहते, आणि हवे, आणि हवे. एखादे हावरट मूल जसे मिठाईला चटावले की, कसे आईकडे हात पसरुन एकसारखे मागत राहते, "मला आणखी दे ना ग आई", तसेच साईंचे चरीत्र वाचताना वाटते, संपूच नये हा साईतत्वज्ञानाचा खाऊ आणि हवा होता. पण श्रीसाईबाबांचे तत्त्वज्ञान विशद करुन सांगणे सोपे नाही, त्याला खडतर तपस्या लागते. तरीही ब्रह्मजिज्ञासूंच्या बुद्धिची भूक शमावी म्हणून अति मौल्यवान मालेतून एखादा मौक्तिक हाती धरुन बराच वेळ न्याहळत बसावं, तसं साईमुखीचं एखादं वचन चिन्तन करीत रहावं असं वाटतं आणि अशाच एका चिन्तनशील मननाने सौदागराच्या घोड्याच्या कोड्याचा प्रश्न सोडविण्याचा केला गेलेला हा एक साईप्रियेचा प्रयत्न!

श्री. अनन्तराव पाटणकर म्हणून कुणी व्यासंगी गृहस्थ उपनिषदांचा (वेदान्ताचा) सखोल अभ्यास करुनही आत्मज्ञानासाठी तळमळू लागले. प्रखर ज्ञानपिपासा शान्त व्हावी म्हणून अखेरीस ते श्रीसाईपाशीं आले. 'केले विविध ग्रंथावलोकन। वेदवेदागउपनिषदध्ययन। केले सच्छास्त्र पुराण श्रवण। परी हे निर्विण्ण मन कैसे ॥७९॥ वाचिले ते व्यर्थ गेले। ऐसेच आता वाटु लागले।... ॥८०॥ वाया गेले ग्रंथावलोकन। वाया शास्त्रपरिशीलन। व्यर्थ हे सकल पुस्तकी ज्ञान। अस्वस्थ मन हे जोवरी ॥८१॥'. अशी त्या साधकाची अवस्था साईचरित्रात वाचत असताना, त्या तळमळीचा अनुभव ज्याला असतो, त्यालाच ते आक्रन्दन आकळते. श्रीसाईचरित्रातील या ओव्या वाचत असताना डोळ्यासमोर आले, ते 'नासदीय सूक्त'. ऋग्वेदसंहितेच्या दहाव्या मंडळाच्या अकराव्या अनुवाकातील हे प्रथम सूक्त. यातील सहावी ऋचा अशीच मनाचा वेध घेणारी. ब्रह्मज्ञानाची लालसा असलेल्या तपस्वी द्रष्ट्या ऋषी मुनींच्या तीव्र, पराकाष्ठ मुमुक्षतेच्या तळमळीतून सहजतेने स्फुरलेले ते मन्त्र, 'को अध्दा वेद क इह प्रवोचत॥' ना. सू. ऋ. १०/११/मन्त्र ६ अर्थ: (अहो) हे (आत्मतत्त्व) खरे खरे कोणी जाणले आहे? या वेळी (हे आत्मज्ञान) विवरण करुन (आम्हाला) कोण सांगेल? अशा प्रकारची मुमुक्षु साधकाची प्रचंड तयारी आणि

तळमळच त्याला भगवन्ताचे दर्शन घडवत असते. अशा साधकांना श्री गुरु जे सांगतात, ते इतर सामान्य भक्ताना कसे कळावे? गुरुवाणी केवळ त्याच भक्तश्रेष्ठांसाठी असते, जे त्या पात्रतेचे असतात. कारण तो साधक तितक्याच योग्यतेचा असल्याने गुरुशब्दाने बोध होताच त्याची तृप्ती होते. जसे स्वाती नक्षत्राचे पाणी सगळ्यांवरच वर्षत असते, पण केवळ विशिष्ट शिंपल्यातच त्या जलबिंदूच्या संयोगाने मोती बनतो. तो अनुभवजन्य स्पर्श असतो. तरीही सर्वांना वाटणे साहजिक असते, 'देवा, आम्हालाही बाबांचे बोल समजतील तर किती छान होईल!' पण 'बोल' म्हणजे 'बाबांची भिक्षा' पचवणे आहे. कोळंब्यातील चतकोर भाकरीच्या तुकड्यासाठी मक्का-मदीना यात्रा करुन आलेल्या मोठ्या दूढ्ढाचार्य साधकाला बाबांनी कसे धारेवर धरले, ते साईचरित्रवाचकांना ठाऊकच आहे. 'कैवल्याच्या चांदण्याची' भूक ज्या आर्त चकोराला लागली असते, तो काय 'चांदणे' म्हणून दूध प्राशन करेल का? तृषार्ताचे ते स्पन्दन सर्वसाक्षी साईबाबांना जरुर जाणवत असतं. अहंकाराचा इवलासाही लवलेश नसलेल्या आर्त भक्तावरच बाबांची कृपा होत असते आणि म्हणूनच त्या साधकावर श्रीसाईबाबांनी आपली कृपा दर्शवली. 'तेव्हा बाबा देत प्रत्युत्तर। एकदा एक आला सौदागर। तेव्हा एक घोडे समोर। घाली लेंढार नवाचे ॥ सौदागर निज कार्य तत्पर। लेंडिया पडता पसरिला पदर। बांधून घेता घट्ट त्या समग्र। चित्तैकाग्र्य लाधला ॥८८॥ अ. २१, सा.च. श्रीसाईचरित्रात ओव्या ८८ ते १०४ मध्ये सौदागराच्या घोड्याचं कोडं आणि त्याचं उत्तर दिलं गेलं आहे. पण ज्यांनी (श्रीसाईबाबांनी) कोडं घातलं, त्यांनीच त्याचं उत्तर केवळ प्रश्नात्मकच ठेवले आहे. जसे बाबा विचारताहेत, "पदरी बांधल्यास लेंड्या काय?" आणि त्यावर तो भक्त म्हणतो, "कृपा झाली की बांधल्या जातील!" तो असे म्हणत नाही की, "मी बांधेन" किंवा "मी बांधल्या." यावर बाबांनी त्याला 'कल्याण होईल', असा आशीर्वाद दिला. नासदीय सूक्तातही अगदी हुबेहुब तसेच आहे. उत्तरादाखलचा मन्त्र सातव्या ऋचेतील असा– 'यो अस्याध्यक्षः परमे व्योमन्। त्सो अंग वेद यदि वा न वेद ॥ ऋचा ७,ना.सू. ऋग्वेद १०/११ अर्थ : '(जो अध्यक्ष किंवा ईश्वर आहे) जो सृष्टिचा नियंता अत्युच्च आकाशात राहतो त्याला मात्र हे सर्व खरे खरे माहित असले पाहिजे. (पण तुम्ही जर म्हणालात की त्याला काय माहित? तो तर निराकार अरुप अनाम!) आणि त्यालाही हे जर माहित नसेल तर? म्हणजे प्रश्नाचे उत्तर प्रश्नातच! पण समजणाऱ्याला समजते ते त्या ब्रह्मनिष्ठ गुरुदेवांच्या ध्वनि संकेतातून. तो अनुभव असतो तेथे तर्क कुतर्काला वाव नाही. अनुभूतीचा अत्युच्च स्पर्श स्वानंदलहरीत सामावून जातो. ज्ञानी सर्वज्ञ सत्पुरुषाने एखाद्याला प्रश्न विचारावा, "तू रे कोण?" आणि पुन्हा उत्तरही आपणच प्रश्नात्मक प्रतिध्वनीने द्यावं, "मी रे कोण?" यांत ऐकणाऱ्या सर्वच साधकांना काय कळणार? ज्याला समजलं तो सच्चा मोक्षार्थी भक्त लीनतेने बोलेल, "तुम्हीच ठरवा काय ते!" याला कारण तो गुरुकृपेला पात्र असतो, तेव्हाच त्याच्या मुखातून असे उद्गार येतात. जणु गुरुच्या बिंबाचं प्रतिबिंब स्वानन्द चैतन्यात तरळून जावं तसं!

आता हा 'सौदागर' कोण बुवा? सौदागर म्हणजे सौद्याचं आगरच मुर्तिमन्त असा सकाम भक्त. देवाकडे एकसारखे सौदा करीत राहणे, हेच त्याचे काम. मला जर अमुक मिळाले तर तमुक करीन, नवसाला माझ्या पावलास तर समाधीच्या दर्शनाला येईन वगैरे, वगैरे. कितीतरी सौदे त्याचे सतत चालूच. सौदा मानला तर देव चांगला! नाही पटला तर देव हटला!! हा कामुक भक्त म्हणजे सौदागर. जगातील व्यवहारी, संसारी, प्रापंचिक अशा नानाविध अडीअडचणींना कंटाळून गेलेले साधक परमेश्वरापाशी सौदा सदोदित करतात म्हणून त्यांना म्हणायचं सौदागर! पण सगळेच सौदागर काही सारखे नसतात. काहींच्या सौद्याची उडी म्हणजे गगनभरारी करणारी गरुडझेपच! परमेश्वराला विकत देण्याचा असामान्य सौदा नारदमुनींनी सत्यभामेशी केला. सारे द्वारकेचे सोने घातले तरी किंमत येईना! पण रुक्मिणी सारख्या विलक्षण सौदागरानं असा सौदा पटवला की, एका तुलसीदलाच्या मोबदल्यात ब्रह्मांडाचा धनी चातुर्याने मिळवला. ते असामान्य भक्तही तसेच जे परमात्म्याशी उठता बसता सदैव तादात्म्य पावलेले. आम्ही सारे वेळोवेळी सौदे आणि वायदे (नवस) करण्यातच पटाईत. त्यामुळे साईचरित्रातील साधक दामुशेटसारखे, आपण सौद्याच्या प्रलोभनाने इतके मोहून जातो की, बाबांच्या कृपेपासून आपण वंचित तर नाही ना होणार। अशी भीती वाटते म्हणून ज्ञानी सत्पुरुषांच्या सान्निध्यात कसला सौदा करावा हे तरी जाणून घ्यावे. ब्रह्मज्ञानासाठी आम्ही खरोखरीच पात्र आहोत का? याचा निकष कोणी ठरवायचा? श्री सद्गुरु साईंकडे अनेक सकाम भक्त येत असत. त्यात ब्रह्म जाणण्याची इच्छा असणारेही असत. पण जशी ज्याची योग्यता त्यानुसारच बाबा त्यांना मार्ग दाखवीत. खिशात रुपयांचे पुडके असूनही बाबांना वेळ आली असता न देणारा, केवळ मनोरंजन म्हणून ब्रह्मज्ञानाचे गुंडाळे सोडवावे म्हणून आलेल्या एका भक्ताला त्याच्या कर्माचे वेटोळे कृतीनेच दर्शवून ब्रह्म ज्ञान गुंडाळून ठेवल्याचा दाखला साईचरित्र वाचकांना सांगायची आवश्यकता नाही. त्याचा तपशील येथे आता अधिक देत नाही. तरीही सकाम भक्ताभक्तांतही भेद हा असतोच. केवळ परमेश्वर प्राप्तीची कामना असणे ही साधी गोष्ट नव्हे. वेदाध्ययन, वेदान्त प्रवचन, वेदांचे श्रवण किंवा योगसामर्थ्याने धारणा शक्ति वाढवून आपल्या तपश्चर्येने भगवन्ताच्या परिक्षेत जो उतरतो, त्यालाच साई तत्त्व गवसते. अशा कसोटीला लावला गेलेला 'मनुष्याणां सहस्त्रेषु' असा तो साधक (सौदागर) बाबांपाशी आला असता, बाबांनी त्याला सौदागरांच्या कोड्यातून बोध केला. त्याला समजायला थोडं कठीण गेलं, कारण 'सन्ताघरच्या खुणा' सहजासहजी लक्षात येत नाही. पण जेव्हा बोध झाला, तेव्हा त्यानी बाबांच्या पायांना विनम्रतेने वन्दन केलं.

'सौदागर' या विषयी आपण विवेचन केलं. आता हे "घोडे" कुठले? याचे उत्तर कठोपनिषदामध्ये फार सुरेख रितीने मांडले आहे. कठ उपनिषद हे कृष्ण यजुर्वेदाच्या कठ शाखेत अन्तर्गत असून यात पाच वल्ली (प्रकरणे) मध्ये यमदेवांनी नचिकेत्याला सांगितलेल्या आत्मज्ञानाचे सविस्तर विवेचन आहे. कठोपनिषदाचा आरंभ एका मजेदार आख्यानाने झाला आहे. नचिकेत हा वाजश्रव्याचा मुलगा. वाजश्रव्याने

विश्वजित् यज्ञ सुरु केला. या यज्ञात सर्वस्वाचे अर्पण करायचे असते पण वाजश्रवा पुत्रमोहाने विचलीत होऊन जीर्ण शीर्ण भाकड गाई दान करु लागला. हे नचिकेत्याला पाहवेना. त्याने पित्याला विचारले, "तात, या चांगल्या गाई तुम्ही माझ्यासाठी का ठेवणार आहात? अहो, सर्वस्वाचे दान केल्याशिवाय या यज्ञाची सांगता कशी व्हायची? तुम्ही मला कोणाला अर्पण करणार?" हा पुत्राचा प्रश्न ऐकताच वाजश्रव्याला संताप आला. तो रागाच्या भरात बोलला, "यमाला !" पित्याचे वचन खोटे पडू नये म्हणून नचिकेता यमलोकात गेला. त्यावेळी तेथे यम नव्हता. तो ३ दिवस आला नाही. त्याची वाट पाहत नचिकेता अन्नपाण्याविना तिष्ठत राहिला. जेव्हा यम स्वगृही परतला तेव्हा त्या कुमाराची कथा ऐकून चकीत झाला. तीन दिवस आपल्या दर्शनासाठी कठोर व्रत करणाऱ्या त्या नचिकेत्याला यमदेवांनी तीन वर देऊ केले. तेव्हा पहिल्या वराने घरी गेल्यावर पित्याने मला ओळखून प्रसन्न चित्ताने मला घरी घ्यावे, दुसऱ्या वराने ज्या स्वर्गप्राप्तीसाठी वडील यज्ञ करीत होते, ती त्यांना प्राप्त व्हावी म्हणून अग्निविद्या मागून घेतली. आणि तिसऱ्या वराने मागितलेले, ते आत्मज्ञान ! यमराजाने पहिले दोनही वर ताबडतोब दिले पण तिसरा वर देताना हा कुमार अल्पवयीन आहे, त्याला अजून ऐहिक सर्व विद्या संपादन करुन, प्रपंच करुन सर्व सुखे उपभोगायची असताना, ब्रह्मज्ञान कसे द्यावे या विचाराने तिसऱ्या वराला मान्यता देताना, यमराजाच्या अगदी जीवावर आले. तो नचिकेत्याचे मन वळवू लागला. फक्त एवढे सोडून तू काहीही माग. हत्ती, घोडे, रथ, संपत्ती, सुकोमल स्त्रिया, सर्व भोगांची साधने एवढेच काय, संपूर्ण प्रथ्वीचे निष्कंटक राज्य सुद्धा देण्याचे प्रलोभन दाखवले, पण नचिकेता हा काय सामान्य सौदागर नव्हता, असला सौदा पटवून घ्यायला. ज्यामुळे पुन्हा पुन्हा जन्म मरणाच्या फेऱ्यात अडकणार नाही, असे ज्ञान त्याला हवे होते. तो दुसरे तिसरे काहीच रदबदली करण्यास तयार होईना. आता कसे करावे? यमदेव वचनात अडकले. शेवटी त्यांनी नचिकेत्याला ब्रह्मविद्येची आत्मसात करण्याची कला शिकवली. नचिकेत्याची पितृभक्ति, मृत्यूलाही कवटाळण्याची जिद्द, पित्याचे वचन, मग ते कितीही कठोर असले तरी ते खाली पडू न देण्याची तत्परता, यमदेवांनी दाखवलेल्या अति उत्तमोत्तम आमिषांनी मोहून न जाता निरीच्छतेने केवळ आत्मज्ञानासाठी अतीव उत्कटतेने केलेली मागणी हे सर्व नचिकेत्यामध्ये एकवटले होते आणि म्हणूनच तो कुमार यमदेवाच्या कसोटीला उतरला. यमराजांनी प्रसन्न होऊन केवळ नचिकेत्यापुढे आत्मा व आत्मज्ञानाचे विवेचन केले नाही. तर त्याच्या आशीर्वादाने नचिकेता मृत्यूतून अमर झाला. त्याला अमृतत्व लाभले. नचिकेत्याच्या या कथानकाद्वारे सर्वोच्च ज्ञानाचे दालन कठोपनिषदात खुले केले गेले आहे. या उपनिषदाच्या तिसऱ्या वल्लीत शरीराला रथाची उपमा दिलेली असून आत्मा-रथी, बुद्धि-सारथी, मन-लगाम, इंद्रिये-अश्व आणि विषय हे मार्ग होत असे म्हटले आहे.

'इंद्रियाणि हयानाहुर्विषयांस्तेषु गोचरान् ।
आत्मेंद्रिय मनोयुक्तं भोक्तेत्याहूर्मनीषिणः ॥४॥'

कठ उ., अध्याय १, वल्ली २ मन्त्र ४

अर्थ – 'विवेकी पुरुष म्हणतात की, इन्द्रिय हे घोडे विषय हे (शब्द, स्पर्श, रुपादि) त्यांचे (इन्द्रियाचे) मार्ग आणि या सर्व विषयांचा भोक्ता शरीर-इंद्रिये-मन इत्यादिंनी युक्त आत्मा (जीवात्मा) होय.' सकाम भक्त हा सौदागर आणि इन्द्रिये हे घोडे. पण श्रीसाईबाबांनी **'एक** घोडे समोर' असे म्हटले आहे. **'एक'** ऐवजी **'आले** घोडे समोर' असे धरुन चालले तर, घोड्यांचे अनेक वचन मानता आले असते. पण मग एक वचनी प्रयोग करण्याचं काय प्रयोजन अथवा हेतू असावा? ठीक चिन्तन केले तर ध्यानी येईल की, ते किती तंतोतंत बरोबर आहे ते. कारण जो जो विषय आला त्याचं त्याचं घोडं समोर आलं. आता याचा आधुनिक व्यावहारिक उदाहरणाने सुलभतेसाठी विचार करु. समजा, एखादा कॉलेज विद्यार्थी जर्नल पुरं करायला बसला आणि दूर कुठे सिनेमाचं गाणं रेडिओवर लागलं तर, यानं कान टवकारलेच! कारण **श्रोत्रेन्द्रियाचं** घोडं पुढं आलं ना! किंवा कुणी विद्यार्थी हॉस्टेलला ट्युटोरिअल पूर्ण करुन टाकू म्हणून बसला, तर त्याला मित्रानं म्हटलं, आज मॅच दाखवणार आहेत **T.V.**वर! तर हा तसाच उठला आणि धावला मॅच पहायला! येथे चक्षु या इन्द्रियाचं घोडं समोर आलं. अशीच सारी इन्द्रिये आपआपली घोडी नको त्यावेळी पुढे दामटून त्या त्या वेळी समोर आली की, साध्याचे खोबेरे होते. मग अशावेळी हा 'अभ्यासू सौदागर' बाबांशी सौदा करतो, ''यंदा परिक्षेत पास झालो तर आलोच बघा शिरडीला!'' अशी स्थिती, साधंसुधं व्यवहारी ध्येय गाठून पुरं करायचं, कुणी ठरवलं तरी होते. मग अन्तीम ज्ञानासाठी धडपडत असताना काय अवस्था होत असेल! ध्येयाकडे वाटचाल करीत असताना कोणत्या वेळी, कोणत्या इन्द्रियाचे घोडं कधी, कुठे, केव्हा आणि कसं पुढं येऊन ठाकेल ('एक घोडे समोर' – बाबा, सा.च.अ. २१) हे सांगता येणं कठीण. आणि म्हणूनच सौदागर नचिकेतासारखा बलवत्तर असायला हवा. कारण आत्मज्ञानप्राप्तीचं ध्येय ही काय साधीसुधी गोष्ट नव्हे. सौदागर पक्का वस्ताद (परिपक्व साधक) नचिकेत्यासारखा असेल तो कोणत्याही घोड्याला लागलेला मनाचा लगाम जरा जरी ढीला पडला तर आत्मसंयमाने खेचतोच. कारण त्याचा सारथी असतो विवेक बुद्धि. भरधाव धावणाऱ्या घोड्याला बेफाम उधळू न देता, वठणीवर आणून योग्य मार्गावरुन हा सारथी त्यांना चालवतो.

आता आपण 'घाली लेंढार नवाचे' मध्ये नवाचे नवल काय ते पाहू. नवाचे गणित म्हणजे नवधा भक्तिचे स्वरुप साईचरित्रात अगदी कमीत कमी शब्दात अत्यंत प्रभावीरितीने हेमाडपन्तानी मांडले आहे, हे साईभक्तांना ज्ञातच आहे. शिवाय नारद भक्तिसूत्रे आणि एकनाथी भागवतातील विस्तृत विवेचन वाचकांच्या पहाण्यात आहे. तरीही 'नवाच्या लेंढारा'चे गुपित भगवद् गीतेच्या सहाय्याने थोडे फार नजरेस येते का ते पाहू. श्रीमद्भगवद्गीतेत पाचव्या अध्यायात कर्मसंन्यास योगात १३व्या श्लोकात म्हटले आहे, 'सर्व कर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी। नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न न कारयन् ॥ गीता, अ. ५।१३ अर्थ – 'जितेन्द्रिय ज्ञानी पुरुष सर्व कर्मांचा मनाने संन्यास करुन (ती ईश्वरार्पण करुन) नऊ द्वारांच्या देहरुप नगरात काही न करता

सुखाने राहतो'. गीतेतील ५ व्या अध्यायात १२ व्या श्लोकापर्यन्त कर्म योगाचे रहस्यकथन झाल्यावर १३व्या श्लोकापासून सांख्य (ज्ञान) योगाचे विवरण सुरु होत आहे. कर्मसंन्यासी किंवा सांख्य योगी कसा राहतो हे यात सांगितले आहे. ज्ञानयोगावर आरुढ झालेला पुरुष अत्यानन्दात राहतो. ज्या ९ द्वारांमुळे शरीराचा बाहेरच्या जगाशी व्यवहार होतो, ती नऊद्वारे,दोन कान, दोन डोळे, दोन नाकपुड्या, मुख, मुप्रद्वार व गुद. पण हा व्यवहार ज्ञानी साक्षीरुपाने पहात असतो. तो स्वत: काहीच करीत नाही. परमात्म्याने इन्द्रियांची द्वारे बाहेरच्या बाजूने उघडी ठेवली असून त्याचा आत्म्याशी संबंध तोडून टाकला आहे. म्हणून मनुष्य बाह्य जग पाहतो, अन्तर्यामीला पहात नाही. इन्द्रियरुपी घोड लीद (लेंढार) केव्हा घोलेल? अन्न (तोबरा) खाल्ल्यावर ! हे अन्न कोणते? विषयांची आसक्ति ! म्हणून अमृतत्वाची तीव्र इच्छा असणाऱ्याने रसना, श्रोत्र, चक्षू, त्वचा, नासिका या ज्ञानेन्द्रियांना विषयापासून दूर ठेवावे. अष्टावक्र मुनींनी राजा जनकाला म्हटले, 'तुला मुक्ति हवी असेल तर विषयान् विषवत् त्यज (अष्टवक्र, गी.,अध्याय-१) दूर ठेवायचे म्हणजे नेमके काय करायचे? विषयांतून काढून घेणे हाच मनाचे नियमन करण्याचा मार्ग. हे चंचल आणि अस्थिर असलेले मन जो जो सांसारिक विषयांत बिचरते, तो तो त्याचे नियमन करुन हृदयस्थ परमेश्वराकडे ते स्थिर केले पाहिजे. म्हणजेच चंचल चित्त वृत्तींना बहिर्मुखतेपासून अन्तर्मुख केल्यास नऊ दरवाजांतून बाहेर पडणाऱ्या लेंड्या बाहेर पडायच्याऐवजी 'पदरात बांधल्या' जातील. त्यायोगे 'विषय तोचि अवघा झाला नारायण' याची सत्यतेने प्रचिती येईल. म्हणजेच ज्ञानेन्द्रिये अन्तर्मुख झाली की, चित्तवृत्तींचा निरोध होऊन चित्ताची एकाग्रता साधेल. 'सौदागर निजकार्यतत्पर । लेंड्या पडता पसरला पदर । बांधून घेता घट्ट त्या समग्र । चित्तैकाग्र्य लाधला।' सा. च, अ. २१ हे कसे ते ध्यानी येईल.

श्रीसाईभक्ताला अर्थाचा सुगावा लागताच, त्या श्री. पाटणकरांनी बाबांचे पाय धरले. आता पुढे दुसरे दिवशी 'अनंतराय । वन्दु जाता साईचे पाय ।' ''पदरी बांधल्या लेंड्या काय । पृच्छा ही होय तयास त्यांची ॥'' सा. च., २१/१०३

ज्या क्षणी साधकाने बाबांचे पायांना वन्दन केले तत्क्षणी त्याचा कार्यभाग साध्य झाला होता !! श्री साईंसारखे समर्थ सद्‌गुरु ज्याला लाभले त्याला काय उशीर? 'आपणासारखे करिती तत्काळ । नाही काळ वेळ । तयांलागी' आता हे कसे? तर त्याचे असे की, त्या श्रेष्ठ साधकाने बाबांनी प्रश्न विचारल्यावर, ''हो हो, मी बांधल्या लेंड्या पदरी।'' असे देहाभिमानाने म्हटले नाही, त्यात अतीव लीनता होती. परिपक्व आंब्यांनी लगडलेला आम्रतरु जसा विनम्रतेने झुकावा, तसे सहजस्फूर्त उद्‌गार त्या भक्ताच्या मुखी दिसतात– ''अनंतराव तेव्हा प्रार्थिती । कृपा असावी दीनावरली । सहज मग त्या बांधिल्या जाती । काय ती महती तयांची ॥'' कारण 'बांधणारा मी कोण' गुरुकृपेने 'बांधल्या जातात' चंचल वृत्तींचा काय पाड लागतो? 'तव बाबा आशिर्वाद देती ''कल्याण होईल'' आश्वासती । अनंतराव आनंदले चित्ती । सुखसंवित्ति लाधले ॥ सा.च., अ. २१/१०४

जो ब्रह्मनिष्ठ, सर्वज्ञ साक्षात्कारी गुरु, त्याच्या कृपेचा एक शब्द पृथ्वी मोलाचा ('कल्याण होइल'). त्याची वाणी साक्षात् सरस्वती आणि म्हणूनच श्री साईचरित्रातील तत्वज्ञान आकलन व्हायला श्री साईबाबांची कृपाच कारणीभूत आहे. तो 'ज्ञानाचा सागरु' किती किती म्हणून रत्नं शोधाल? जे चटकन् नजरेत भरलं ते दाखवावसं वाटलं आणि साईकृपेनेच कोडं उकललं गेलं. या कोड्याचा मतितार्थ काव्यरुपाने श्री साईचरणी समर्पण करु.

कोण सौदागर
कुठलेसे घोडे ।
साईचरित्रात
मजेदार कोडे ॥१॥

बाबांचा तो बोल
अमृताशी तोल ।
नाही ठरणार
कदापिही फोल ॥२॥

नवधा भक्तीच्या या
वाटा सोप्या नऊ
श्रद्धेने चालाव्या
सबुरीने भाऊ ॥३॥

पाहू डोळा साई
नाम ऐकू साई।
नित्य वदू साई
कर्मी रत साई ॥४॥

नऊ दारांचे हे
असे देहद्वीप ।
आत उजळतो
साई नन्दादीप ॥५॥

भक्तिने पाहता
'नवाचे लेंढार'
साईनी खोलले
रत्नांचे भांडार ॥६॥

चंचल हा भारी
इंद्रियाचा घोडा ।
चौफेर धावतो
सोडूनिया वाडा ॥७॥

भक्त सौदागर
मन हा लगाम ।
इंद्रिये वळवी
होऊनि निष्काम ॥८॥

निष्काम होताच
गुरुभेट घडे ।
साई कृपा होता मग
उकलते कोडे ॥९॥

शुद्धात्मा हा साई
अन्तरी बाहेरी ।
'बांधियेल्या लेंड्या'
आमुचिये पदरी ॥१०॥

साई मालिकाचे
कोट्यावधि वाडे ।
पाहतां डोकावून
देहाची कवाडे ॥११॥

चिरेबन्दी वाड्या आंत
नांदतो आत्मा साई ।
वाड्यालाच म्हणती वेडे
शालिनी देसाई ॥१२॥

॥ जय सच्चिदानन्द ॥

# श्रद्धा – सबुरी

– सौ. संगीता स. शिवेश्वरकर
बी. एस. सी., बी. एड.
५/५२, इमॅन्युअल अपार्टमेंट,
एस. व्ही. रोड, मुंबई-४०० ००७.

गेल्या दोन वर्षांपूर्वी माझी भाची चि. पिंकीचे ॲपेंडिक्सचे ऑपरेशन झाले. ती फक्त आठ वर्षांची व तब्येतीने अतिशय नाजूक. त्यामुळे आम्ही सर्वजण अगदी घाबरुन गेलो होतो. तरी बाबांच्या कृपेने ऑपरेशन अगदी व्यवस्थित पार पडले. परंतु दुसऱ्याच दिवशी तिला उलट्या सुरु झाल्या. जखमेला धक्का पोहोचू नये म्हणून नाकातून रबरी ट्यूब घालून पोटातील द्रव बाहेर काढण्यात येऊ लागला. एका हाताला सलाईनची सुई लावलेली व नाकात ती नळी! फुलासारख्या नाजुक पिंकीची ती अवस्था बघून सर्वांच्याच काळजाचे पाणी झाले होते. ती तर प्रत्येक वेळी सुई लावताना साईबाबा SSS, साईबाबा SSS म्हणून आक्रोश करी. तिच्या खोली मध्ये शेजारी एक गुजराथी रुग्ण होता. त्याच्या कुटुंबियांनी दुसऱ्याच दिवशी शिरडीचा प्रसाद लाह्या, फुटाणे, उदी व पिंकीसाठी साईबाबांची छोटीशी अंगठी आणून दिली. अगदी ऐन संकटाच्यावेळी बाबांनी असा प्रसाद पोहोचवलेला पाहून आमचे डोळे पाणावले. चि. पिंकीचीही तब्येत सुधारु लागली. तेव्हा पासून माझा भाऊ व सौ. वहिनी श्री साईबाबांचे निस्सिम भक्त झाले आहेत.

दुसरी घटना ४/५ वर्षांपूर्वी घडलेली. माझ्या नणंदेची मुलगी चि. गौरीता त्यावेळी २/३ वर्षांची होती. ती अतिशय खट्याळ होती. एका जागी म्हणून तिचा पाय ठरत नसे. एकदा खेळता खेळता ती मोरीजवळ गेली. मोरीच्या कट्ट्यावर पाण्याची बालदी भरुन ठेवलेली होती. त्यातील पाण्याशी खेळताना तिचा धक्का बालदीला लागून, बालदी पडली ती मोरीत ठेवलेल्या कपबश्यांवर. बशीचा कपचा उडाला आणि बरोबर चि. गौरीताच्या डोळ्यात घुसला. झाले! तिने एकच आकांत केला. आम्ही सर्वांनी धाव घेतली. डोळ्यात घुसलेला सुईच्या अग्राएवढा तो टोकदार कपचा स्पष्ट दिसत होता. ती डोळे चोळत धाय मोकलून रडत होती. तिच्या डोळ्यात खुपलेला तो कपचाही काढता येत नव्हता. घरगुती उपचार सुरु झाले. डोळ्यात ड्रॉप्स घातले. बशीत पाणी घेऊन त्यात डोळा बुडवून पाहिले. थोड्या वेळाने तिचा आक्रोश काहीसा कमी झाला. कपचा गेला असावा या समजुतीने सर्व निर्धास्त झाले. संध्याकाळपर्यंत ती शांत राहिली. संध्याकाळी देवाला दिवा लावण्यासाठी मी उठले. दिवा लावला, उदबत्ती लावली व सहज माझ्या मनात काय आले कुणास ठाऊक, मी चि. गौरीताला बाबांची विभूती लावली. झाले! परत तिचा आक्रोश सुरु झाला, आई डोळा दुखतो म्हणून. मी तर चांगलीच घाबरले. म्हटले, बहूतेक हिच्या डोळ्यात विभूती गेली असावी. इतक्यात

तिची आई ओरडली, हे बघा काय? आम्ही पाहिले तर तो सकाळचा कपचा तिच्या डोळ्यातील पाण्याबरोबर बाहेर येऊन नाकाच्या कडेशी चिकटलेला. खरोखरच अतिशय अतर्क्य असा चमत्कार होता तो. तो कपचा जर तसाच डोळ्यात राहिला असता तर?

बाबांवर मनापासून निष्ठा ठेवली व तूच आता माझा त्राता असे म्हणून शरण गेलो तर बाबा धावून येतातच. 'श्रद्धा आणि सबूरी' हे बाबांचे बोधवाक्य लक्षात ठेवले तर संसारातल्या वादळांशी सामना करणे खरोखरीच कठीण नाही.

# श्री साईबाबांची अगाध लीला

**– सौ. सीता श्रीराम घाटपांडे**
१३५/६७६, संत तुकाराम नगर,
पिंपरी, पुणे-४११ ०१८.

बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट. आम्ही बारामतीजवळ असलेल्या खेड्यामध्ये रहात होतो. पावसाळ्याचे दिवस होते. त्याकाळी भरपूर पाऊस पडत असे. एके दिवशी खूप पाऊस झाला. नदीला पूर आला. पाणी सारखे चढतच होते. पाऊस कोसळत होता. विजा चमकत होत्या. अंधार पडू लागला होता व पाणी वाढतच होते. पाणी नदीचे पात्र सोडून वाहू लागले. गावात पाणी शिरणार अशी चिन्हे दिसू लागली. गावामधे लोकांनी गाव सोडून दुसरीकडे आश्रयास जाण्यासाठी चर्चा सुरु झाली. सर्व लोक हवालदील होऊन गेले. अशावेळी मला श्री साईबाबांची आठवण झाली. श्री साईनाथांचा मी धावा सुरु केला. थोड्या वेळातच पाऊस कमी होऊ लागला. नदीचे पाणी वाढावयाचे थांबले. वेगही कमी होऊ लागला व सुमारे तासाभरात पाणी कमी होऊ लागले. श्री साईबाबांचा 'मी आलो आहे' असा आवाज काळोखातून आला. त्याची प्रचिती आम्हाला आली. सर्वांनी परमेश्वराची प्रार्थना केली. खरोखर साईबाबांची लीला अगाध आहे. भक्तांना संकटातून मुक्त करणारा तोच परमेश्वर आहे. आम्ही नेहमी शिर्डीस जाऊन दर्शनाचा लाभ घेतो. त्यामुळे आमच्या जीवनात सुख, शांती, समृद्धीचे वातावरण असते. त्यांची कृपा भक्तांना सतत जाणवत रहाते.

**'भजन'**

अहमदनगरी शिर्डी गांवी श्री साईमंदिरात
तेथे साई प्रत्यक्ष नांदले, काय सांगू मात ॥धृ॥
हरीनामाचा गजर होतो, तेथे दिन रात
बंधु भगिनी सर्व मिळोनी अमोघ नाम घेत ॥१॥
अमुचा साई कृपादृष्टीने, आम्हाकडे पहात
पाप, ताप, दुःख, संकटे साईला भिऊनी पळत ॥२॥

# साईदरबारातील माणिक आणि मोती–२
# शिरडीतील श्रीबाबांचा अगदी पहिला सेवक काशीराम शिंपी

– साईनंद

श्रीसाईबाबा जेव्हा शिरडीत आले, तेव्हा "आवो साईबाबा" म्हणून त्यांचे स्वागत करणारे म्हाळसाकांत, काशीराम शिंपी व अप्पा जागले हे तिघेजण त्यांची मनोभावे सेवा करू लागले. काशीराम तर बाबांचा महाभक्त झाला होता. त्याने साईमहाराजांची सेवा उत्तम तऱ्हेने व तनमनाने केली. इतकेच नव्हे तर धनानेपण केली. काशीराम कापड विकण्याचा धंदा करीत असे व निरनिराळ्या गावी बाजाराच्या दिवशी दुकान घालीत असे.

श्रीसाईबाबा जेव्हा शिरडीत आले, तेव्हा पहिलवानासारखा त्यांचा पोशाख होता. पण मोइनुद्दीन नावाच्या तांबोळ्याशी तेढ पडून दोघांची कुस्ती जुंपली व त्यात बाबांचा पराजय झाल्यामुळे हा पोशाख बदलून त्यांनी अंगात कफनी घालण्यास व डोक्याला फडके गुंडाळण्यास आरंभ केला, असे श्रीसाईसच्चरितात आहे (अध्याय ५ ओव्या ४५, ६४–६६)

म्हाळसापती म्हणतात, की बाबा शिरडीस आले, तेव्हा त्यांचा पोशाख भगवी कफनी, भगवी टोपी आणि धोतर असा होता. नंतर या काशीराम शिंप्याने बाबांना हिरवी कफनी आणि हिरवी टोपी शिवून दिली. ती ते घालीत असत. पुढे काही दिवसांनी ते पांढरी कफनी घालू लागले व डोक्याला फडके बांधू लागले होते.

काशीरामने सुरुवातीला बाबांना चिलीम, तंबाखू पुरविली, इतकेच नव्हे तर धुनीला सरपणासाठी लाकडेपण पुरविली. पुढे पुढे तर तो पैशाची आपली थैलीच बाबांच्यापुढे ठेवायचा, व 'इच्छेस येतील तेवढे आपण घ्या,' असे तो बाबांना म्हणायचा. बाबा त्या वेळी दक्षिणा घेत नसत, पण काशीरामकडून पैसा दोन पैसे ते घेत. बाबांनी आपल्याकडून दक्षिणा घ्यावी, याबद्दल काशीरामला नेहमीच आतुरता असे व एखाद्या दिवशी बाबांनी जर दक्षिणा घेतली नाही, तर त्याला वाईट वाटे व त्याच्या डोळ्यांतून अश्रू येत. पण अशा प्रकारे वाईट वाटणेसुद्धा परमार्थाला विघातक आहे. अर्थात भक्ताच्या परमार्थाला विघातक गोष्टी असतील, तर त्या काढून टाकण्याचा देवाचा नित्यसंकल्प असतो. त्याप्रमाणे काशीरामाचेही झाले.

पुढे काही दिवसांनी त्याची पैशासंबंधाने ओढाताण होऊ लागली, व इकडे बाबांनी तर त्याच्याकडे दक्षिणा मागण्याचा सपाटा चालविला, व 'पैसे संपले,' असे त्याला मोठ्या कष्टाने म्हणावे लागले. 'मग वाण्याजवळून मागून आणून मला दे,' असे बाबांनी सांगितले. तेव्हा काही दिवस वाण्याकडून मागून आणून देण्याचा त्याने क्रम चालू ठेवला. पण पुढे पुढे वाणीही पैसे देईनात. अर्थात ही सारी लीला काशीरामचा अभिमान दूर करण्यासाठीच होती. पुढे त्याची अशी खात्री झाली, की आपली देण्याची

शक्ती नाही व हे त्याला पटल्याबरोबर त्याची सांपत्तिक स्थिती सुधारून गेली व तो पूर्वीप्रमाणे सुखवस्तू झाला. पुढे पुढे तर महाराजांनी आपल्याकडून दक्षिणा घ्यावी, ही त्याची तळमळ पार नाहीशी झाली.

श्रीसाईबाबांचीपण काशीरामवर चांगलीच कृपादृष्टी होती. एकदा काशीरामने शिरडीच्या जवळच असलेल्या नाऊर या गावी त्याने बाजाराच्या दिवशी आपले कापडाचे दुकान घातले होते या. नाऊरच्या बाजाराहून परत येताना, काही लुटारू भिल्लांशी त्याची गाठ पडली व त्या भीषण संकटातून श्रीबाबांनी त्याची कशी काय सुटका केली, ही हकीकत खरोखरीच मोठी रोमांचक आहे. बाबा शिरडीत तर काशीराम नाऊरला जंगलात, पण बाबांनी आपल्या दिव्य चक्षूंनी आपल्या भक्ताला, काशीरामला वाचविले, हे अजबच म्हणावयास हवे–

एरवी काशीराम नित्याप्रमाणे ठिकठिकाणी जाई. कपडा विकी व येतील ते पैसे बाबांना देत असे. एकदा याच विचाराने तो नाऊरला गेला. त्या दिवशी कापड विकून त्याचा खूप फायदापण झाला. सुमारे ऐंशीनव्वद रुपये त्यास मिळाले. तो आनंदाने घरची वाट चालू लागला. एवढी रक्कम एकदम बाबांना दिली, की पुन्हा दोन-तीन महिने पाहायला नको, असे त्याला वाटले. त्याने हळूहळू आपला घोडा शिरडीच्या दिशेला वळविला. त्या दिवशी काशीरामने चितळीच्या जंगलातून शिरडीस परत जाण्याचे ठरविले. त्याकाळी वाहतूकीचे साधन म्हणजे घोडाच असे. काशीराम ज्या चितळीच्या जंगलातून जाणार होता, ते अतिशय दाट होते. तिथे साग, वड, पिंपळ, शेवरी, अर्जुन सादडा, बोरी अशा अनेक झाडांची दाटी होती व अशा या दाट जंगलातून वाघ, अस्वल व लांडगे इत्यादी क्रूर श्वापदे तिथे दिवसासुद्धा वावरत असत आणि हल्ला करीत. याखेरीज वाटमाऱ्या व दरोडेखोरांची तर खूपच भिती असायची ती वेगळीच. शिरडीला लौकरात लौकर पोचणारा हाच काय तो एक मार्ग त्या काळी होता. म्हणून काशीरामने धोका पत्करूनही बाबांकडे लौकरात लौकर जाण्याचे ठरविले होते. परंतु तेव्हा काशीरामच्या मनात कशाचाच विचार शिवला नाही. बाबांच्याकडे कधी एकदा लौकरात लौकर जाऊन पोहोचतो व कधी एकदा त्यांना पैसे देतो, असे त्याला झाले होते. पैसे नसले, की बाबांना तेल मिळणार नाही आणि मग त्याची द्वारकामाई उजळणार नाही, ही गोष्ट त्याच्या जिवाला लागून राहिली होती. शिवाय बाबांचा आशीर्वाद पाठीशी असताना त्या जंगलामध्ये आपल्यावर काहीच संकट येणार नाही, अशी त्यांची नितांत श्रद्धा होती. चितळीच्या जंगलातून गेले, की शिरडीची वाट लौकर गाठता येते, म्हणून या रस्त्याने तो आला होता.

नाऊरहून थोडीशी वाट चालून गेल्यावर एकाएकी त्या गर्द अंधारात त्याच्यापुढे एक संकट दत्त म्हणून उभे राहिले. क्रूर चेहऱ्याच्या व आडदांड शरीरयष्टीचे भिल्ल, रामोशी दरवडेखोरांनी त्यास अडविले. त्यांच्या हातात धारदार चकाकणाऱ्या पात्याच्या कुऱ्हाडी व कोयते होते, पण काशीरामला त्याचे भय वाटले नाही. तो मनातल्या मनात बाबांचे स्मरण करीत होता. त्याला एका भिल्लाने सवाल केला,

"ए, तुझ्या गाठोड्यात काय काय हाय, ते काढ आन् गुमान आम्हास्नी दे!"

"ऐंशी रुपये आहेत– हे घ्या."

त्याचे ते निर्भय उत्तर ऐकून रामोशी चकित झाले. कारण त्यांना पाहून त्या भयंकर जंगलात आणि रात्रीच्या वेळीही काशीरामला दरदरून घाम सुटला नव्हता. ते पाहून रामोशांच्या नाईकाने त्याला दुसरा प्रश्न केला,

"काय रे, काय इचार हाय तुझा? रातच्या पहरी या जंगलात आमचं भय वाटत नाय व्हय तुला!"

"भय कशाचं, नाईक, तुम्ही पण माणसंच हायत नव्हं का!"

"वाल्या कोळीपण भिल्ल होता. तुमच्यासारखीच वाटमारी करून तो पोट भरीत असे. एक दिवस नारद त्याच्या वाटेने चालले होते. वाल्याने नारदाच्या गळ्यावर कुऱ्हाड धरली, नारद काही भ्याले नाहीत. ते हसतच नम्रतेने म्हणाले, "वाल्होजी, माझा जीव घेणार आहेस, तर खुशाल घे. पण हे खरे सत्कृत्य करून ज्यांचे मन तू सुखवू पाहात आहेस, त्या तुझ्या बायकामुलांना विचारून येशील का, की तू करीत असलेल्या या पापांचे वाटेकरी तेपण होणार आहेत का?' वाल्याने तसे जाऊन विचारले, तेव्हा बायकापोरं म्हणाली, 'नाही बा, तुम्ही पाप करता, त्याचा वाटा आम्ही काय म्हणून उचलावा?' झालं: वाल्याचे डोळे खाडकन् उघडले आणि वाल्याकोळी वाल्मिकी ऋषी झाला."

पण या सर्व पुराण-कीर्तनाचा त्या आडदांड भिल्लांवर काहीच परिणाम झाला नाही.

"अरं, त्याच्या काय नादी लागलाय. त्यानं पगा ती दुसरी पुरचुंडी लपवलीय हाय पगा खाकत." दुसरा एक रामोशी म्हणाला.

वास्तविक पुरचुंडी म्हणजे काशीरामची मुंग्यांना घालवयाची साखर होती. काशीरामला जानकीदासबाबा नावाच्या एका भक्ताने सांगितलं होतं, की मुंग्यांना साखर घालीत जा. म्हणून तो नेहमी साखरेची पुरचुंडी जवळ बाळगीत असे. पण त्या क्रूर भिल्लांची खात्री झाली, की काशीरामच्या त्या मुटकुळीत काहीना काही तरी चांदी-सोन्याचा डाग असला पाहिजे. सारे भिल्ल एकदम चवताळले. कारण काशीराम मुटकुळी देईना म्हणून. तेव्हा काळभैरवाचा जयघोष करीत ते काशीरामवर तुटून पडले. अरे हो!

पण याच सुमारास शिरडीस द्वारकामाईत काय चालले होते? साईबाबांनी अचानक रुद्रावतार धारण केला होता. मशिदीच्या भिंतींवर आणि खांबावर हातातल्या सटक्याचे दणके हाणीत ते ओरडत होते.

"चालती हो, चांडाळणी चालती हो इथून! माझ्यासमोर आलीस तर धुनीत फेकून राख करीन तुझी! साखर खाऊन खाऊन माजल्यात रांडा, साखर खायची आहे नाही का– साखर खा साखर!"

बाबांच्या हातचे सटके बसताच सगळी मशिदमाई हादरून निघाली. भिंती

थराथरा कापू लागल्या, खांब गदागदा हलू लागले आणि चहू बाजूंनी बाबांच्या सभोवती जणू मुंग्यांचा अक्षरशः पाऊस कोसळू लागला. शिरडीतल्या नव्हे, तर साऱ्या ब्रह्मांडातल्या मुंग्या बाबांच्या तीन खणी मशिदीत राहात होत्या, की काय, असे एखाद्यास वाटले असते. बाबांच्या हुंकारांनी आणि सटक्यांच्या दणदणाटाने म्हाळसापती, शामा, अप्पा जागले यांच्या अंगाला तर दरदरून घाम सुटला. बाबांचा हा असा रुद्रावतार ते प्रथमतःच पाहात होते. बाबांना असे एकाएकी काय झाले ! आणि बाबांना आता आवरावे तरी कसे? त्यांना काहीच कळेना. त्यांच्या तोंडचे पाणीच पळाले. आणि काय आश्चर्य पाहा ! मशिदीत अवतीर्ण झालेल्या त्या मुंग्यांना पाहता पाहता पंख फुटले आणि एखादी टोळधाड गावावरून उडत जावी, त्याप्रमाणे त्या साऱ्याच्या साऱ्या मुंग्या तेथून क्षणार्धात उडून निघून गेल्या, आणि चितळीच्या जंगलावर त्यांनी हल्ला चढविला.

काशीरामची गठडी एक भिल्ल सोडत होता व त्याची तलवार खाली पडली होती, तिकडे काशीरामचे लक्ष जाऊन त्याने ती उचलली व त्या चोरांपैकी दोघांना त्याने जागच्या जागीच ठार केले. इतक्यात तिसऱ्या भिल्लाने मागाहून येऊन कुऱ्हाडीचा घाव त्याच्या डोक्यावर घातला. त्याबरोबर काशीराम बेशुद्ध पडला. इतक्यात घों घों करून पंख फुटलेल्या त्या मुंग्यांनी कुऱ्हाडीचा घाव चालवणाऱ्या त्या भैरव भिल्लाच्या तोंडावर झेप घेतली. इंगळासारखे लालभडक डोळे व जहाल विषानं भरलेल्या त्यांच्या नांग्या होत्या. 'मेलो, मेलो, मेलो' असा चित्कार फोडून भैरव भिल्ल हातातून निसटलेल्या स्वतःच्या कुऱ्हाडीवरच कोसळला. बाकीचे भिल्ल या साऱ्या प्रकाराने भयभीत झाले व त्यांनी काशीरामाचा प्राणांत झाला आहे, असे समजून तिकडून मोठ्या जिकिरीने पोबारा केला. पण काशीराम बेशुद्ध होऊन प्रेतवत पडला होता, निपचीत होता.

दुसऱ्या दिवशी दुपारी बाबांच्या द्वारकामाईपुढे एक बैलगाडी येऊन उभी राहिली. बाबा धुनीपुढे शांत होऊन बसले होते. तिथूनच ते ओरडले,

"ए गाडीवाली बये, कुणाचा मुडदा आणलां हायेस माझ्या दारात?"

सीता बेरड नावाची एक जवान कोल्हाटीण होती ती. नित्याप्रमाणे चुलीसाठी काटक्या-कुटक्या वेचत असताना जंगलात जखमी अवस्थेत पडलेल्या काशीरामला तिने पहाटे पाहिले होते व मग त्याची दया येऊन तिने गाडी जुंपून काशीरामच्या आग्रहामुळे त्याला बाबांकडे सोडले होते. परोपकार करायला गेली, पण शिरडीत शिरताच स्वतःचे सत्त्व हरण करून बसली. चितळीच्या जंगलातली भिल्लांची सामुदायिक रखेली म्हणून ती आजवर ओळखली जात होती व त्यांच्या पैशाअडक्यांवर ती दिवस कंठीत होती. आपल्या भरदार जवानीचा मोबदला देऊन तिच्या पदरात काय पडले होते, तर आडदांड भिल्लांच्या चार लाथा व तोंडात ताडी-माडीचे चार घुटके.

बाबांचे दर्शन घडताच सीतेच्या मनाचा कायापालट झाला, बाबांनी तिच्या

कपाळाला धुनीतली मूठभर उदी लावली आणि ते म्हणाले,

"चांडाळणी, हा देह चांगल्या कामाला लाव, रांडे, जन्माला आलीस, ते नागव्यानं, व उद्या मसणवटीत जाशील; ते पण नागव्याने, जीव आहे कुडीत, तवर नेकीनं वाग, शिंदळकी करून देवानं दिलेलं हे सोन्यासारखं शरीर जाळून त्याची राख करू नकोस !"

सीता बेरड जन्माने कोल्हाटीण होती. पण बाबांच्या उपदेशाने तिने तमासगीर नारायण बुवा कान्हेगावकरांच्या फडात जागा मिळविली. देवादिकांचा कलगी तुरा तिच्याच गळ्यातनं ऐकावा, असा तमासगीरात तिचा नावलौकिक होता. ती कुठेही असे, पण वर्षातनं एकदा बाबांच्या दरबारात येऊन तिने हजेरी दिली नाही, असं कधी झालं नाही. मरेपर्यंत तिने हा नियम पाळला होता.

बाबांच्याकडे आल्यावर जखमी काशीराम आठ-पंधरा दिवस बिछान्यात पडून होता. तेव्हा साक्षात् बाबांनी त्याची सेवाशुश्रूषा केली.

एके दिवशी बाबांनी त्याला बोलता बोलता टोमणा मारला,

"ऐंशी रुपये माझ्या हातात टाकून महिना दोन महिने माझं तोंड तू बंद करणार होतास नाही का, चोरा ! पण बघ कशी देवाने तुला शिक्षा केली !"

काशीरामच्या डोळ्यांतून पाणी वाहू लागले, तो गहिवरून म्हणाला,

"बाबा, तुमच्यासारख्या कुबेराला माझ्यासारख्या दरवेशानं काय बरं द्यावं !"

पुढे काही दिवसांनी काशीराम खडखडीत बरा झाला. हिंडू फिरू लागला व पुन्हा बाबांची सेवा करू लागला. एके दिवशी सकाळी मशिदीत बाबांची बैठक भरली असताना मुंग्यांची भाषा बाबांना समजते, असे म्हाळसापतींचे मोठ्या आग्रहाने प्रतिपादन चालले होते. शामा ऊर्फ माधवराव देशपांडे त्यावर म्हणाले,

"बाबांना मुंग्यांचीच काय, कुत्र्या-कावळ्यांची, मांजरांची व डुकरांची इतकेच काय गाढवांचीदेखील भाषा समजते. त्याखेरीज का ते आपल्याला टाकून मधेच जंगलात भटकून येत असतात?"

बाबा हे आपले स्वस्थपणे ऐकत होते.

हे असे बोलणे, चर्चा चालू असताना मामलेदार कचेरीतून एक पट्टेवाला आला. त्याचेबरोबर दोन शिपाई होते. तो म्हणाला,

"इथं काशीराम शिंपी आहेत काय?"

पट्टेवाल्याला पाहून काशीराम पराकाष्ठेचा घाबरला. तो रडत म्हणाला,

"आहे, मी भिल्ल दरोडेखोरांना मारले नाही हो, मला पकडू नका. तो खुद्दच स्वतःच्या कुऱ्हाडीवर पडला.

पट्टेवाला हसून म्हणाला,

"घाबरू नका, शिंपीदादा, तुम्ही दरोडेखोरांशी शूरपणे सामना दिलात, म्हणून सरकारकडून ही तलवार आणि ही पैशांची थैली इनाम म्हणून देण्यात आली आहे ती घ्या. त्या टोळीच्या नायकाच्या तपासासाठी सरकार जिवाचं रान करीत होतं शाबास

आहे तुमची !"

ही घटना घडण्यापूर्वीच काशीरामचे बाबांनी वीरपुरुष म्हणून स्वागत केले होते व ही घटना झाल्यावर मात्र बाबांनी काशीरामला वीरपुरुष का म्हटले, याचा उलगडा सर्व भक्तांना झाला. बाबा गालातल्या गालात हसत म्हणाले,

"काशा, मी अमुक केलं, मी तमुक केलं, असा अहंकार माणसानं कधी बाळगू नये. कर्ताकरविता एकच आणि तो म्हणजे अल्ला मालिक !"

"होय, बाबा मी चुकलो" असे म्हणून काशीरामने पैशांची थैली व तलवार साईबाबांच्या पायावर वाहिली.

आपल्या प्रिय भक्ताला संकटातून सोडविण्यासाठीच बाबांनी मशिद माईत आकांत केला होता, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

श्रीबाबांचा हा निस्सीम भक्त काशीराम शके १८३०च्या चैत्र शुद्ध एकादशीला निधन पावला. आपल्या उभ्या आयुष्यात त्याच्यावर ओढवलेल्या त्या महाभयंकर आपत्तीतून बाबांनी त्याची सुटका कशी काय केली, ही गोष्ट लक्षात आली, म्हणजे सद्‌गुरू श्रीबाबांच्या चरणी आपले मस्तक आणखीन विनम्र होते, यात शंकाच नाही.

काशीरामला मरताना एकादशी लाभली. हरिभक्ताचे मरण हरिदिनीच होणे योग्य व त्याप्रमाणे ते झाले, हे योग्यच झाले.

## नवी वैशिष्ट्यपूर्ण लेखमाला

श्रीसमर्थ सद्‌गुरू साईबाबांचे चक्षुर्वै दर्शन घेतलेले साईभक्त आता हळूहळू श्रीसाईचरणी विलीन होत आहेत. ही वस्तूस्थिती लक्षात घेऊन आज हयात असलेल्या व श्रीसाईंचे दर्शन घेतलेल्या भाग्यवान साईभक्तांचे खास अनुभव, त्यांनी त्यांच्या आठवणीने कथन केलेले श्रीसाईनाथ इ. हकीगत भावी पिढीच्यासाठी म्हणून मुद्दाम जतन करून ठेवण्याच्या निमित्ताने ही नवीन वैशिष्ट्यपूर्ण लेखमाला सुरू करीत आहोत.

### माझ्या आठवणीतून :–

"मी पाहिलेले श्रीसाईबाबा" ही रंजक माहितीपूर्ण लेखमाला आक्टोबर १९८७ खास विजयादशमी अंकापासून क्रमशः सुरू करीत आहोत.

भक्तांनो आपला अंक आजच आरक्षित करण्यासाठी श्रीसाईलीलाचे ताबडतोब वर्गणीदार व्हा.

वार्षिक वर्गणी १० रु.   तहहयात वर्गणी ३०० रु.   किरकोळ अंक रु. २



# श्रीपाद वल्लभ दिगंबर व साईनाथ यांचे अवतार कार्य

– **श्री. नंदू ल. पाटील**
लोकमान्य नगर, महेश कृपा चाळ
ठाणा–४०० ६०६

ईश्वर हा एकच आहे. परंतु त्याने अनेक अवतार धारण केले आहेत. श्री सद्‌गुरु साईबाबा हे श्री दत्तात्रय अवतारी आहेत. श्री दत्तगुरुंनी भक्तांसाठी अनेक चमत्कार केले. त्याचप्रकारचे साम्य श्री साईबाबांच्या लीलेत दिसून येते. श्रीपाद वल्लभ दिगंबरांचे वास्तव्य औदुंबराच्या ठीकाणी होते, तर साईबाबांचे वास्तव्य निंबवृक्षाच्या झाडाखाली होते.

एकदा श्रीपाद वल्लभांचा एक भक्त धनिक ब्राह्मण दान धर्म करण्यासाठी दुसऱ्या गावी निघाला असता, वाटेत चोरांनी कपट करून त्यास अडविले आणि त्याच्या जवळील ऐवज घेऊन, त्यास बेदम मारले. श्री गुरुदेवदत्त आपल्या भक्ताच्या रक्षणासाठी तात्काळ धावले. त्यांनी चोरांस त्रिशुळाने ठार करुन आपल्या भक्तांस जिवदान दिले.

त्याचप्रमाणे एकदा श्री साईबाबांचा एकनिष्ठ भक्त काशिराम शिंपी कामधंद्यानिमित्त बाहेरगावी जात असता, त्याला वाटेत भिल्ल चोरांनी गाठले व बडविण्यास सुरुवात केली. मारामुळे काशिराम शिंपी बेशुद्ध पडण्याची पाळी आली. तरीही तो कळवळून बाबांची आठवण करीत होता. इकडे साईनाथ द्वारकामाईत बसले असताना मोठमोठ्याने ओरडत होते. त्यांना आपल्या भक्तावर आलेले संकट अंतर्ज्ञानाने समजले होते. त्यांनी काशिरामला एवढे बळ दिले की, त्याने सगळ्या चोरांना पिटाळून लावले.

दुसरी चमत्कारिक घटना अशी की, एकदा एक विधवाबाई आपल्या वेडा झालेल्या मुलाच्या यातना काढून, जिवाला कंटाळून त्या मूर्ख मुलासमवेत नदीत जीव देण्यासाठी गेली असता, श्रीपाद वल्लभ तात्काळ या नदीकाठी प्रगट झाले आणि त्या मातापुत्रास त्यांनी मरणातून वाचविले, त्या मूर्ख मुलाच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवून त्यास तात्काळ ज्ञानी बनविले.

अशाच प्रकारे परब्रह्म साईनाथ महाराज, एकदा मशिदीत बसले असता एक गरीब स्त्री आपल्या एकुलत्या एका मुलास घेऊन शिर्डीस आली. तिचा मुलगा अचानक वेडा झाला होता. त्याला तिने बाबांच्या चरणाजवळ आणून अनन्यभावे प्रार्थना करताच, बाबांनी धुनीतील चिमटीभर उदी घेऊन त्या मुलाच्या मस्तकी लावून, अंगावरुन फुंकली आणि काय आश्चर्य ! त्या क्षणापासून मुलगा पूर्ण बरा झाला.

श्री दत्तात्रय अवतारी साईनाथ महाराज आजही चराचरी वास करुन आहेत. श्री साईबाबा आपल्या भक्तांचे मनोगत जाणून आहेत, भक्तांच्या जीवनात सुख-समृद्धी निर्माण करीत आहेत. फक्त आपल्या ठायी श्रद्धा आणि सबूरी हवी.

श्रेष्ठ संत महंतांनी म्हटले आहे–
'ईश्वर तुमची प्रार्थना जरुर ऐकेल, पण ती मनापासून केली पाहिजे.' अशा श्री सद्‌गुरु सच्चिदानंद साईनाथांच्या चरणी माझे कोटी कोटी प्रणाम.

# ही पहा साईलीला

**– सौ. पौर्णिमा आनंद शेंडे**
२/७९, नेहरु नगर,
कुर्ला (पूर्व),
मुंबई-४०० ०२४.

मला साईलीला मध्ये लेख लिहिण्यास अत्यंत आनंद होत आहे कारण, साईबाबाच मला पावले.

दोन वर्षांपूर्वी माझे लग्न झाले. लग्नानंतर लगेच दिवस राहिले, पण साडेचार महिन्यांनी माझा गर्भपात झाला. त्यामुळे आम्हा उभयतांना फार वाईट वाटले व सारखी काळंजी वाटत होती.

नंतर आठ-नऊ महिन्यांनी मला पुन्हा दिवस गेले. गरोदरपणी मला काहीच त्रास झाला नाही. सर्व काही ठीक होते. बोरीवलीचे डॉक्टर टिपणीस यांनी मला सात नोव्हेंबर, ८६ तारीख दिली होती. आम्ही दोघे फार काळजीत होतो, डिलीव्हरी व्यवस्थित होईल ना? मी सारखे साईबाबांचे नाव घेत होते. पहिलीच वेळ होती. काही कळत नव्हते. काळजीतच भर म्हणून की काय, कोणास ठाऊक पण सात तारीख उलटून गेली आणि आणखीन काळजी वाढली, वरती ४-५ दिवस सुद्धा गेले.

एक-दोन दिवसात प्रसूती नाही झाली तर सिझरिंग करावे लागणार असे डॉक्टर म्हणत होते आणि मी सिझरिंगला तयार नव्हते. मी सारखे 'साईबाबा, साईबाबा'च करत होते.

शेवटी मी मनाची तयारी केली आणि मी घरात सर्वांना सांगितले की मी सिझरिंगला तयार आहे आणि रात्री झोपायला गेले. झोप काही येईना.उद्या सिझरिंग करायचे आहे, मी मनांत म्हणत होते,साईबाबा उद्या (१४ नोव्हेंबर ८६) माझी नॉर्मल डिलेव्हरी होऊ द्या. रात्री मला शांत झोप लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी पोटांत दुखायला लागले आणि साईबाबांच्या कृपेने माझी संध्याकाळी नॉर्मल डिलीव्हरी झाली, मुलगी झाली. मुलीचे नाव साईलीला ठेवले आहे. साईबाबा तुझी लीला अगाध आहे.



# साईकृपा

– प्रा. श्रीकांत भट
एम. कॉम.
द्वारा–स्मृती बंगला, डाबकी रोड,
गोडबोले प्लॉटस, अकोला.

श्री साईबाबा हे एक संत होऊन गेले, एवढीच काय ती माहिती सुरुवातीला आमच्या घरी सर्वांना होती. माझ्या बहिणीचे लग्न झाले. ती आपल्या यजमानांसोबत शिरडीला जाऊन आली. तिच्या सासरची सर्व मंडळी 'साईभक्त' आहेत. येताना त्यांनी आमच्या घरच्यांसाठी साईबाबांची एक प्रतिमा आणली. ही आमच्या घरी साईबाबांची प्रथम भेट होय!

परंतु ही प्रतिमा कॅलेंडर सोबत गुंडाळून आमच्या घरच्या मंडळींनी ठेवून दिली. काही दिवसानंतर मला पहिलाच साई अनुभव पाहायला मिळाला. मला एका महाविद्यालयात नोकरीसाठी मुलाखतीला बोलावण्यात आले. मी माझे कागदपत्र शोधत असताना सदरची साईप्रतिमा माझ्या नजरेस पडली. फोटो पाहताक्षणीच माझ्या मनात बाबांविषयी श्रद्धा निर्माण झाली. त्यांच्या त्या छबीवर माझी नजर क्षणभर खिळली. मी मनात म्हणालो, मला जर आज नोकरी मिळाली तर मी हा फोटो जरूर फ्रेम करीन आणि काय महद्‌आश्चर्य! माझी निवड होऊन त्याच दिवशी मी नोकरीवर रुजू झालो. मी लगेच साईबाबांचा फोटो फ्रेम करुन आणला. साहजिकच साईनाथांवर माझी श्रद्धा बसली.

दुसरा अनुभव असा की, मी बारावीच्या परिक्षेचा एका विषयासाठी फॉर्म भरला. परंतु नोकरीमुळे अभ्यास जेमतेमच झाला होता. आपण पास होऊ की नाही याबद्दल मनात शंका होती. पेपरचा दिवस उजाडला. मी साईनाथांचे स्मरण करुन तो सोडविला. निकालाच्या दिवशीसुद्धा मी भीतभीतच निकाल पाहिला आणि स्तंभित करणारी गोष्ट म्हणजे मी चक्क ५२ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालो होतो.

मी 'इलेक्ट्रॉनिक्स' ह्या विषयाच्या आय. टी. आय. च्या परिक्षेस बसलो होतो. खाजगी उमेदवार म्हणून अभ्यास जेमतेमच झाला होता. पेपर्स देखील काही ठीक गेले नव्हते. परंतु पूर्ण केंद्रात मी एकटा पास झालो होतो.

नोकरी करुन मी बी. कॉम. झालो. श्रीसाई कृपेनेच मला नोकरी मिळाली. पुढे एम. कॉम. सुद्धा झालो. आता सुद्धा माझी एम. फील. करिता निवड झाली, ती केवळ साईबाबांची कृपा माझ्यावर होती म्हणूनच.

जया मनी जैसा भाव।तया तैसा अनुभव॥

साईबाबांचे हे वचन किती यथार्थ आहे, हे साईभक्तांना येत असलेल्या अनुभवांवरुन दिसून येते.

# श्रीकृष्णाची सोन्याची द्वारका

**श्री. रमाकांत पंडित**
प्रभास्मृती, भाऊदाजी रोड,
माटुंगा, मुंबई-१९.

हिंदूंना सात मोक्षदायक गांवे (पुरी) व चार पवित्र धामे आहेत.ती म्हणजे (१) अयोध्या (२) मथुरा (३) मायावती (४) काशी (५) कांची (६) अवंतिका व (७) द्वारका तसेच बद्रिनाथ जगन्नाथ द्वारका व रामेश्वर ही चार धामे या दोन्हीत ही द्वारकेचा समावेश आहे. श्रीकृष्णाने कंसाचा वध केल्यानंतर मथुरा ही राजधानी केली पण जरासंध व कात्यायन यांच्या मथुरेवर वारंवार स्वाऱ्या होऊ लागल्यामुळे श्रीकृष्ण आपल्या यादवांच्या सेनेसह रेवटाऊ पर्वताकडे गेले. त्या पर्वताच्या पायथ्याशी त्यांनी विश्वकर्माकडून द्वारकानगरी व शवली असे पुराणात म्हटले आहे.या नगरी भोवती उंच व चुन्याने रंगवलेले तट होते व या तटांना अनेक दारे होती म्हणून या नगरीचे नाव द्वारिका असे पडले. या धनाढ्य नगरीत अनेक श्रीमंत सावकार राहत व त्यांच्या वाड्याचे कळस सोन्याचे म्हणून तिला सोन्याची द्वारका असे नाव पडले.यादवांच्या कलहामुळे, त्यांच्या पापाच्या अतिरेकामुळे श्रीकृष्ण द्वारकेहून सोमनाथला गेले व तेथेच त्यांचा अंत झाला. त्यानंतर सागराने द्वारका नगरी बुडविली.श्रीकृष्णाचा नातू वज्रनाथ याने पुन्हा द्वारका उभारली तीच आजची द्वारका आहे असे पुराणाभिमानी लोक मानतात.पण आधुनिक उत्खननात सापडलेल्या पुराव्यानुसार आजची द्वारका ही तिसरी द्वारका आहे.

द्वारकेच्या जगन्मंदिराचा इतिहास इ.स. पूर्व १४०० पासून सुरु होतो. यावेळी वज्रनाथाने आपल्या आजोबाच्या स्मरणार्थ येथे हरिमंदिर व छत्री बांधली.त्यानंतर तीनशे वर्षांनी मूळछत्री खाली श्रीकृष्णाची मूर्ती स्थापन करण्यात आली. इ.स. आठशेमध्ये आर्य शंकराचार्यांनी द्वारका मंदिराचा जीर्णोद्धार केला. तसेच त्यांनी मंदिरात आदिशक्तीची स्थापना केली. नंतर इ.स. ११२० मध्ये मीनल देवीनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला. इ.स.११५२मध्ये उदयपूरचा राजा भीमसिंह याने या मंदिराच्या व्यवस्थेसाठी सात हजार बिघे जमीन दिली व मंदिराची डागडुजी केली. इ.स. ११५६ मध्ये भक्त बोडाणाने मंदिरातील मूर्ती डाकोरला नेली त्याचे नाव विजयसिंह असे होते.

या स्थलांतराची कथा अतिशय रोमांचकारी आहे. डाकोर हे गाव बडोद्यापासून चाळीस मैलावर आहे. तेथे बोडाणा नावाचा श्रीकृष्ण भक्त राहत होता. तो दरवर्षी डाकोरहून द्वारकेला दर्शनाला येत होता. तो वृद्ध झाला म्हणून द्वारकेला जाऊ शकला नाही म्हणून तो अत्यंत दु:खी झाला तेव्हा श्रीकृष्णाने त्याला दृष्टांत दिला, यापुढे तुला द्वारकेचा प्रवास करावा लागणार नाही. मीच तुझ्याजवळ येईन तू बैलगाडी घेऊन ये. मी त्या गाडीतून डाकोरला येईन. भक्त विजयसिंह बोडाणाने घरदार विकून बैलगाडी

खरेदी केली. भगवानाची मूर्ती नेण्यासाठी बोडाणा येत आहे असे मंदिराच्या पुजाऱ्यांना कळले तेव्हा मंदिराची दारे बंद करुन ते पुजारी रात्रंदिवस पहारा करीत राहिले पण त्या सर्वांना चुकवून श्रीकृष्ण मंदिरातून बाहेर पडले व रात्री भक्त बोडाणाच्या गाडीत बसून डाकोरला आले. सकाळी पुजाऱ्यांना मूर्ती नाहिशी झालेली दिसली तेव्हा ते तातडीने डाकोरला गेले. बोडाण्याने मूर्ती गोमती नदीत बुडविली तेव्हा संतापलेल्या पुजाऱ्यांनी बाण मारुन बोडाणाचा अंत केला. त्याबरोबर नदीतील मूर्तीच्या अंगाला बाणाच्या जखमा झाल्या व नदीचे पाणी रक्ताने लाल झाले. श्रीकृष्णाने बोडाण्याच्या पत्नीला दृष्टांत दिला व सांगितले "द्वारकेचे पुजारी लोभी झाले आहेत म्हणून त्यांना सोडून मी येथे आलो आहे. तू पुजाऱ्यांना मूर्तीच्या वजना इतके सोने दे म्हणजे ते परत जातील व मग माझी मूर्ती नदीतून काढून तिची डाकोरमध्ये प्रतिष्ठापना कर." बोडाणाच्या कानात एका कर्ण फुलाशिवाय इतर काहीही नव्हते पण श्रीकृष्णाच्या कृपेने त्या लहानशा कर्ण फुलाचे वजन मूर्तीच्या वजनापेक्षा अधिक भरले. ते कर्णफूल दैवीप्रसाद मानून पुजारी ते घेऊन द्वारकेला गेले व नवी मूर्ती त्यांनी मंदिरात स्थापन केली. मूळ मूर्ती डाकोर येथेच राहिली.

इ.स. १२४१ मध्ये अहमदाबादच्या महंमद शहाने द्वारकाधीश मंदिर फोडले व उध्वस्त केले. त्यावेळी पांच पुजारी मरण पावले. त्यांची समाधी मंदिराजवळच बांधली गेली. इ.स. १५०४ मध्ये श्रीवल्लभाचार्यांनी या मंदिरात श्रीद्वारकाधीशाची मूर्ती स्थापन केली. इ.स. १५५८ मध्ये शंकराचार्यांनी मंदिराचा विस्तार करून काही नव्या मूर्तींची स्थापना केली. नंतर १७३० मध्ये पुन्हा मंदिर मोडकळीस आले तेव्हा शंकराचार्य श्रीपरमानंद यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला. १९०३ मध्ये बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांनी जगन्मंदिरावर सोन्याचा कळस चढविला.

द्वारकाधीश मंदिराकडे जाणारा रस्ता लहानच आहे. मंदिरा बाहेर भव्य व उंच कमान आहे. या कमानीला मोक्षद्वार हे सार्थ नाव आहे कारण द्वारकेच्या श्रीकृष्णाचे दर्शन मिळणे हा मोक्ष आणि तिकडे नेणारे हे मोक्षद्वार.

हजारो वर्षाची परंपरा असलेल्या द्वारकेसारख्या तीर्थक्षेत्रात आल्यावर आपल्याला एक अद्‌भूत आनंद होतो. कारण राधेपासून संत मीरेपर्यंत आणि आद्य शंकराचार्यांपासून ज्ञानेश्वर तुकारामांसारख्या शेकडो संतमहंतांनी पवित्र केलेल्या मार्गावरून आपण जात आहोत ही अभिमानाची जाणीव होते.

# 'साईबाबा आता तुम्ही पाणी प्या'

— श्री. बाबुराव गडकरी
३-किरण, अहिल्याबाई चौक,
कल्याण.

माझा मुलगा चि. शिरीष याची मुलगी चि. मधुरा (राणी) दररोज पुजेच्या वेळी माझ्या मांडीवर बसून श्री बाबांची आरती गुणगुणते. वय लहान फक्त दोन वर्षाचे....पण अक्कल फार. बोलण्यात चतुर. आम्ही समाधीचे दर्शन घेत असता पू. बाबांना शाल व पुष्पहार अर्पण करीत होतो. आईच्या (सौ. शितल) कडेवर बसून 'राणी' भरलेल्या बाटलीने पाणी पीत होती. अर्धे पाणी पिऊन झाल्यावर तिने पाण्याची बाटली समाधीवर ठेवली व मोठ्याने "बाबा, मी पाणी प्याले.... आता तुम्ही प्या," असे बाबांना सांगितले. ह्या तिच्या कृतीने सर्वच भक्त आश्चर्यचकीत झाले. इतर भक्तांस दर्शन मिळण्यासाठी आम्ही दूर झालो. बाहेर आल्यावर माझ्या दुसऱ्या नातीने—अमृताने (मुलीच्या मुलीने) 'आजोबा, राणीने पाण्याची बाटली समाधीवर ठेवली आहे, बाबांना पाणी पिण्यासाठी," असे सांगताच सौ. शितल राणीस घेऊन परत समाधीजवळ गेली. बाटली श्रींच्या समाधीवरच होती. पण त्यातील पाणी जेमतेम एक चमचाच शिल्लक होते. हे पाहून राणी म्हणाली, "आजोबा, बाबा पाणी प्याले." आणि खरोखरच अर्ध्या बाटलीतील पाणी एक चमचाच शिल्लक होते. मी तेच तीर्थ म्हणून प्राशन केले व अन्य सर्वांस दिले. यावरुन राणीच्या भोळ्या भक्तीने बाबा भारावले व पाणी प्याले. भक्तांच्या भोळ्या भाबड्या भक्तीसाठी बाबा केव्हाही धाव घेतात, हेच यावरुन सिद्ध होत नाही का!

# "द्वारकामाई"

अवतार तो दत्तगुरु, घेऊनि नाम साई।
साईंच्या चरणस्पर्शे, पुनित द्वारकामाई।
दुबळ्या वाचे वर्णू, कशी मी तीची नवलाई।
संकटसमयी ह्दयी धरते, ती वत्सल आई ॥ १ ॥
प्रज्वलित धुनी देते। उदी हरण्या त्रिताप।
दर्शनि हरते शिळा। अनंत जन्मीचे पाप।
दयार्णवी नेत्री स्त्रवते। ममतेचे स्त्रोत ठायीठायी
संकटसमयी ह्दयी धरते, ती वत्सल आई ॥ २ ॥

— सौ. शामा कर्णिक
४ सी (२३), 'वर्सोव्हा व्ह्यू',
चार बंगला, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०० ०५८.

# बाबांची अंकित मुलं

**– श्री. अनिल केशवराव रसाळ**
२१/३८२, बी.पी.टी. स्टाफ क्वॉर्टर्स,
रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व), मुंबई-४०० ०३७.

आपण आपल्या उपास्यदैवताला व समर्थ सद्‌गुरुंना बाबा म्हणतो व स्वतःला त्यांची मुलं असं संबोधतो. पण आपण जरी स्वतःला त्यांची मुलं असं म्हणत असलो तरी त्यांनी मात्र आपल्याला अंकित म्हटले नसते.

याचा अर्थ असा की काय बाबा मुलामुलांत फरक करतात? अगदी स्पष्ट उत्तर असे की असा निश्चित फरक बाबा स्वतः करतात.

प्रथम आपण असं पाहू या की, मुलं व अंकित मुलं यांच्यात काय फरक आहे.

आपण ज्या ठिकाणी राहतो, त्या ठिकाणी आजुबाजूला बरीच लहान मुलं असतात. त्या सर्वांवर आपण प्रेम करतो परंतु त्या सर्वांच्या पालनपोषण व निवाऱ्याची जबाबदारी काही आपल्यावर वैयक्तिक असत नाही. अशी जबाबदारी त्या मुलांच्या आईवडिलांवर किंवा ते जिवंत नसल्यास त्यांच्या पालकांवर असते.तसंच जरी सर्वच जण शिर्डीला येत असले तरी ते सर्वजण अंकित मुलं या व्याख्येत बसू शकत नाहीत. थोडक्यात अंकित मुलं होण्यासाठी काही पात्रता व कसोटया श्रींनी ठेवलेल्या आहेत.

ज्या घराण्यात आपण जन्मतो त्याची परंपरा, रीती त्या घराण्यातील सदस्यांना **चालवाव्या लागतात. त्या घराण्याला काळीमा लागणारी गोष्ट किंवा कृति त्यातील सदस्य जन्मजात कर्तव्य म्हणून करीत नाही. शिवाय त्या घराण्यातील कर्तव्य कसोशीने पार पाडण्याची नैतिक जबाबदारी त्या घराण्यातील सदस्य म्हणून येते. ती नाकारता येत नाही. तशाच प्रकारे भक्त व अंकित याबाबत म्हणता येईल.**

बाबांचे भक्त लाखो आहेत परंतु अंकित मुलं फारच थोडी आहेत. याचे कारण अंकित मुलं होण्यापूर्वी श्रींनी फार मोठया व प्रदीर्घ अशा कसोटया ठेवल्या आहेत. त्या सर्व कसोटया उत्तीर्ण झाल्याशिवाय अंकित होता येत नाही. इतर भक्तांना अशा कसोट्या द्याव्या लागत नाहीत. ते दर्शन घेतात इच्छा तृप्ती पुरतीएवढी व तितकीच भक्ती करतात व निघून जातात. त्यांना श्रींनी आखून दिलेल्या शिस्तीचे पालन करण्याचे बंधन अंकितांसारखे पाळावे लागत नाही. देव सगळ्यांचा असतो व तो सर्वांवर प्रेम करतो, या नियमानुसार श्री बहुतेक भक्तांवर प्रेम करतात पण त्यांची सर्व प्रकारची जबाबदारी मात्र ते घेत नाहीत. अशी पूर्ण जबाबदारी ते फक्त अंकितांची घेतात.

**आता अंकिताच्या कोणत्या कसोट्या घेतल्या जातात, त्याचे थोडक्यात वर्णन करूया**

सर्व प्रथम श्री अंकित होऊ पहाणाऱ्या भक्तांना सत्यावर आधारलेले आचरण ठेवण्याची फार मोठी शिस्त घालतात. हल्लीच्या काळात ही कसोटी पार पाडणे फार कठीण आहे. कारण हल्ली भक्तांची निंदा व कुचेष्टा करण्याची "फॅशन" आहे. शिवाय असत्याला यश मिळण्याचा हा काळ आहे. त्यामुळे या एका गोष्टीच्या आचरणासाठी

भक्ताला व बऱ्याचशा ऐहिक गोष्टींना मुकावे लागते. व यासाठी त्याला फार मोठे मानसिक क्लेश सहन करावे लागतात. कारण या कसोटीच्या वेळी श्री भक्ताच्या मार्गात थोड्याशा तडजोडीने खूप प्रलोभन मिळू शकतील अशीच योजना करतात. त्या प्रलोभनांना स्विकारल्याने अशा भक्तांचे चटकन् काही बिघडणार नाही. शिवाय त्या प्रलोभनांमुळे त्याची सामाजिक प्रतिष्ठा मात्र वाढणार असते. अशा प्रतिष्ठेची अगदी "मी" "मी" म्हणणाऱ्या भक्तांना भुरळ पडते. तेव्हा सर्वप्रथम याच कसोटीत बहुतेकजण घसरतात.

दुसरी कसोटी म्हणजे खूप मोठा लौकिक मिळणे. लेख, प्रवचनं करण्याच्या कलेने भक्ताला अनेकजण मानतात. काहीतर चक्क त्याचे पाय धरतात. त्याच्या शब्दाखातर इतरजण काहीही करण्यास तयार होतात. त्यामुळे श्रीकृपेने मिळालेली कीर्ति ही भक्तामध्ये न कळत गर्व निर्माण करते. तो स्वतःला मनोमन मोठा समजतो. त्याप्रमाणे वागू लागतो. स्वतःला गुरु व इतरांना शिष्य म्हणतो. असं करताना नकळत तो गुरुने ठेवलेल्या एका कसोटीतून पूर्ण नापास होतो. कारण अहंकाराने गुरुकृपा नाहीशी होते.

तिसरी कसोटी म्हणजे श्रद्धेला तडे जाणाऱ्या प्रसंगांची श्री मालिका निर्माण करतात. या मालिकेचा एक अविभाज्य भाग म्हणजे चुकीचे मार्गदर्शन करणारे स्वप्न, दृष्टांत व आज्ञा. या भक्ताने पाळल्या तर त्याचे नुकसान होते व अशा मालिकेमुळे त्याची गुरुवरील श्रद्धा साफ नाहीशी होते. ही अतिशय बिकट अशी कसोटी आहे. पण ही द्यावीच लागते. चिल्याबाळाची मटन खाण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्या शंकराची आज्ञा वाचकांनी लक्षात ठेवावी. बाबांची पद्धत सुद्धा खुंटा मूळापासून हलवून हलवून घट्ट झाला की नाही हे पहाण्याची आहे. हल्लीच्या धकाधकीच्या काळात स्वतःचं नुकसान झाले म्हणून दैवतं बदलण्याचा काळ आहे. कोणीही इतकी सबुरी दाखवत नाही की ही आपली कसोटी आहे व ती आपल्या गुरुवरील श्रद्धा दृढ आहे की नाही हे जोखण्यासाठी घेतली आहे. त्यामुळे वरील सांगितलेल्या कसोटींतून पास झालेले भक्त या कसोटीत नापास होतात.

चौथी कसोटी व ही सर्वात कठीण अशी कसोटी आहे. ती म्हणजे पाप व पुण्यातीत मनोभूमिकेतून सर्व कर्म करणाऱ्या प्रवृत्तिची. इथं गुरु अशी आज्ञा देतात की ती पाळल्याने आपण दुष्कृत्य करीत आहोत असं केवळ इतरांनाच नव्हे तर स्वतः त्या भक्ताला वाटणे. त्यामुळे गुरुची आज्ञा मिळूनही ती न पाळण्याचा कल सर्वच भक्तांचा असतो. श्रीसाईसच्चरित्राच्या २३व्या अध्यायात श्री आसन्नमरण बोकड मारण्यासाठी शामा, बडे बाबा व इतरांना सांगतात. तेही आज्ञा पाळत नाहीत. पण श्री. दीक्षित ही आज्ञा कसोशीने पाळतात व त्यातून यशस्वीपणे उतरतात. हे उदाहरण देता येईल. पण हे एक उदाहरण झाले. प्रत्यक्षात मात्र अशा अनेक बिकट आज्ञा निरंहकारी वृत्तिने भक्तांना पाळाव्या लागतात. त्याच्या मनात हे पाप आहे असा विचार येणं फार चुकीचं आहे. त्याचबरोबर एखाद्या भक्ताला श्रींनी सांगितल्याप्रमाणे तंतोतंत मार्गदर्शन

केल्याने त्याचे संकट दूर होणे व त्यामुळे आपण फार मोठं पुण्यकर्म केलं असं न समजणं, ही एक मोठी बिकट कसोटी आहे. या संदर्भात श्रींनी उपासनींची घेतलेली कसोटी फार बोलकी आहे. खंडोबाच्या देवळात उपासनींना श्रींनी त्यांचे अतिशय विद्रूप असे रुप दाखवले व सांगितले की हे तुझे पापरुप आहे. ते मी आज नाहीसे करीत आहे. यानंतर श्रीउपासनींची ती मूर्ति नाहीशी झाली. नंतर अत्यंत तेज:पुंज अशी उपासनींची मूर्ति त्यांना दिसली व त्याचा असा खुलासा केला की, हे तुझे पुण्यरुप आहे. उपासनींना ते रुप पाहून आनंद झाला. पण श्रींनी तेही रुप नाहीसे करायला सुरुवात केली तेव्हा ते ओरडू लागले, तुम्ही मला मारता आहात हे योग्य नाही. तेव्हा श्रींनी स्वप्नाद्वारे त्याचा खुलासा केला की, तू उपाधिरहित साक्षी असा आत्मा आहेस. तेव्हा ही अतिशय बिकट अशी कसोटी यशस्वीपणे देता येणं म्हणजे खरी श्रीकृपेची पावती. कारण सर्वात कठीण अशी गोष्ट म्हणजे सात्विक अहंकारावर विजय मिळवणं. माणूस सहसा सत्कर्माचं श्रेय स्वत:कडे घेण्यास कचरत नाही. त्याचबरोबर पापाचं श्रेय स्वत:कडे घेण्यास तयार असत नाही. त्यामुळे ही कसोटी पार पाडणं म्हणजेच श्रींशी एकरुप होणं. थोडक्यात सागराला नदी मिळाल्यानंतर ती पुन्हा परतत नाही, ती स्वतः सागर होते. त्याप्रमाणे भक्त पूर्णपणे समर्थ सद्‌गुरुरुप होतो. त्यांचा अंकित होतो. त्याच्या प्रार्थना यशस्वी होतात. त्याचे संकल्प सिद्ध होतात. व त्याची निरंहाकारी वृत्ती सर्व कसोटीतून उतरल्याने अबाधित रहाते. त्याच्यावरील कृपा ही चिरंजीव असते. हनुमान भक्तांना रामाची वेगळी उपासना करण्याची गरज रहात नाही. कारण रामभक्त हनुमान हा स्वतः संपूर्ण राममय आहे.

भक्तांनो, अंकित होण्यापूर्वीच्या या कसोट्या मी श्रीकृपेने थोडक्यात सांगितल्या आहेत. या कसोट्या म्हणजे सर्वच कसोट्या आहेत, असं मात्र समजू नका. कारण भक्ताच्या आवडीच्या व आकर्षणाच्या वस्तू अनेक आहेत. त्यांचा त्याग करण्याच्या कसोट्यासुद्धा तितक्याच विविध आहेत. पण प्रत्येक कसोटीतून पार झाल्यानंतरही भक्ताला साधना चालू ठेवावी लागते. कारण विवेक व वैराग्य अबाधित ठेवणं म्हणजेच अंकित पदावर कायम रहाणं होय! परंतु अंकिताची व त्याच्या सर्व कुटुंबियांची सर्व प्रकारची काळजी सर्व ठिकाणी सर्व काळी व जन्मोजन्मी श्री घेतात हे मात्र निर्विवाद व त्रिकालाबाधित सत्य आहे.

अशा कसोट्या घेतल्याने आपल्या सर्व ऐहिक व पारमार्थिक गोष्टींची श्री काळजी घेत असल्याने त्या देण्यास आपण कचरु नये. उलट त्या देऊन आपण आप्लं अंतिम कल्याण होतं आहे हे नित्य लक्षात ठेवावे. व तेच कसोटी घेत आहेत व तेच त्या देत आहेत या भूमिकेने द्याव्यात.

# रक्षण करी – साई हरी

– श्री. विलास तुकाराम पडवळ
१७३/४, शिवनेरी,
दादासाहेब फाळके मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४.

सद्‌गुरु साईमाऊली आपल्या भक्तांची काळजी नेहमीच घेत असते. आपल्या पिलांवर कासवाची जशी दृष्टी असते, तशीच कासवदृष्टी समस्त भक्तांवर साईमाऊली ठेवत असते.

मला या संदर्भात आलेला अनुभव असा– मी कोकणांत १९८७च्या मे महिन्याच्या सुट्टीत मुलांना घेऊन माझ्या मामाच्या गावी गेलो होतो. मामाच्या अंगणातच उन्हाळ्यात गुरांना बांधतात. सावलीसाठी मंडप करुन त्यावर माडापासून केलेल्या झावळांचे झाकण घालतात. मंडप साधारण अठरा ते वीस फूट उंचीचा असतो.

एके दिवशी दुपारची बारा-साडेबाराची गोष्ट. माझा अकरा वर्षाचा मोठा मुलगा चि. प्रसाद हा त्या मंडपावर पडलेला एक आंबा काठीने ढकलून पाडण्यासाठी मंडपालगत असलेल्या डगरीवर गेला. डगर कुठे संपते आणि मंडप कुठे सुरु होतो, याचे भान न राहिल्याने त्याचा पाय सरळ मंडपाच्या झावळांवर पडला आणि....अठरा-वीस फुटांवरुन तो धाडकन् खळ्यात पडला.

विशेष म्हणजे तो जिथं पडला, त्याच ठिकाणी खाली दोन बैल बांधलेले होते आणि त्या दोघांचीही शिंगे सरळ, उंच, टोकदार होती. पण माझ्या साईची किमया अशी की, तो पडला तोच मुळी दोन बैलांच्या तोंडा-मधोमध. आम्हा सर्वांची घाबरुन त्रेधा तिरपीट उडाली. अर्धा एक मिनीट तो तसाच पडून राहिला आणि लागलीच उठून चालत घरात आला.

थोडासा जरी तो बाजूला पडला असता तर बैलांच्या शिंगावर पडला असता आणि पुढच्या विचाराने अंगावर शहारेच उभे राहिले. शिवाय इतक्या उंचावरुन पडून केवळ अकरा वर्षाच्या मुलाला जरादेखील लागलं नाही.

अशाप्रकारे या भयानक संकटातून माझ्या साईमाऊलीने आम्हाला सोडविले आणि एखाद्याला झेलतात तद्वत चि. प्रसादला झेलून बैलांच्या बरोबर मधोमध अलगद ठेवल्याप्रमाणे रक्षण केले.

श्रीसद्‌गुरु साईमाऊली अशीच कासवदृष्टी आपल्या समस्त भक्तांवर ठेवू देत हीच त्या सर्वव्यापी, सर्वसाक्षी साईंपाशी नम्र प्रार्थना.

# साईभक्त – आज आणि काल

– श्री. अ. ग. सुर्वे
२/५, चित्तरंजन नगर,
राजावाडी, घाटकोपर,
मुंबई-४०० ०७७.

साई ह्या नावात किती अविट गोडी आहे. साई म्हणजे सर्वांची आई. ज्याप्रमाणे आई आपल्या मुलांवर अपरिमित प्रेम करते. ते मूल गुणांनी चांगले अगर वाईट असो, आईची ममता दोघांवरही सारखीच असते. तद्वत साईसुद्धा आपल्या भक्तांवर समतेने ममता करतात. त्यांचा अनादर करीत नाहीत. एकाद्या चुकत असलेल्या भक्ताला तो चांगला वागावा म्हणून त्याला शिक्षा करतील पण त्यांच्यातून तो चांगला माणूस निर्माण झाला पाहिजे, हीच बाबांची धारणा असते. साईंच्या हयातीत त्यांचे जे थोर भक्त होऊन गेले, त्यांत म्हाळसापती, माधव देशपांडे, बुट्टी, दाभोळकर इत्यादिकांचा समावेश करता येईल. सूक्ष्म दृष्टीने विचार केला तर तत्कालीन भक्त साईंवर निरतिशय निर्वाज्य प्रेम करीत होते. साईंना ईश्वरासमान मानून त्यांनी आपलं जीवन साईचरणी लीन केले होते. साई हेच त्यांचे दैवत, संसाररुपी गाडा चालविणारी नौका असे वाटत होते. थोडक्यात, त्या भक्तांना साई हेच सर्वस्व वाटत होते. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास म्हाळसापतींची अनन्य भक्ती कशी भव्य-दीव्य होती हे आपणास कळून येईल. त्यांच्या आर्थिक परिस्थितीची कीव येऊन एकदा एका व्यापाराने पैसे देऊ केले पण त्यांनी ते नाकारले व आम्ही भक्त खऱ्याखुऱ्या भक्तीचे पाईक आहोत, पैशाच्या लोभाचे नाही, असे सांगितले. यावरुन त्यांच्या खऱ्या भक्तीची व थोर मनाची कल्पना करता येते.

आज परिस्थिती जरी बदलली असली तरी भक्तीची कल्पना मात्र बदललेली नाही. पूर्वीपेक्षा बाबांचे दर्शन घ्यावयास लाखो भाविक आज शिर्डीला जात आहेत. वैचारिक भूमिकेतून पाहिले तर लोक काहीना काही अपेक्षा घेऊनच शिर्डीला जातात व हे सहाजिकच आहे. निस्सीम भक्तीची भावना फक्त थोड्या लोकांच्याच अंत:करणात असते. आपण एकाद्या महान् विभूतीला आपलं दैवत मानले, म्हणजे आपल्या सर्व आशा आकांक्षा त्याच्या चरणी वाहतो. भवितव्याची काळजी त्याच्यावर सोपवितो. खरा भक्त देवाजवळ पैशाची याचना करीत नाही. कां की आपला उदारनिर्वाह त्या महान् विभूतीच्या आशीर्वादानेच चालला आहे, मग भवितव्याची काळजी का करावी? अशी दृढ भावना मनात ठेवूनच साईची भक्ती करतो. अशीही काही मंडळी आहेत की केवळ व्यापारात फायदा व्हावा म्हणून वारंवार शिर्डीला जातात. केवळ फायदा व्हावा हाच शिर्डीला जाण्याचा त्यांचा उद्देश असतो, असेच नाही कां?

बाबांनी भक्तांना दिलेली शिकवणूकही अत्यंत मोलाची आहे. भगवान श्रीकृष्णाने गीतेत ज्याप्रमाणे सांगितले आहे की, "कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । मा

कर्म फल हेतु भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे, फल मिळणे किंवा न मिळणे हे केंव्हाही तुझ्या अधिकारातील नाही, म्हणून तू माझ्या कर्माचे अमुक फल मिळावे, असा हेतू मनात ठेवून काम करणारा होऊ नको, आणि कर्म न करण्याचा आग्रह तू धरु नकोस. फलाची अपेक्षा न करता, रंजल्या गांजलेल्यांना दया, प्रेम, माणूसकी दाखविणे म्हणजेच बाबांची खरीखुरी शिकवणूक आचरणात आणणे होय.

संत तुकारामानी पांडुरंगावर निस्सीम भक्ती केली. त्या भक्तीच्या प्रभावाने तुकारामाला सरस्वतीचा वरदहस्त लाभून भगवंतावर अविस्मरणीय अशी साध्या व सोप्या भाषेत अभंग रचना करुन भक्तीची व एकात्मतेची शिकवणूक सामान्य जनतेच्या हृदयापर्यंत पोहचविली. आज आपण तुकारामाचे अभंग गाऊन परमेश्वरावरील भक्तीची ज्योत सतत मनात तेवत ठेवण्याचा प्रयत्न करतो आहोत. अशा भक्तीतूनच सामान्य माणसांच्या जीवनाला कल्याणाचा मार्ग मिळून त्याचे जीवन भव्य-दीव्य होण्यास मदत होते. पांडुरंगाच्या दर्शनाला दींडी घेऊन भाविकजन एक ते दीड महिना पायी जात असतात. ह्या सामान्य माणसांना काय मिळवायचे आहे? ईश्वरावरील अलोट भक्तीचा ठेवा. आपल्या भवितव्याचा जरासुद्धा विचार मनात न ठेवता किंवा पांडुरंग आपणास अलोट संपत्ती देणार याचा यत्कींचितही लवलेश मनात न बाळगता फक्त पांडुरंगावरील भक्ती प्रेम हेच जीवनातील इतिकर्तव्य असे मानून पंढरीला जात असतात. यातच परमेश्वरा वरील खरी भक्ती आढळून येते. मानवतेचा प्रसार करण्यास सर्वधर्म एकात्मतेची शिकवणूक संतांनी स्वतःच्या आचरणाने जगाला दिली. "जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती."

शिर्डीला साईच्या दर्शनाला जाणारे आम्ही सर्व भक्त, स्वतःच्या तसेच इतरांच्या कल्याणासाठी सर्वधर्मबंधुभाव मनात सतत ठेवून निर्वाज्य मनाने बाबांची सेवा करणे यातच खरी साईची शिकवणूक आचरणात आणण्याचे श्रेय आपणास लाभणार आहे.

---

## : चुकीची दुरुस्ती :

मे, १९८७च्या श्री साईलीलाच्या अंकात साई दरबारातील नवरत्ने – ८ "श्री तात्याबाबा कोते पाटील" यांचे अल्पचरित्र देताना, पान नं. ४४, ओळ नं. १३ वर तात्याबांचे वडील **गणपती** ऐवजी 'बयाजी' छापले गेले आहे.

तसेच ओळ नं. २२ वर "तात्याबाची घरची गरीबी असल्याने, बाबा त्यांना दररोज खर्चासाठी चार रुपये देत असत" असे चुकीचे छापले गेले आहे.

वास्तविक उपलब्ध माहितीनुसार तात्या पाटील कोते हे सधन शेतकरी कुटुंबातील होते व बाबा त्यांना दररोज १० ते १५ रुपये देत असत.

अनावधानाने प्रसिद्ध झालेल्या चुकीच्या माहितीबद्दल दिलगीर आहोत.

**– संपादक**

# माझे दैवत श्रीसाईबाबा

**– ताराबाई ह. मांजरेकर**
झरीहर भैयाची चाळ,
कोल डोंगरी, गल्ली नं. १,
सहार रोड, मुंबई-६९.

'साई' ह्या नावाचा उच्चारच मुळी असा आहे की, तो शब्द उच्चार करताना अंत:करण पिळवटून शब्द बाहेर उमटतो.

'साई' हे एक जागृत देवस्थान आहे. तुम्ही कोणीही त्यांची कशी ही भक्ती करा, ती साईंना मान्य आहे. त्यांच्या पुजेत सोवळे ओवळे नाही, जातीभेद नाही, धर्मभेद तर मुळीच नाही. आज साईंच्या निर्वाणाला ६९ वर्षे होऊन गेली तरी साईमाऊली भक्तांसाठी या ना त्या रुपांतून भक्तांमध्ये वावरत असतात. कोणाला स्वप्नात दृष्टांत देतात, तर कोणाला साक्षात त्यांच्या गुरुरुपांत दर्शन देतात. साईंनी आपल्या ब्रीद वाक्यात म्हटले आहे की, तुम्ही जसे मला भजाल तसा मी तुम्हाला पावणार.

आज कालच्या जीवनाच्या वाटा एवढ्या बिकट झाल्या आहेत की, मनुष्याची मती गुंग होते. बाबांनी ह्या सर्व गोष्टींवर यापूर्वीच विचार करुन आपणा सर्वांसाठी फार चांगले अनुभव साईचरित्रामध्ये लिहून ठेवले आहेत. माणसाने भक्तीभावाने जर त्या पोथीचा वाचून रस प्याला तर त्याला ह्या जगात आहे ते दिवस सुख समाधानाने अंतकाळ पर्यंत काढता येतील.

साईबाबा हे कृष्णाचे अवतार होते. ते वारंवार कृष्णलीला करून भक्तांना दाखवीत. त्यांची सेवा करण्याची संधी ज्या भक्तांना मिळाली, धन्य ते साईभक्त। त्यांना माझा शतशः प्रणाम. एकदा शिर्डीला अचानक फार मोठे सोसाट्याचे वादळ व पाऊस आला. घरे, दारे, गुरे, वासरे सर्व पाण्याने भिजून गेले व सर्व मशिदीच्या निवाऱ्याला आली. जसे कृष्णाने गोवर्धन पर्वत करंगळीवर उचलून धरला व गोकुळवासियांचे संरक्षण केले, तसे साईबाबांनी मशिदीमध्ये निवाऱ्याला आलेल्या माणसांचे संरक्षण केले. ते मशिदीच्या उंबरठ्यावर पावसाच्या धारेत उभे राहिले व मोठमोठी आकाशाकडे पाहून गगनभेदी अशी कानठळ्या बसणारी आरोळीवर आरोळी मारु लागले. त्या आवाजाने वरुण देवाला थांबणे भाग पडले. गुरुसमोर देवाचेही चालत नाही. हेच प्रत्यक्षात बाबांनी करुन दाखविले. असे आहेत आमचे बाबासाई. साईबाबा आपल्या प्रत्येकाच्या हृदय सिंहासनावर बसले आहेत. जसा ज्याचा भाव, तसा पावे साई देव. आजपावेतो भारतात कोट्यावधी संतांच्या समाध्या आहेत, पण साई समाधी स्थानाचा महीमा आज दिगंतर दुमदुमत आहे, दुमदुमत रहाणार आहे.

**आपण एवढेच करावे**

साई साई नाम जपारे मनुजा । पुनरुपी नाही मनुष्य जन्म
कीतीदा तू जन्म घेशी रे मनुजा । अजुनी किती योनी तू फिरणार ॥१॥

या भव नदीतून पार कराया । साईनाथा तूच माझा तारु
अनन्यभावे शरण आले । ने साई तू आम्हा पैलतीरु ॥२॥
मायबाप बंधु सर्व असती परी । कोणी दु:ख ना माझे हरु
हिन दिन मी दया सिंधु तू । तुजवीण साई मी निराधारु ॥३॥
आहे मी सत्य अनंत अपराधी । एक वेळ दे साई निजपदी धारु
कनवाळू प्रेमळू परम कृपाळू तू । साई आम्हा भक्ता कल्पतरु ॥४॥

# सुखाचा शोध

– **श्री. चकोर आजगांवकर** एम्.ए.
(उपसचिव शिक्षणखाते)
वाय ११/१७०, सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

● मी एक मानव आहे, सुखासाठी तळमळणारा.

● मी अखंड सुखाचा शोध घेतो आहे. मनुष्य जन्माला आल्यानंतर मन, बुद्धि, विचार, प्रयत्न हे सारे मार्ग सुखाच्या प्राप्तीसाठी मी लावले आहेत. प्रथमत: मला वाटते की मी साहित्यकलांचा एम्.ए. आहे, मी शासनात उच्चाधिकारी आहे, माझी पत्नी सुशील **सुंदर आहे, मुले गुणवान, कर्तृत्ववान आहेत, मला समाजात लौकिक आहे, हेच काय सुख आहे. पण ही जीवनाच्या कलहात अपरिहार्यपणे केलेली धडपड आहे. त्यातून** झालेले सहज निष्पन्न आहे. हे काही जीवनाचे प्रयोजन नाही, की सुख नाही! क्षुद्र **अहंकार जोपासणारा हा संसाराचा चक्रव्यूह आहे. त्याहून वेगळे काही श्रेष्ठ सुख आहे, याची जाणीव मला हळूहळू होऊ लागते.**

● वर जे मी भ्रामक मिथ्या सुख वर्णिले आहे, ते 'मी' 'माझे' या आसक्तीच्या बंधनांनी बांधलेले माया ममतेचे जाळे आहे. त्या प्रत्येक भ्रामक प्रतीकामागे दु:खाची सावली लपलेली आहे. **कारण ईश्वराने जगाच्या निर्मितीच्या वेळीच त्या जीवन कलहाचे फलित हे भ्रमनिरास एवढेच लिहिले आहे. हा जगाचा प्रपंचाचा पसारा शेवटी वैफल्याच्या निर्मितीसाठी ईश्वराने मांडला आहे. हेतू हा की हा भ्रमनिरास झाल्यानंतर जीव हा "सुख हे बाहेर नाही" हे जाणून आतील सुखाचा शोध घेईल.**

● ज्यामुळे सुखदु:ख या प्रतिक्रिया मनाने निर्माण होतात, त्या अहंकाराचे निराकरण व्हावे यासाठी हे नाटक मांडले आहे. अहंकार व आसक्तीच्या नाशावाचून आतील सुखाचा झरा सापडत नाही, हे सत्य होय. **ईश्वराचीच या जगरहाटी मागील एक सुप्त वा प्रच्छन्न इच्छा आहे की, 'अस्तित्वा'चा अर्थ 'दु:ख' हाच आहे!**

मनातील संकल्प, विचार तरंग, गतकालाच्या स्मृती, वर्तमानाचे निष्कर्ष, भवितव्याच्या आशा याहून भिन्न अलिप्त असा मनाचा गाभा आहे. तो निवडशून्य जाणीवेचा (choiceless awarenessचा) आहे. या विरोधाभासात्मक जगात माणसाचे मन सदैव चंचल, तरंगात्मक, प्रक्षुब्ध, व्यग्र असते. या अशांत मनाच्या

वर्तुळाचा मध्य मात्र शांत आहे. **मन हे इच्छांचे एक गाठोडे आहे. त्याच्या मध्यभागी शांत राहून आजूबाजूच्या अशांत तरंगाकडे पहावयाचे शिक्षण हे सुखाचा शोध घेण्यासाठी आत्मसात करावयाचे असते.** फिरणाऱ्या मनश्चक्राच्या आऱ्यात न अडकता मध्यभागी असलेल्या शांतिकेंद्रात स्तब्ध राहिल्यास माणूस हा सुखदु:खाच्या गतीत सापडत नाही. सर्व साधनाचे हेच मर्म आहे.

● मनाचा तळ शांत ठेवून बाहेरची अस्वस्थता दुर्लक्षता आली पाहिजे. जगाला न चिकटता स्थिर रहाता आले पाहिजे. **मनाच्या एकांतात, अलिप्तप्रवृतीत रहा. एक निरागस सहजावस्था म्हणजेच अखंड शांतीचा झरा आहे. सर्व कल्पना, विचार, संकल्प, आशा यांचा त्याग करुन निर्लेप वृत्तीने आत्मरत रहाणे, हेच सुखशांतिमार्गाचे द्वार आहे.** साऱ्या उपनिषदांनी, वेदांताने, ऋषीमुनींनी संसाराचा हा अर्थ वेगवेगळ्या शब्दात मांडला आहे, पण अर्थ एकच आहे. याचे विवेचन पुढे जास्त करीन.

**"या विश्व नाटकी रंगावे अंगांग**
**परि अंतर्यामी नसो कुणाचा संग** (श्रीसाईगीतायन)

# चला आपण शिरडी ज़ाऊ

चला आपण शिरडी जाऊ
आशिर्वाद बाबांचे घेऊ .. धृ० ..

बाबा आमचे कल्पतरू
चला तयांचे चरण धरू
दोन्ही हात जोडूनी
सदा तयांचे स्मरण करू .. १ ..

जाऊनी शिरडी होऊन दंग
गाऊ आपण दोन अभंग
करील कोणी त्यांची निंदा
होई तेथे तो शरमिन्दा .. २ ..

गर्वाचा येतो साईना राग
नंतर पडते शिरडी महाग
चला आता दर्शन घेऊ
शिरडीला परत जाऊ .. ३ ..

**— कु. प्रशान्त श्रीधर राणे**
न्यू एअर इंडिया कॉलनी, ए. १०९, कालिना,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०२९.

# शिरडी वृत्त
# जून १९८७

या महिन्यात साईभक्तांची श्रींचे दर्शनासाठी गर्दी बरीच होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे–

**कीर्तन :–**
१) ह.भ.प. मधुकर गणेश सुर्यवंशी, संस्थान गवई, पुजारी, कीर्तनकार, प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली.
२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी
३) ह.भ.प. चंद्रकांत वजलवार, नागपूर
४) ह.भ.प. सौ. ललीतप्रभा कुलकर्णी, गणेशपुरी

**प्रवचन :–**
१) ह.भ.प. नारायणराव जोशी, एनगांव. पिंप्री
२) ह.भ.प. सौ. मंगला अमलेकर, फरिदाबाद
३) ह.भ.प. आप्पासाहेब गोविंदराव डीके, बेलापूर

**भजन, गायन, वादन इ. –** १) श्री. भिमराव शामराव खंडारे, मंगरुळ २) सौ. उमाताई खंडारे ३) श्री. अनुराग श्रीवास्तव, मुंबई ४) लक्ष्मीरंजन, मुंबई ५) श्री. देवेसकर, मुंबई ६) श्री. विलास वायकूळ ७) सौ. मीना रेळे, माहीम ८) सौ. आसावरी वायकूळ, घाटकोपर ९) श्री. निनाद वायकूळ १०) श्री. आर. प्रतापराजू, पावगडा ११) श्री. कुमार विलास चुडामण विसपूते, शिरडी १२) श्री. एम. नागेश्वर, विजयवाडा १३) श्री सिद्धेश्वर विठ्ठल पंथीय भजन मंडळ, कागल १४) रमाबाई मुळे, नेर १५) श्री. अनंत एस. पांचाळ, मुंबई १६) श्री. वि.वि. कीर्तने, पुणे १७) श्री. रमेश बेगरुर १८) श्री. जे.व्ही. शेणॉय, मुंबई १९) श्री. मधुकर गुजर, ग्वाल्हेर २०) श्री. के.जी. नायक २१) श्री. एम. रामायन, बरंगुळ २२) श्रीमती रेणु कौशिक, सिमला २३) श्री दत्तभजनी मंडळ, हूकेरी २४) श्री. हरीशप्रसाद जोशी, जबलपूर २५) श्री. सुरेंद्र सक्सेना व पार्टी, दिल्ली २६) श्री. मधुसुदन शंकर कुलकर्णी, औरंगाबाद २७) श्री. कांत मधुसुदन २८) श्री. शामसुंदर भगवानराव ब्रह्मपूरीकर २९) श्री. मधुकर पंडीतराव खानोरी ३०) श्री. सदाशिवराव जोशी ३१) श्री. वसंत दत्तात्रय फुलंदीकर, अंधेरी ३२) श्री. दिनकर केशव वेलनकर, गिरगांव ३३) श्री. के. नागविरम गुप्ता, हैद्राबाद.

**हवापाणी :–** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पावसाळ्यास सुरुवात झाली आहे. परंतु अगदी कमी प्रमाणात पाऊस पडला.

# शिर्डीच्या साईबाबांची कथा

(चाल - ही ऐक सत्यनारायणाची कथा)

ही ऐक शिर्डीच्या साईबाबांची कथा ।। धृ. ।।
एक होतं दुष्काळी गांव
सुंदर शिर्डी हे त्याचे नांव
लोकांची झाली तिंथे धावाधाव
लक्ष देऊनी ऐका हो राव

असाच एक शुभ्र दिवस उजाडला
भूमीत ओमकार हुंदकारला
प्रत्यक्ष साई तेथे अवतरला
येती माणसांचे घोळके त्याला बघण्याला

काही लोक लागले त्याला छळायला
नकार देती तेल देण्याला
साई म्हणती नाही तोटा पाण्याला
पाण्याने पणत्या पेटवूनी प्रकाश केला
श्रीहरी जगज्येता, झाला शिर्डीचा नेता,
दूर करी लोकांच्या व्यथा ।। १ ।।

थकला चांद घोडी शोधून
एक फकीर आला कोठून
म्हणे दे चांद चिलिम पेटवून
मी देतो तुझी घोडी शोधून

चांद आश्चर्यचकीत झाला
घोडी मिळताच तो तृप्त झाला
परी विस्तव नाही चिलिम पेटवण्याला
फकीराने चिमट्याने अग्नी भडकवला

चांद फकीराचे चरण धरी
म्हणे एकदा यावे माझ्या घरी
निघाली वरात शिर्डी नगरी
मागून आली फकीराची स्वारी
अगाध त्याची सुंदरता, थोर त्याची दिव्यता.
झाला सगळ्यांचा पिता ।। २ ।।

खंडोबा पावला म्हाळसापतीला
फकीर आला त्याला भेटण्याला
आवो साई असे उच्चारला

म्हाळसापती जगी धन्य झाला
आनंद झाला बायजाबाईला
फकीरास बोलवी ती भोजनाला
चढले तेज द्वारकामाईला
झाली सुरुवात न्यायदानाला
लोक म्हणती चला शिर्डीला
भेटू आपल्या साईनाथाला
दुःख सांगू आपुल्या मातेला
मस्तक लावू तिच्या चरणाला
ऐकता साईची वार्ता, आनंद होतो त्याच्या भक्ता,
ऐसी त्याची ही लिला ।। ३ ।।

— श्री. महेन्द्र जनार्दन गुरव
द्वारा वामन हरी पेठे,
पेठे बिल्डींग, रानडे रोड, दादर, मुंबई-४०० ०२८.

# (सही) सई, साई, सहाय्यी

—श्री. मधुसूदन वामन करंबळेकर
रघुनाथ निवास,
चेंबूर (गांवठाण),
मुंबई-४०० ०७१.

श्रीसाईभक्त शिरोमणी 'म्हाळसापती' यांनी सकृत दर्शनी श्रीसाईमहाराजांना 'आवो साई' अशी हाक मारली व तेच नाव बाबांनी अखेरपर्यंत धारण केले, यातही विशेष अर्थ भरलेला आहे.

सही म्हणजे खरे, सत्य असा अर्थ आहे. बोलताना ओघाने सहीचा सई शब्द होतो. आता सही म्हणजे सत्य, सत्य म्हणजे काय? जे असत्य नाही ते. असत्य म्हणजे काय? ज्याचा नाश निश्चित ठरलेला आहे ते. जे आपल्याला डोळ्यांनी दिसत आहे. त्याचा नाश निश्चित होणार आहे, किंबहुना ज्याला जन्म प्राप्त झाला आहे, त्याला मृत्यू हा ठरलेलाच आहे. चंद्र, सूर्य, पृथ्वी सर्व जग हे केव्हाना केव्हा तरी नाश पावणारच आहे. मग सत्य काय? असा प्रश्न उत्पन्न होतो.

"ब्रह्मसत्यंम् जगत् मिथ्या" हा सिद्धान्त आहे. ब्रह्म कोठे जात नाही किंवा कोठे येत नाही. 'न वर्धते न क्षीयते' वाढत नाही, कमी होत नाही. सर्व ठीकाणी ओतप्रोत भरुन राहिलेले आहे. ह्या ब्रह्माचा आधार घेऊनच माया कार्य करीत असते. ब्रह्माचा नाश नाही किंवा ब्रह्म ही एकच गोष्ट अशी आहे की, ती कोणाचे उचिष्ट नाही. म्हणून सई म्हणजे (सही) सत्य असणारे बाबा (ब्रह्म) ह्यांनी त्या नावाला मान्यता दिली व

त्या पोटी खालील सिद्धांत मांडला –
''नित्य मी जिवंत, जाणा हेची सत्य, नित्य घ्या प्रचित अनुभवे''

सई (सही) आणि साई ह्यांत फरक काय? असा एक प्रश्न निर्माण होतो. त्याचा थोडासा विचार करु या. ब्रह्माला सगुणरुपात येण्याकरिता मायेचा स्वीकार करावा लागतो. मात्र ब्रह्म मायेचे आधीन नसते तर मायेत राहून मायेपासून अलिप्त असते. जसे आकाश सर्व व्यापी असून सर्वांपासून भिन्न आहे. ब्रह्माने मायेचा स्वीकार करुन सईचा साई झाला.

स. आई सद्‌गुरुं माउली.

भक्तांना खरे ज्ञान देणारी व जीव शिवाची भेट घडवून देणारी अशी ही आई आहे.

श्रद्धा आणि सबुरी ह्या नाण्याच्या दोन बाजू आहेत. परंतु नाण्याला आणखी एक बाजू असते. मात्र ती कधीही लक्षात येत नाही. तिचे नाव **नाण्याची कडा.** कडा आहे म्हणून दोन बाजू आहेत. तसेच श्रीसमर्थसाईबाबा – नित्य जिवंत आहेत म्हणून श्रद्धा व सबुरीला किंमत आहे. चित्रातील वाघावर खऱ्या वाघाची कल्पना केली तर त्या वाघाला पाहून कुत्रासुद्धा घाबरणार नाही. जे खरे ते खरेच. बाबा हे खरे आहेत व रहाणार.

सहाय्यी– ''शरण मज आला आणि वाया गेला, दाखवा – दाखवा ऐसा कोणी,'' जो मला शरण आला त्याचा सहाय्यी मीच आहे. अर्थात सहाय्यी याचा अर्थ त्याला प्रापंचिक दुःखे राहणार नाहीत, संपत्ती भरपूर मिळेल वगैरे वगैरे. खोट्या अपेक्षा करणे चुकीचे होईल. उलट जो बाबांचा झाला त्याला बाबा नित्य माझे जवळ आहेत. प्रपंच बाबांचाच आहे. बाबांची जी इच्छा असेल त्याप्रमाणे होईल. आपण आपले कर्तव्य मात्र चोख करुया. बाबा मला मात्र आपले पायाचा विसर पाडू देऊ नका मी तुमचा आहे, सर्वस्वी मी तुमचा आहे. आपण जसे ठेवाल त्यात मी आपले नामस्मरणाने आनंदीच आहे. आपण माझी काळजी घेत आहातच मी आपल्याला जास्त काय सांगणार? सर्व जगत् ज्या ब्रह्माच्या आधारावर चालले आहे, तेच ब्रह्म शिळामाईवर बसून आम्हा भक्तांना आधार देत आहे.नव्हे आईसारखे कुशीत घेत आहे. याहून अन्य ते भाग्य कोणते? साईरामा, दुःख आमचे कर्मानी येतात– तथापि अजूनही आमचे वागणूकीत काही कमी नाही. हे पाहून खरोखर तुलाही वाईट वाटत असेल. सर्व पुराणांचे सार तूच पूर्वी आपले वागणूकीने दाखविलेले आहेस.

अष्टादश पुराणानाम्, सारमेकंसमृद्धतं

परोपकार, पुण्याय पापाय पर पीडनम्, साईरामा, तू जग पोटात घातले आहेस. तेथे आमचे अपराध पोटात का घालणार नाहीस. प्रश्न एवढाच आहे की, अपराध पोटात घाल असे सांगण्यास आम्हाला लाज वाटत नाही, म्हणजेच आम्ही सुधारत नाही साईरामा, सुख येवो अथवा दुःख येवो प्रपंचात हे चालू राहणार. मात्र तुझ्या नामांतला आनंद, तुझ्या स्मरणाचा आनंदा हा काही आगळा आहे. अमृताचा घट आहे. साईरामा, हाच ठेवा मला नीत्य द्या. मी तुमच्या पायाला शरण आहे.

# श्रीसाईबाबांचे महत्त्व

**– श्री. शिवानंद शंकरय्या हिरेमठ**
मु.पो. – कागवाड (बसव-नगर),
ता. अथणि,
जि. बेळगांव.

भारतामध्ये अनेक संत, अवतारपुरुष, सिद्धीपुरुष होऊन गेले. भारत देश म्हणजे संतांचे उगम स्थान. श्रीसाईबाबा श्रेष्ठ संत होऊन गेले असले तरी त्यांना भगवंताचाच मान दिला पाहिजे. त्यांनी आपल्या अनेक भक्तांना श्रीविठ्ठलाचे, प्रभूरामचंद्राचे, श्रीशंकराचे, श्रीअक्कलकोट स्वामींचे दर्शन देऊन तृप्त केले आहे. आपल्या भक्तांवर त्यानी असीम माया केली आहे. ज्या वेळी समाजात अकर्तव्य स्थापित करण्याचा प्रयत्न करतो, धर्माच्या हानीला कारणीभूत होतो, त्यावेळी मानव प्राण्याला परत कर्तव्य परायण करण्याकरिता, समाजातील निष्क्रियता नष्ट करण्याकरिता भगवंताला रुप देह धारण करावे लागते. जगाचे कल्याण, मानव समाज सुखी क्ररण्यासाठी, त्यांमध्ये परस्पर प्रेम निर्माण होण्यासाठी, मानवामानवांमधील जातीभेद नष्ट करण्यासाठी, परस्पर सहकार्य निर्माण करण्याकरिता श्रीसाईबाबा ऐन तारुण्यात पवित्र पावन शिर्डीमध्ये अवतरले. सद्‌गुरु साईनाथांनी श्रद्धा आणि सबुरी हे दोन अर्थपूर्ण मंत्र जीवनसाफल्यासाठी दिलेले आहेत.

"पैशा भोवती फिरते दुनिया", हे आजच्या जगाचे सूत्रच आहे. या चंचल लक्ष्मीमागे आजही जग धावत आहे. धावून दमत आहे. काहीजण कोलमडत आहेत. तर काहींचा यातच अंत होत आहे. आजच्या विज्ञान युगात धर्म नष्ट झाल्याने लोक अनेक समस्या घेऊन समस्यांच्या जाळ्यात तडफडत आहेत. या कलीयुगात माणसातील माणुसकी कमी होत आहे. संतांचे चरित्र, अनुभव-कथा, काव्ये, संतांची लीला, रोज वाचन, मनन केल्यास आजच्या मानवी समाजाला मार्ग दाखवितात, मोक्षही प्राप्त करुन देतात, यात तीळमात्र शंका नाही.

देशाला आज अनेक समस्या भेडसावित आहेत. मानव संकटांचा मार्ग तुडवीत चालत आहे. आज आम्ही केवळ संसारात (स्वतःच्या) रमून गेलेलो आहोत. या सर्व बाहय अवडंबरातून आम्हाला सुख न मिळता फक्त संकटाचा, दारिद्र्याचा भार आमच्यावर पडत आहे. परंतु आज आपण नात्यागोत्याच्या मोहबंधनातून, काम, क्रोध, मद, मत्सर, या सर्व अवगुणांपासून मुक्त होण्याची फार नितांत गरज आहे. प्रत्येक वस्तुमात्रात ईश्वर आहे, हे विसरता कामा नये. कर्ता करविता तो नट-नाटकी साईनाथच आहे. पैशाचा, संपत्तीचा, अधिकाराचा, सौंदर्याचा अहंकार बाळगू नका. अहंकारामुळेच आम्हाला अनेक व्याधी, अनेक समस्यांची वाट तुडवावी लागते. आज पैसा प्रपंचाचा केंद्र बिंदू आहे खरे परंतु त्या चंचल लक्ष्मी मागेच सतत राहण्याची फार

वाईट व्याधी आम्हाला लागलेली आहे. आज सगळेजण मानापमानासाठी, केवळ खूर्ची टीकविण्यासाठी, धनासाठी, मोठमोठ्या पदासाठी, सुंदर स्त्रियांसाठी हपापलेले आहेत. माणसाचं आयुष्य म्हणजे एक रंगमंच आहे. त्यातील आपण पात्र असू सर्वजण आपापली भूमिका आपापल्या परीने पार पाडतात. साईभक्तांनो, या जगातील किंवा या प्रपंचातील सुख म्हणजे पाण्याच्या बुडबुड्या प्रमाणे आहे. पैसा कुणाचा गुलाम होत नाही, तो माणसालाच आपला गुलाम बनवितो. पाणी हे जसे शरीराचे जीवन आहे, तसे साईनाथांचे मनन, भजन, पूजा, जप-तप, सुखाचा आणि पुण्य मार्गाचा आधार स्तंभ आहे. धनाची तृष्णा ही दुपारच्या सावलीसारखी फार टिकणारी नाही.

साईभक्तांनो, या अवडंबराची बाह्य सुखांची, काम, क्रोध, मद, मत्सराची, आशा सोडून श्रीसाईनाथांना अनन्य रितीने शरण जा आणि आपले जीवन सार्थक बनवा. साईनाथ आपल्या भक्तांच्या कल्याणासाठी अवश्य धावून येतील, यात तिळ मात्र शंका नाही.

# साई – एक कल्पवृक्ष

– श्री. मनोहर गायकवाड
मांजरी, जि. बेळगाव,
कर्नाटक.

आपण जी इच्छा धरु ती पुरी करणारा 'साई' हा एक कल्पवृक्ष आहे! मात्र या वृक्षाची जोपासना अगदी काळजीपूर्वक केली पाहिजे.

या झाडाला श्रद्धेचे अळे करा. त्यात भक्तीचे जल घाला. दुर्गुणांचे तण उपटून टाका. सद्‌गुणांचे सोनखत घाला. या वृक्षाला असत्य, ढोंग, स्वार्थ, चौर्य, व्यभिचार, अत्याचार, भ्रष्टाचार, व्यसन इ. प्रकारच्या किडींपासून या दिव्य वृक्षाचे प्राणपणाने संरक्षण करा. 'साई' नामस्मरणाचा तेजस्वी औषधी फवारा या किडीवर रामबाण आहे! इतके केलेत की मग हवे ते मागा. साईवृक्ष तुम्हाला विन्मुख पाठवणार नाही!

**मागणे**

भक्तीचा मोबदला साईंना देऊन काय मागायचे? पुढील गोष्टी मागा-

(१) बाबा, आपले नामस्मरण सतत मममुखी होवो!

(२) नामस्मरणाचा वारसा पिढीपिढीतून संक्रांत होवो!

(३) शिर्डी वारी करण्यासाठी प्रकृती चांगली राहो!

(४) तीर्थयात्रा, दानधर्म यासाठी द्रव्य कमी न पडो!

(५) आमच्या हातून पापकर्म न घडता पुण्यच घडो!

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
# श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | –,,– | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | –,,– | हिंदी | – | – |
| ४. | –,,– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –,,– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –,,– | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | –,,– | तामीळ | – | – |
| ८. | –,,– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | – | – |
| ११. | –,,– | हिंदी | – | – |
| १२. | –,,– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | – | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –,,– | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | –,,– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –,,– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –,,– | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | –,,– | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१. | –,,– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | – | – |
| २५. | –,,– | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | –,,– | हिंदी | – | – |
| २७. | –,,– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –,,– | तेलगु | – | – |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | – | – |
| ३१. | –,,– | इंग्रजी | – | – |
| ३२. | –,,– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19 Licence To Post Without
Prepayment at Dadar Head Office, Bombay-14.

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १ | द्वारकामाई फोटो (प्लॅस्टिक कोटेड) | १७"x२२" | २-८० | ५-५० |
| २. | –,,– | १४" X२०" | १-५० | ५-५० |
| ३. | –,,– | ७" x१०" | ०-९० | ५-५० |
| ४. | दगडावर बसलेले साईबाबा (काळा/पांढरा) | १४" x२०" | ०-८० | ५-५० |
| ५. | मूर्ती फोटो | ७" x१०" | ०-९० | ५-५० |
| ६. | पालखी फोटो | ७" x१०" | ०-९० | ५-५० |
| ७. | ऑफसेट फोटो | ७" x१०" | ०-९० | ५-५० |

**पुस्तकं आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :–**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान,
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि.- अहमदनगर.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

**मुद्रक :** श्री. एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई-४०० ०३१.

**संपादक व प्रकाशक :** श्री. रा.द. बन्ने, साई निकेतन, डॉ. आंबेडकर मार्ग, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४ बी. दादर, मुंबई-४०० ०१४.